वर्षाचा आगाऊ रु० ५ डाक हाशील ०१२
सहामाही " १ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास ०४

annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly.....3 " 8 as
Single copy.....4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ०१

वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 6 JUNE 1892 NO 22

वर्ष २६ सोमवार तारीख ६ माहे जून सन १८९२ इ० अंक २२

पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

शीरपूर ता. २८।५।९२

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

कृतानेक सा. नमस्कार वि० वि० आमचा गांव बराच टुमदार आहे. येथें पूर्वी इंग्रजी मराठी शाळा असे. परंतु ती मोडली व हल्लीं ३५ रुपयांची मराठी शाळा आहे. हल्लीं असलेले मास्तर गोपाळराव देशपांडे हे हुशार आहेत. एकालाच ६।५ ह्या इयत्ता शिकवाव्या लागतात. शिवाय सालमजकुरीं उमरखेडाहून प्युपील टीचर्सचा क्लास ह्या मास्तराचे हाताखालीं आणून ठेविला आहे. असे तीन वर्ष शिकविण्यास ह्यांना अगदीं वेळ सांपडत नाहीं. तथापि होईल तितकी सवड करून तीनही वर्गांस यथान्याय शिकवितात. शाळेची स्थितीही बरीच आहे. येथें पोलीस स्टेशन असून चीफसाहेब बऱ्याच प्रकारचे मनुष्य आहेत. सबरजिस्टरचें आफीस आहे. पोस्ट ऑफिस आहे. ह्या गांवच्या मानानें पाहतां सर्व कांहीं सोई आहेत. येथील सोन केवडा सुप्रसिद्ध आहेच. पर्जन्यकाळीं यांची येथें समृद्धि असते व लांबून लांबून लोक मागण्या करितात. शिरपूर येथें कित्येक व्यक्तींच्या उलाढाली स्वभावामुळें आमच्या गांवास कित्येक लोक लबाडांत गणितात परंतु ही गोष्ट सर्वथैव खरी नाहीं असें माझें मत आहे.

हल्लीं उन्हाळा फार आहे. आंब्यांची रेलचेल उडाली आहे. आंबे ही बऱ्या प्रकारचे आहेत. येथून वाशीम जिल्ह्यांचे ठिकाण साहा कोशांवर. तिकडे जाण्यास सडक आहे या मुळें पर्जन्य काळीं कांहीं अडचण पडत नाहीं. आमच्या गांवची मुलें बाहेर हायस्कुलांत बरींच शिकत आहेत. तेव्हां विद्येच्या बाबतींत ही या गांवाचें पाऊल मागें नाहीं. आमचे येथील सरकारी नोकर ही बरेच आहेत. त्या सर्वांत रा. रा. अंबादास संतु देशपांडे यांचें घराणें नामांकीत. हे गृहस्थ वाशीम येथें एक्स्ट्रा असिटंट कमिशनर आहेत. त्याच प्रमाणें यांचे सर्व बंधुही बऱ्याच मोठ्या हुद्यांच्या जाग्यावर आहेत. त्यांनीं येथें पंधरा वीस हजार रुपये लाऊन टोलेजंग हवेली बांधली आहे. सर्दहू ध्वनित केलेल्या सर्व प्रकारांत आमच्या गांवचें पाऊल पुढें आहे इतकेंच नाहीं तर सामाजिक सुधारणेचे बाबतींतही हा गांव बराच पुढें आहे असें ह्मटलें तरी चालेल. दक्षिण मराठा कंट्रि (Country) व वऱ्हाड हे प्रांत वेगळे आहेत. तिकडील लोक इकडे कामाकाजामुळें व आगगाडीच्या साधनानें इकडे इतक्या लांब येऊ लागले तरी इकडील लोक तिकडील लोकांशीं लग्न व्यवहार करण्यास फारसे पुढें सरसावत नाहींत तथापि आमचे गांवचे रा. रा. यादवराव नरकाडे यांनीं हिंमत करून लोकमत झुगारून देऊन आपली रूपवती कन्या इजला रा. रा. लक्ष्मण गोविंद ऋषि डे. ए. इन्स्पेक्टर जिल्हा वाशीम यांना लग्न करून दिली. आतां दुर्दैवानें तिला ऐन तारुण्याच्या भरांत मृत्यूनें ओढून नेलें. ही गोष्ट निराळी. तथापि ह्यांनीं हा प्रतिबंध खुला केला ह्मणा, अगर प्रघात पाडला ह्मणा. त्यामुळें ही पत्नी वारल्याबरोबर अनसिंग येथील एक देशपांडे गृहस्थ पुढें होऊन त्यांनीं आपली कन्या ऋषी डे. ए. इन्स्पेक्टर जिल्हा मजकूर यांना मोठ्या आवडीनें दिली. जरी मि. ऋषी यांचें वय जवळ जवळ पन्नास वर्षांचें आहे तरी सामाजिक सुधारणेचा काळ असून मुली मोठ्या केल्या ह्मणजे सुशिक्षित वर मिळतात असें लोकांना आतां समजूं लागलें आहे. वधुवरें अगदीं लहान असतां लग्न करून बांधून टाकावयाचीं ही अज्ञान चाल हळू हळू कमी होत चालली असें समजावें. शिवाय गेल्या पंधरवाड्यांत आमचे गांवीं मोठें थाटाचा विवाह झाला. वधु उमरखेडाकडची व वर रा. रा. मनोहरपंत रा. रा. अंबादास संतु यांचे बंधु. मनोहरपंत हे इलिचपुरास नौकर होते तेथून त्यांना मोंगलाईंत तहशिलदारीची जागा मिळाली. तिकडे असतां त्यांच्या पत्नीला मृत्यूनें गांठलें. त्यांचा विवाह सदरहू उमरखेडाकडील कन्येशीं झाला. विवाह झाल्यावर अगदीं थोड्या दिवसांनीं त्या कन्येला ऋतु प्राप्त होऊन गर्भाधान विधी लगेच होऊन वधुवरें संसार करूं लागलीं. किती आनंदाची व मौजेची गोष्ट बरें. सर्व लोक जर आपापल्या कन्यका तेरा चवदा वर्षांच्या करून उपवर, सुशिक्षित, काम करूं लागलेल्या पुरुषांना अर्पण करितील तर (Consent bill) काय करणार? आमच्या वाशीम जिल्ह्यांत सुधारणेची दुंदुभी वाजविण्यास जरी कोणी नाहीं तरी त्या गोष्टीची काळजी ईश्वरास पडून त्यानेंच लोकांच्या मनांत प्रेरणा करून अशा प्रकारची सुधारणा हळू हळू होऊ लागली आहे हें आमच्या हरएक बाबतींत मागसलेल्या जिल्ह्याचें नशीबच ह्मणावयाचें!

आमचे येथील पूर्वीचे फ. अ. मास्तर मि. बापुजी रामचंद्र यांचा येथें असतां फक्त १२ रुपये पगार होता. जेव्हां मि. गोविंद भास्कर ओक पुसदचे हेड मास्तर यांना वाशिमास दिस्ट्रिक्ट बोर्डाचे सेक्रेटरीची जागा मिळाली तेव्हां मुळाव्याचे हेडमास्तर मि. नागोराव यांस तिसांवरून ३५ सांवर पुसदास बदललें. त्यांचे जाग्यावर मुळाव्यास वाशीम येथील देवपेठेंतील मास्तर मि० नारायण गोपाळ मुळे यांस विसांवरून तितसांच्या जागेचा आक्टिंग अलॉन्स देऊन २६ सांवर बदललें व आमचे येथील मास्तर सदरहू बापुराव यांस विसांचा अलॉन्स देऊन १६ वर वाशीम येथें बदललें. मुळाव्यांची जागा ३० व वाशीम येथील जागा २० ची आहे. मि. गोविंद भास्कर ओक दोन वर्षें सेक्रेटरीचें काम करून आपले जागीं कायम झाले तेव्हां पुसदास नागोराव कायम झाले ह्मणजे यांनां पांचच रुपये बढती मिळाली याबद्दल कोणाचें कांहींच ह्मणणें नाहीं. परंतु वाशिमाहून मुळाव्यास गेले. मास्तर मि. मुळें यांनां पंचवीसाचे ग्रेड मध्यें टाकून तिसांवर कायम केलें इतकेंच नाहीं तर त्या ठिकाणीं पोस्ट हो मास्तर कडे असल्यामुळें पोस्टा पासून सात आठ रुपयांचें उत्पन्न असतें तेव्हां विसांच्या मनुष्याला इतक्या पगारावर नेमिल्यानें त्यांचे पेक्षां विद्येनें श्रेष्ठ, पगारानें श्रेष्ठ, पुष्कळ दिवसांची ज्यांची नोकरी अशा लोकांचे हक्क मारले गेले यामुळें बिचारे हळहळतात. त्यांच प्रमाणें आमचे येथून वाशिमास गेलेले बारा रुपयांचे मास्तर यांस मानेगांवास कायमची विसाची जागा मिळाली. पंधरा रुपयाची ग्रेड मध्यें टाकून हे विसांवर उडून जाऊन बसल्या कारणानें पंधरावाले * * * करीत बसले. आतां आमच्या गांवाहून गेलेल्या आमच्या बापुरावांना बढती मोठी मिळाली यामुळें आह्मास जरी अत्यानंद झाला तर त्यांचे वरचे लोक रडत बसले यामुळें फारच वाईट वाटतें.

लहाना पासून मोठ्या पर्यंत बढती मिळण्याची आशा करितात. शाळा खात्यांत बढती तपेंची तपें मिळत नाहीं. अशी एखादी संधी येऊन बढती मिळण्याची वेळ आली व अशा प्रकारें अंदाधुंदी झाली तर बढतीची आशा नकोच. आमचे सुदैवानें शाळा खात्याचे अधिकारी फार दयाळू, न्यायी, अनुभविक असे आहेत. या खात्यांत डे० ए० इ० चे जाग्या पासून डायरक्टरचे जाग्या पर्यंत वाढल्या मुळें त्यांना लहाना थोरांची ओळख आहे. असें असून सदरहू दोन्ही बदल्या यांचे मंजुराती शिवाय झाल्या असतील काय? ह्मणून मोठें आश्चर्य वाटतें. कसें ही असो. दोन नेमणुकांच्या संबंधानें लोकमत अगदीं विरुद्ध आहे. व ह्या नेमणुका करण्यांत अन्याय होऊन जातो तिकडे हत्ती जातो नाहीं तर मुंगीही जात नाहीं. असा लोकांचा समज झाला आहे. तर जर कदाचित् नजर चुकीनें असा प्रकार झाला असला तर दुरुस्ती होऊन योग्य नेमणूका होऊन न्याय व्हावा. कळावें. हे विनंती.

नवीन
"क्ष"

बरार रूरल लॉ.

(२१ वें अंकावरून पुढें चालूं.)

११. निवडणुकीच्या प्रत्येक उमेदवाराबद्दल दोन लायक निवड करणारांनीं सुचना करून अनुमोदन दिलें पाहिजे. ती सूचना लेखी असून डेपुटी कमिशनरकडे ती निवडणुकीकरितां नेमलेले तारखेपूर्वी दहा दिवसांचे आंत पोहोंचली पाहिजे. असा उमेदवार नियम २ अन्वयें योग्य लायक असेल तर त्याचें नांव डेपुटी कमिशनरांनीं निवडणुकी करितां उमेदवारांचे तयार केलेले रजिस्टरांत दाखल करावें. एकाच निवड करणारानें एकापेक्षां जास्त उमेदवाराकरितां सुचना करूं नये किंवा अनुमोदन देऊं नये.

निवडीच्या व्यवस्थेची देखरेख.—

१२. डेपुटी कमिशनर किंवा त्या कामाकरितां त्यांनीं नेमलेल्या इतर कामगारानें निवडीची व्यवस्था ठेवावी. व त्या निवडी संबंधीं कोणत्याही प्रश्नाचा अखेर निकाल त्यांनीं करावा.

मत लिहिणें.—

१३. निवडी करितां नेमलेलें दिवशीं निवडणाराचे यादीवरून प्रत्येक निवडणाराचें नांव घेऊन पुकारावें, व तो हजर असेल तर कोणाकरितां तो मत देतो हें त्यास विचारावें. किंवा त्याणें आपले मताचा कागद योग्य प्रकारें सही केलेला व प्रतिज्ञा लेखानें खरा केलेला दाखल करावा मग त्यांचें मत दाखल करावें. तें मत नेमलेले दिवशींच कबूल करितां येतें. जर निवडणूक करणारानें त्या दिवशीं नेमलेल्या वेळीं आपलें मत लिहून दिलें नाहीं तर त्याचें मत घेतलें जाणार नाहीं.

प्रत्येक उमेदवाकरितां मतांची संख्या—

१४. प्रत्येक निवडणारास त्याचे सरकलांत जितक्या रिकाम्या जागा भरण्याच्या असतील तितक्या उमेदवारांकरितां मत देतां येतें परंतु एखाद्या उमेदवाराकरितां एका पेक्षां जास्त मत त्याणें देऊं नये.

निवडलेले उमेदवारांचीं नांवें प्रसिद्ध करणें.

१५. सर्व मतें लिहून घेतल्यानंतर व्यवस्था करणारे अधिकाऱ्यानीं प्रत्येक उमेदवारा करितां लिहिलेले मतांचे संख्येची बेरीज घ्यावी व ज्या उमेदवाराकरितां किंवा अनेक उमेदवारांकरितां मतांची संख्या सर्वांहून जास्त लिहिली गेली असेल ते निवडले गेले ह्मणून प्रसिद्ध करावें.

सारखेपणा असल्यास निवडीचा निकाल कसा करणें.—

१६. जेव्हां मतांचे सारखेपणामुळें एखादे उमेदवाराची निवड अनिश्चित राहिली असेल तेव्हां त्यांची निवड लाट (चिठ्या) टाकून केली जावी.

(पुढें चालेल)

वऱ्हाडसमाचार

मिती जष्ठ शुद्ध ११ शके १८१४

इंग्रज सरकारची धनाकडे लुब्धपणाची दृष्टी असते. राज्यसत्तेचें वैभवशालित्व प्राप्त झालें तरी कटु स्वभाव व व्यापारी लोभ हे कांहीं काडीमात्र ढळले नाहींत. उदारशील वर्तन सरकारचें केव्हां केव्हां दृष्टीस पडतें परंतु जेव्हां लाभहानीचा प्रश्न येतो तेव्हां इंग्रजी मनुष्य म्हणजे धनराशीवरील कृष्ण सर्पच समजावयाचा. प्रसंग पडला तर प्राणा कडेही न पाहतां इंग्रज लोक दुसऱ्याचा प्राण वांचवितील परंतु जर आपला माल खरेदी न करण्याचा त्या जीवंत राखलेल्या मनुष्यानें पक्का बेत केला आहे असें त्यांना कळलें तर त्याला ते लोक जीवानिशी ठार करण्यासही चुकणार नाहींत. कांहीं वर्षांपूर्वी विलायतेस पुष्कळ पडला तेव्हां हिंदुस्थानचा गहूं वगैरे धान्यें तिकडे जकाती शिवाय मिळाल्यास दुष्काळाचा कडकपणा भासणार नाहीं असें वाटल्यावरोवर चोंहोकडून ओरड करून धान्यावरील जकात उठविली आणि आपला तळीरामगार करण्यास इंग्रज लोकांनीं दशदिशा दणाणून सोडल्या. धान्यावरील जकात उठविते वेळीं तत्वज्ञानाचा दीप पाजळला तो तेवढ्या पुरताच न ठेवितां विचारांच्या युक्तायुक्ततेकडे लक्ष्य पोचवून आणि स्वार्थ दिशा साधून त्यांनीं निष्प्रतिबंध व्यापाराचें तत्व काळेवेळ, स्थळविशेष वगैरे झुगारून प्रकाशित केलें. धान्यावरील जकात उठविल्यानें जी धान्य समृद्धि सुखावह झाली तिच्या यशश्रीच्या भरानें फोफावलेल्या ब्रिटिश पार्लमेंटनें आपल्या दरबारच्या शहाण्या माणसांवर वरचढ करणाऱ्या असमंजस मुत्सद्यांच्या सल्यानें सर्व जकाती उठविल्या आणि स्वतां प्रमाणें निष्प्रतिबंध व्यापाराचें तत्व न पाळणाऱ्या इतर राष्ट्रांचा त्यांच्या अज्ञानाव अंधत्वामुळें उपहास करण्यास आरंभ केला. जोंपर्यंत इग्लंड देश सर्व राष्ट्रांमध्यें पहिल्या प्रतीचा कारखानदार व यांत्रिककलानिपुण होता तोंपर्यंत ही निष्प्रतिबंध व्यापाराची ऐट चालली. परंतु जर्मनी युनायटेडस्टेटस इत्यादि राष्ट्रांनीं इंग्लंडास यांत्रिक कलेंत मागें टाकून इंग्लंडचा पूर्ण पर्णे मडाव केला आहे. हें कालचक्र फिरलें तेव्हां इंग्रजांच्या डोळ्यांत नवें अंजन पडलें आहे. त्यातां कांहीं धोरणी अनुभवी व शहाणे मुत्सद्दी निष्प्रतिबंध व्यापाराला निरनिराळ्या प्रकारें प्रतिबंध घालूं लागले आहेत. राष्ट्रीय प्रकरणांत किंवा व्यक्तिविशेषा संबंधानें निष्प्रतिबंध व्यापार चालला पाहिजे तरी सर्व ग्रेट ब्रिटना संबंधानें निष्प्रतिबंध व्यापार कायमच राखला पाहिजे असें कांहीं म्हणतां येत नाही अशी नवी कोटी ते लोक लढवूं लागले आहेत. विलायतच्या कपड्यावरील आयात कर अजिबाद बंद केले तेव्हां विलायतच्या कारखान्यांची भरभराट होण्यास तो उपाय योजिला होता. परंतु सध्यां हिंदुस्थानचा कपडा विलायतच्या तोडीचा निघूं लागला आहे असें पाहून इकडील धोतरजोडे विलायतेस नेऊन तिकडील व्यापारी मंडळ्यास हिंदुस्थानच्या वर्धस्वाबद्दल जागें करण्याचा अलिकडे सतत उद्योग चालला आहे. हिंदुस्थानची यांत्रिक कलेंत उद्योगवृद्धि झाली म्हणजे विलायत रसातळास पोंचलीच असें लॉंकासरच्या लोकांस पक्कें कळून चुकलें आहे. विलायचच्या निष्प्रतिबंध व्यापारानें हिंदुस्थानचे जुने कारखाने व धंदे सफै ठार बुडाले. आमची हिंदुस्थान सरकारास विज्ञप्ती आहे कीं, सरकार मार्फत कमिशन बसवून निष्प्रतिबंध व्यापारानें या देशच्या साम्पत्तिक स्थितीवर केवढा जबरदस्त आघात बसला आहे हें पहावें म्हणजे सरकारची सहजीं खात्री होईल. निष्प्रतिबंध व्यापारानें इंग्लंडला इतर राष्ट्रा समोर टिकाव धरितां आला नाहीं तर तो व्यापार हिंदुस्थानास लाभप्रद झाला असेल हें कितपत संभवतें? ब्रिटिश प्राइम मिनिस्टर लार्ड सालिसबरी ओलकडे हॉस्तिंग्स मुक्कामीं संभाषण करितांनां बोलले कीं निरनिराळ्या राष्ट्रांमधील व्यापारा विषयींच्या मोठ्या प्रश्नाचा उलगडा करण्यासाठीं पुन्हा विचार केला पाहिजे. आणि पुढें असें ही बोलले कीं, धान्य व कच्चा माल यांवर जकात बसविणें हें अशक्य होय. उघडच आहे कीं, या दोहोंवर जकात बसविली तर विलायतचे लोक उपाशी मरतील आणि त्यांचे कारखाने बंद पडतील. तेव्हां लाट साहेबांचे म्हणणें आत्महितार्चे व युक्तिवादाचें होतें. आमच्या देशाच्या कापूस आदिकरून कच्चा मालावर पूर्वीच्या जकाती बसविल्या जाव्या म्हणजे आम्ही सुदीन समीप आला असें मानूं. बाकी इतर राष्ट्रासंबंधानें इंग्लंडनें निष्प्रतिबंध व्यापाराच्या तत्वांत फेरबदल केला आणि हिंदुस्थानच्या बाबतींत कांहींच विचार केला नाहीं तर आमच्या राज्यकर्त्यांस काय संज्ञेनें संबोधावें हें स्पष्टपणें कळविणें नको.

हिंदुस्थानची प्रजा दिवसेंदिवस वाढत चालली आहे तेव्हां येथील लोकांनीं द्वीपांतरीं जाऊन वसाहती वसवाव्या असा उपदेश करणें सोपें आहे पण तसें घडून येण्याला लोकांचे जवळ साधनें नसल्यामुळें हा उपदेश सरकारचे मदती शिवाय कोरडें ब्रह्मज्ञान होय. कांहीं दिवसांपूर्वी हिंदुस्थानचे कांहीं व्यापारी आस्ट्रेलियाकडे गेले होते पण त्यांचें साहस, उद्योग व व्यापारांतील फायदा हीं पाहून तिकडील लोकांचे मनांत हेवा मत्सर उत्पन्न होऊन त्यांनीं त्यांस हांकून दिलें. आमच्या सरकारची हिंदुस्थानच्या लोकां विषयीं एवढी अनास्था कीं, त्यांनीं त्या व्यापाऱ्यांचें जीवित्व, मालमत्ता यांचें योग्य संरक्षण होण्याविषयीं कांहींच फिकीर केली नाहीं परंतु आस्ट्रेलियन लोकांच्या हातून अशा प्रकारची आगळीक इंग्लिश व्यापाऱ्यांची झाली असती तर तें लढाई उद्भवण्यासही पुरें कारण झालें असतें. अन्य खंडांत वसाहती करण्यास सरकार मार्फत मुबलक सवलती पाहिजेत. हल्लीं आफ्रिकेंत वसाहती नवीन होत आहेत तिकडे जाणाऱ्या इंग्लिश लोकांस किती प्रकारें सवडी दिल्या आहेत, हें पाहिलें असतां त्या सवलतींची आपणास अटकळ करितां येईल. शिवाय पाठीपीं गमनाला मनुष्यबल व धनबल हीं लागतात; त्यांत धनबला संबंधानें दक्षतापूर्वक योग्य प्रकारची सरकारनें तजवीज केली तर नवीन वसाहती करण्याचा उद्योग आमचे हातूनही होण्यासारखा आहे. ब्रह्मदेश व सिंगापूर कडे इमाऱ्यानें जमिनी देण्याची व्यवस्था सरकारनें केली आहे. परंतु ती पुरेशी नसून त्या बद्दल आणखी अनेक गोष्टी अमलांत येणें आवश्यक आहे.

The Berar Samachar

MONDAY, JUNE 6
1892

A great many men among us seek employment of some kind or other. They are sent to school to get education, but the main object of parents in sending children to schools is that their children should get sufficient competency in erudition which would enable them to acquit themselves with sufficient credit of the duties imposed on them by the particular employment they are from the beginning taught to seek. The highest goal of ambition with many being thus slavery—there naturally arises that contentment with little which is very characteristic of our people. Our people are used to think that their only duty is to drag on the moments of their existence somehow or other. Their ambition is limited to get sufficient income either for themselves or their family. This we say is the case with the general mass. There are some exceptions no doubt whose ambitions are very unbounded.

Much energy is spent in skilfully managing to put down particular individuals out of jealousy. This often leads to disappointments or disaffections. Their ambitions soar high in the beginning; but no sooner do they do so than they bend their course and drop down to their former level through want of adequate energy. There are various objects to which the ambitions of different sects of our community is directed. The more or less educated people hanker after a retired life full of composure and serenity. The violent storms of worldly life, its rocks and shoals and its ebbs and flows which shatter the tender mind by upsetting it, uusettling it and buffetting it hither and thither—are too great for them. Instead of facing them they avoid them. The money lenders are given up to the hoarding up of money by means fair or foul. They have very little idea of a good, happy and comfortable life. Money is the sole end and aim of their whole life. The mercantile classes are too much busy with their transactions to direct their attention to the noble and refined forms of life. The industrial classes or artizens of various stations in life have only to look to the attainment of more and more skill and perfection in their departments. The priesthood is full with religious fervour and is completely devoted to mastering the forms and modes of religious ceremonials and rites and to devouring holy texts. The more or less unoccupied men turn their thoughts to try their strength in soldiery. These then are the objects to which men of different vocations confine tneir attention.

We have thus far attempted to give the various pursuits and ambitions of our young men. As a general observation common to all we have to most painfully note the tenacious nature of our men to cling to the practices, habits and customs consecrated by being trodden down by our forefathers. They fail to remember that they often conflict with the imminant demands which their circumstances make upon their activity.

Again in their literary pursuits they are now labouring under a great disadvantage. They have first to learn a foreign language in which is concealed for the most part the advanced form of knowledge. After this labourous attempt they have to treasure up their thus acquired knowledge in their own vernacular tongue but this again can not be helped. The present generation must be awakened to its responsibilities in regard to the next ones and it must endeavour to make this immense stock of western education more easily accessible to them. This end may be also achieved by adopting a foreign language as their mother tongue. But the latter course would, if adopted tend to our total denationalization. However the latter course is comparatively more difficult than the former one.

The mercantile pursuits of our people now depend very much on their political condition. It is not thus our present aim to find out the exact nature and degree of their connection and criticise the one or the other. It would be quite within the mark to observe that in their transactions our mercantile classes in general exhibit a great want of fair, plain and regular dealing. Excepting great towns they lack much in co-operation. When these pre cautions and a few others of little import ance are taken our mercantile pursuits would do much to commend our national character to the tastes of others.

In point of industrial or technical pur suits the former skill and excellence which was the greatest boast of our Indians a few days before, are now decaying and running into oblivion. There being under present circumstances no encouragement given to such pursuits— the disappear ance of them is easy to explain. Besides much scientific education is needed in these respects. The recent inaugurations of Arts Exhibition very clearly point to the foct that the native workmanship is very fine and tasteful. We must really be glad to see such exhibitions inaugurated to encourage our people to approach more and more to perfection in these branches.

—0—

Throughout the history of the British rule in India the Britisher is well known for his adultation of gold and the spirit of a shop-keeper. The vague and well-sounding principles of altruism and benevolence retire when a question crops up with respect to the conflicting claims of the Natives and the Anglo-Indians. The British Government is not so much for the Indians as it is for its own men. India is indeed a home where the foreigner in his land of exile is to hoard up money to leave a fair competency to live on happily in England. The English Government is proud of its Indian annals as a record of glory, elevation, and high altitude of human achievements. The English people boast of the freedom and liberty to a feast of which they called their fellow-subjects to participate in common with them the pleasures of being under one sovereignty. This looks well in the loud talk of Anglo-Indian unselfishness. The English Government have pledged their high credit and renowned prestige to redeem their past promises to the Natives and but it is not in one case out of a hundred that it has kept up its word. The British Government has all along struggled to evade promises and to make a *show* of moral and political uprightness and honesty. It has succeeded well in the attempt and the following quotation from the 'Hindu' of Madras will make more plain and manifest what we have said so long:—

"The enactment of 1833 was preceded by a most elaborate enquiry into Indian officers and a very full discussion of the changes proposed in the Act. By section 87, clause 85, of this Act, no native of India was to be, "by reason only of his religion, place of birth, des-

cent, colour, or any of them, disabled from holding any place or employment under the said Government." The right thus conferred on the natives of this country by a deliberate enactment of Parliament, was further confirmed by the celebrated proclamation of Her Majesty who "holds herself bound to the natiaes of her Indian territories by the same obligations of duty which bind her to all her other subjects." Ncr was this document repudiated or set at naught subsequently by Her Majesty's representatives in India. In Lord Ripon's time an attempt was made to repudiate the obligations on the Indian Government which it directly derives from that document, and a Lieutenant Governcr and a Madras Civilian talked with unbecoming flippancy of moral pledges in international politics. The lofty moral sense of that great statesman was roused, and he most vehemently repudiated that wicked Doctrine. "It (this doctrine) seems to me," Lord Ripon said, staring most indignantly at certain of his ccuncellors assembled in the Legislative Council, inconsistent with the character of my sovereign and with the honour of my country, and if it were once to be received and acted upon by the Government in England, it would do more than any thing else could possibly do to strike at the root of our power and destroy our just influence." Lord Lansdowne himself said "The Governnient of India regards the Proclamation of 1858 as in the highest degree obligatory upon it." Lord Northbrook, Lord Lytton and Lord Dufferin have all said the same thing. Yet, how is this most solemn and memorable pledge being redeemed? It is redeemed, we are sorry to say, in a most unfair and grudging spirit. In the face of the repeated immunity granted to the Indian people, by Statutes, Proclamations, and official utterances, from all disabilities arising from caste, colour or creed, Lord Cross has declared that the natives should be kept out of the higher executive posts as a matter of expediency! And even in regard to the minor offices that have been declared open to the natives, there is the most unworthy spirit of suspicion and selfishness manifested by the Government. It is in regard to the employment of natives in the public service that the most definite, the most solemn and the most reiterated pledges have been given, and yet it is in this regard that the Government is treating them most shabbily, most unfairly, and in the most unworthy spirit."

वऱ्हाड

हवामान— गेल्या आठवड्यांत चांगला पाऊस पडला त्यामुळें हवेंत चांगला गारवा आला आहे. परंतु पाऊस पडण्यापूर्वी बारा अगर्दी पडतो व तलखी विशेष होते तेव्हां उकाड्यानें लोक बेहोष होऊन जातात. उष्णतेचें मान १०२ अंशा पर्यंत उतरलें आहे. पटकीचा उपद्रव तुरळक तुरळक आढळण्यांत येतो.

गेल्या हंगामांत वऱ्हाडांतून ३,११,००० गठे कापूस विलायतेस रवाना होण्यासाठीं मुंबई बंदरास धाडण्यांत आला. गुदस्त सालापेक्षां यंदा कापूस ४३००० गठे कमी बाहेर गेला याचें कारण पीक कमी व भाव मंदीचा असें होतें.

उमरावतीकडे एका पंजाबी इसमावर बनावट नोटी केल्याचा आरोप आल्या वरून त्यांस पकडण्यांत येऊन त्याची कचेरी चौकशी चालू आहे.

मेहेकरचे तहशीलदार रा० रा० सुबराव यांस तीन माहिन्यांची रजा देण्यांत आल्या कारणानें त्यांच्या रिकाम्या जागेवर बुलढाण्याचे क्लार्क आफ कोर्ट रा० रा० विठ्ठलराव काळीकर यांस नेमून उमरावती कमिशनरचे आफिसांतील क्लार्क रा० रा० विष्णु रंगनाथ यांस बुलढाण्यास रवाना केलें.

वऱ्हाड प्रांतासाठीं निराळा अपकारी खात्यावर मुख्य आफिसर नेमण्यांत येऊन तें खातें स्वतंत्र करणार असल्या विषयीं कळतें.

पांढर कवडा येथिल हेडमास्तर रा. रा. दामोदर पंत यांस शाळाखात्यांतून बदलून पोस्टल खात्यांत पंधरा रुपये पगारावर नेमणार असें कळतें.

येथील पोस्ट आफिसांतील आर्डर्ली क्लार्क रा. रा. नरहर राजाराम काळकर यांस बुलढाणे पोस्टांत आर्डर्ली हेड क्लार्क नेमलें आहे.

अकोला, उमरावती, बुलढाणा, इलिचपूर व वाशिम, येथील पोस्ट आफिसांतून पंधरा रुपयाच्या पगारी उमेदवाऱ्यांच्या सहा जागा नवीन करण्यांत आल्या.

वणीचे पोस्ट मास्तर यांनीं आत्महत्या केल्या कारणानें त्यांच्या रिकाम्या जागीं येथील आफिसांतून रा. रा. नामदेव शंकर यांस २० रुपये पगारावर कायम केलें.

जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, कजबे अकोलें येथील ताजना पेठेंत गंगाधर जोरावरमल यांचा बगीचा आहे. त्यांतील विहीर नादुरुस्त झाली आहे सबब अजुबाजूनें काट्या लावल्या आहेत. त्या बगीच्याचे आसपासचे रहाणारे लोकांनीं व अवंतर लोकांनीं त्या विहिरीवर पाणी भरूं नये अशी या जाहिराती वरून मनाई केली आहे विहिरीवर पाणी भरण्यास कोणी जाऊन पडल्यास त्याज बद्दल आमचेवर कोणतेंच प्रकारची जबाबदारी नाहीं. सदरहूची एक प्रत विहिरी जवळ व एक बगीच्याचे हाम रस्त्यावर लाविली आहे. कळावें ता० ४—६—९२

(सही)

गंगाधर जोरावरमल मै० वारास द० पु० जानकीदास

गंगाधर अ० पा० क०

लखमीचंद नैनारायन तर्फे मु०नैराम बाळकृष्ण

तळेकार दस्तूर खुद्द.

नोटीस

बापु पांडुरंग ब्राह्मण राहणार अकोलें ताजनापेठ गुजरपुरा यासीः—

या खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं, तुम्ही मला रुपये चारशे कर्ज देण्याचे कबूल केल्यावरून मी तुमचे नांवें सवाई सुद्धां रुपये पांचशेचा तारीख २—६—९२ इ० रोजीं लिहिणार याजकडून गांवांत दस्तैवज लिहून व त्यावर तुमचे सांगण्यावरून साक्षी ही ठाकल्या तो दस्तैवज तुम्ही आपले जवळ घेऊन घरीं गेल्यावर रुपये देण्याचें कबूल केलें त्याप्रमाणें त्या दिवसांपासून मी तुमचें घरीं रुपये मागण्यास येत असतां तुम्ही रुपये देत नसोन दस्तैवज ही परत देत नाहीं. यासाठीं कळविलें जातें कीं, ही नोटीस पावल्या बरोबर दस्तैवजाचे भरण्याचे रुपये मला देऊन पावती घ्यावी. तसें न केल्यास सदरहु दस्तैवज रद्द असोन त्याबद्दल तुम्ही दावा वगैरे केल्यास मी कोणतेंच प्रकारें जबाबदार होणार नाहीं कळावें तारीख ४—६—९२ इ०

(सही.) झाबाजी व० रावोजी

माळी रहाणार अकोलें

याच्या हातची निशाणी असे.

नोटीस

हनवतराव सुरजमल मारवाडी राहणार लाखपुरी प्रगणें मुर्तिजापूर ता० मजकूर पोष्ट मुर्तिजापूर यांस नोटीस देणार पांडूरंग संभाजी घनमोडे राहणार लाखपुरी या नोटिशीनें कळवितों कीं तुम्हीं आम्हा कडुन घेतलेल्या कर्जाचे रुपये आम्हाला परत न देतां दुसऱ्या कोणाला देऊन त्याचे हातची पावती फारकत घेण्याचे विचारांत आहा, व माझा धाकटा भाऊ नामे शिवाजी वल्लद संभाजी हा तुम्हापासून रुपये घेऊन पावती देण्याचें विचारांत आहे. या करितां तुम्हाला या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं तुमच्याकडुन मला जें घेणें आहे त्याची फेड खुद्द मलाच रुपये देऊन करावी. माझे भावांस किंवा माझ्या शीवाय इतर दुसऱ्या कोणांस रुपये देऊन त्यांची पावती घेतल्यास ती आम्हांला मान्य नाहीं. माझ्या शिवाय इतर कोणाला तुम्ही रुपये दिल्यास त्या बद्दलचीं सर्व जबाबदारी तुम्हांवर आहे. कळावें तारीख २ माहे जुन सन १८९२ इसवी.

सही

पांडु वल्लद संभाजी दस्तुर खुद्द.

नोटीस

संभाजी वल्लद टोपाजी धनगर अडनांव जोगी रहाणार लाखपुरी परगणें मुर्तिजापूर तालुके मजकूर पोष्ट मुर्तिजापूर यासः—

नोटीस देणार पांडुरंग संभाजी घनमोडे राहणार लाखपुरी या नोटीशीनें कळवितों कीं— तुम्ही आम्हाकडुन घेतलेल्या कर्जाचे रुपये आम्हाला परत न देतां दुसऱ्या कोणाला देऊन त्याचे हातची पावती फार्कत घेण्याचे विचारांत आहा. व माझा धाकटा भाऊ नामें शिवाजी वल्लद संभाजी हा तुम्हा पासुन रुपये घेऊन पावती देण्याचे विचारांत आहे, या करितां तुम्हाला या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, तुमच्याकडून मला जें घेणें आहे त्याची फेड खुद्द मलाच रुपये देऊन करावी. माझे भावांस किंवा माझ्या शीवाय इतर दुसऱ्या कोणांस रुपये देऊन त्यांची पावती घेतल्यास ती आम्हांला माहीत नाहीं. माझ्या शिवाय इतर कोणाला रुपये दिल्यास त्या बद्दलची सर्व जबाबदारी तुम्हावर आहे. कळावें तारीख २ मोहे जून सन १८९२ इ०

(सही.)

पांडु वल्लद संभाजी दस्तुर खुद्द.

नोटीस.

रामप्रसाद लच्छीराम कनोजा ब्राह्मण राहणार लाखपुरी परगणें मूर्तिजापूर तालुके मजकूर पोस्ट मूर्तिजापूर यांस नोटीस देणार पांडुरंग संभाजी घनमोडे रहाणार लाखपुरी या नोटिशीनें कळवितों कीं तुम्ही आम्हाकडून घेतलेल्या कर्जाचे रुपये आम्हाला परत न देतां दुसऱ्या कोणाला देऊन त्याचे हातची पावती फारकत घेण्याचे विचारांत आहा, व माझा धाकटा भाऊ नामे शिवाजी वल्लद संभाजी हा तुम्हापासून रुपये घेऊन पावती देण्याचे विचारांत आहे, याकरितां तुम्हाला या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, तुमच्याकडून मला जें घेणें आहे त्याची फेड खुद्द मलाच रुपये देऊन करावी. माझे भावांस किंवा माझ्या शिवाय इतर दुसऱ्या कोणांस रुपये देऊन त्याची पावती घेतल्यास ती आम्हाला मान्य नाहीं. माझ्याशिवाय इतर कोणाला तुम्ही रुपये दिल्यास त्या बद्दलची सर्व जबाबदारी तुम्हावर आहे कळावे. तारीख २ माहे जून सन १८९२ इसवी.

(सही)

पांडु वल्लद संभाजी दस्तूर खुद्द.

नोटीस.

मारुती वल्लद शिंगराजी पाटील अडनांव घोगरे रहाणार लाखपुरी हल्लीं वस्ती खुदानपूर परगणें मूर्तिजापूर तालुके मजकुर व पोस्ट मूर्तिजापूर यांस नोटीस देणार पांडुरंग संभाजी घनमोडे रहाणार लाखपुरी या नोटिशीनें कळवितों कीं, तुम्ही आम्हाकडून घेतलेल्या कर्जाचे रुपये आम्हाला परत न देतां दुसऱ्या कोणाला देऊन त्याचे हातची पावती फार्कत घेण्याचे विचारांत आहां, व माझा धाकटा भाऊ नामें शिवाजी वल्लद संभाजी हा तुम्हापासून रुपये घेऊन पावती देण्याचे विचारांत आहे, याकरितां तुम्हाला या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, तुमच्याकडून मला जें घेणें आहे त्याची फेड खुद्द मलाच रुपये देऊन करावी. माझे भावांस किंवा माझ्या शिवाय इतर दुसऱ्या कोणांस रुपये देऊन त्याची पावती घेतल्यास ती आम्हाला मान्य नाहीं. माझ्या शिवाय तुम्ही कोणाला रुपये दिल्यास त्याबद्दलचीं सर्व जबाबदारी तुम्हावर आहे. कळावें. तारीख २ माहे जून सन १८९२ इसवी.

(सही)

पांडु वल्लद संभाजी दस्तुर खुद्द.

नोटीस.

शामराव वल्लद विठ्ठलराव देशमुख रहाणार लाखपुरी परगणें मूर्तिजापूर तालुके मजकूर पोस्ट मूर्तिजापूर यांस नोटीस देणार पांडुरंग संभाजी घनमोडे रहाणार लाखपुरी या नोटिशीनें कळवितों कीं तुम्ही आम्हाकडून घेतलेल्या कर्जाचे रुपये आम्हाला परत न देतां दुसऱ्या कोणाला देऊन त्याचे हातची पावती फार्कत घेण्याचे विचारांत आहां, व माझा धाकटा भाऊ नामें शिवाजी वल्लद संभाजी हा तुम्हापासून रुपये घेऊन पावती देण्याचे विचारांत आहे, या करितां तुम्हाला या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, तुमच्याकडून मला जें घेणें आहे त्याची फेड खुद्द मलाच रुपये देऊन करावी. माझे भावांस किंवा माझ्या शिवाय इतर दुसऱ्या कोणांस रुपये देऊन त्याची पावती घेतल्यास ती आम्हाला मान्य नाहीं. माझ्या शिवाय इतर कोणाला तुम्ही रुपये दिल्यास त्याबद्दलचीं सर्व जबाबदारी तुम्हावर आहे. कळावें. तारीख २ माहे जून सन १८९२ इसवी.

(सही)

पांडु वल्लद संभाजी दस्तूर खुद्द

वर्तमानसार

चीन देशांत जे यति आहेत, ते यति होतांना आपले डोळे काढून टाकतात; कारण ते असें ह्मणतात कीं, हे प्रीतीचे दोन दरवाजे बंद झाले असतां शहाणपणाचे हजारों दरवाजे खुले होतात.

पोप कवि असें ह्मणत असे, आमचीं खिशांतलीं घड्याळें हीं कधीं सारखा वेळ दाखवीत नाहींत; तशीं आमचीं मतें कधीं जुळायचीं नाहींत; तरी जो तो ह्मणतो माझें घड्याळ बरोबर व माझें मत बरोबर!

धनकोची एका मास्तरानें केलेली व्याख्या:—धनको 'वर्तमानकाळीं' उपयोगीं पडतो, 'संकेतार्थीं' ऋणकोस राखतो, व 'भविष्यकाळीं' नाश करतो.

दोन अति दरिद्री स्त्रीपुरुषांचें लग्न ह्मणजे अनावृष्टि आणि दुष्काळ यांचें लग्न होय!

कागदाच्या किंम्या ओढल्यामुळें शंभर तरुण पुरुष युनायटेड स्टेट्समध्यें मृत्युमुखीं पडले. तशा प्रकारच्या किंम्या ओढणारांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें.

जर्मनींत एका रस्त्यावर रबरबंदी केली आहे. गाड्यांचा किंवा घोड्यांच्या पायांचा बिलकूल आवाज होत नाहीं.

एका जर्मन मनुष्यानें एक दिवा शोधून काढला आहे. त्याचा प्रकाश विजेच्या दिव्यापेक्षांही प्रखर आहे. त्याची शक्ति चार लक्ष मेणबत्त्यांच्या इतकी आहे.

रुरकी कालेजबद्दल सरकारला सालिना १,४०,००० रुपये खर्च येतो. त्या मानानें फायदा होतो काय!

तिबेटांत एक सरोवर सांपडलें आहे, तें समुद्राच्या सपाटीपासून १७,९३० फूट उंचीवर आहे. व गौरीशंकर (कैलास) नांवाच्या शिखराशीं स्पर्धा करणारें एक शिखरही सांपडलें आहे.

फ्रान्स व जर्मनी दोनही राष्ट्रें आपलें सैन्य वाढवीत आहेत. कां!

उत्तर अर्काट प्रांतांत दुष्काळ पडल्यामुळें पुष्कळ मजूर नेटलमध्यें जाण्याला तयार झाले आहेत! काय करतील बिचारे!

सरहद्दीवरच्या तारायंत्राच्या तारा सुमार दोन मैलपर्यंत तोडून टाकल्या आहेत. राजकीय चळवळीचें चिन्ह दिसतें!

पंजाबामध्यें टोळांच्या लढाया चालल्या आहेत.

कलकत्त्यास देवी व पटकी यांचा फार उपद्रव झाला आहे.

करमणूक.

मिठाचा खप. १८९१।९२ ह्या सरकारी वर्षांत सगळ्या हिंदुस्थानांत ३४४७९००० मण मीठ विकलें व कराच्या रूपानें सरकारास ८२५१८००० रुपये उप्तन्न झालें. मागल्या वर्षीं ३३३२१००० मण मीठ खपून सरकारास ७९९१४००० रुपये उप्तन्न झालें होतें ह्मणजे १८९१।९२ सालीं ११५७००० मण मीठ जास्त खपलें असें उघड होतें. मिठावरील जकात वाढविली तरी मिठाचा खप कमी न होतां जास्तच होतो असें सांगून सरकार पक्षाचे पत्रकर्ते संतोष दाखवीत आहेत. सरकारानें उद्यां हवापाण्यावर कर बसविला तर जीव वांचवण्यासाठीं हवा पाणीहि लोक विकत घेतील, न घेऊन काय करतील बिचारे!

विद्या देवीस इनाम जमीन:— बंगाल्यांतील महाराणी सरनामाई यांचें नांव दातृत्वामुळें जगभर गाजलें आहे. अनेक लोककल्याणाच्या कामासाठीं आजपर्यंत ह्यांनीं कित्येक लक्ष रुपये दिले आहेत. बऱ्हाणपूर येथील कालेजचा संबंद खर्च ह्या वर्षांपासून आपण करावा असें ह्यांच्या मनांत आलें आहे. हा उदार हेतू निरंतर चालावा ह्मणून दरसालच्या कालेजच्या खर्चा पोटीं २०००० रुपये उप्तन्न व्हावे ४ लक्ष रुपये किंमतीची जमीन त्या कालेजाच्या नांवानें तोडून देण्याचा त्यांचा निश्चय झाला आहे असें बंगाल्याकडील पत्रांवरून समजतें. लक्ष्मीच्या लालनीं स्वदेश बांधवांच्या अडचणी नाहींशा करण्याचें मनांत आणिल्या शिवाय खरी कार्यसिद्धी कधीं ही व्हावयाची नाहीं. ह्या कालेजांत गरीब आणि निराश्रित विद्यार्थ्यास मोफत शिक्षण द्यावें असा महाराणी साहेबांचा उदात्त हेतू आहे. गरिबांस उत्तम प्रकारचें विद्यादान मोफत देऊन त्यांचीं मनें संस्कृत करणें यापेक्षां थोर पुण्य तें इहलोकीं कोणतें!

थट्टेचा परिणाम— तारीख २९ एप्रिल रोजीं दिल्लीहून अलाहाबादेस जाणाऱ्या डाकेच्या गाडींत विश्वेश्वर नांवाचा एक सार्टर होता. त्यानें एकशें एक रुपयांची पिशवी एका जागीं ठेविली होती. गाडी अलाहाबाद स्टेशनावर येण्याच्या सुमारांस तो आपलें सामानसुमान घेऊन पिशवी पाहू लागला. तो ठेवल्या ठिकाणीं ती नव्हती तों त्यानें ही गोष्ट मुख्य सार्टर यांस कळविली. त्या बरोबर त्यानें सगळ्या सार्टरांस पिशवी कोणी ठेविली असेल तर द्या नाहीं तर मी ही गोष्ट पोलिसांस कळवीन असें सांगितलें तेव्हां आह्मांस ठाऊक नाहीं असें सगळ्यांनीं सांगितलें. नंतर पोलिसांनीं सर्वांचा झाडा घेतला तेव्हां ती पिशवी एका सार्टरापाशीं सांपडली. त्याच्यावर खटला होऊन त्याची चौकशी मॉजिस्ट्रेटा पुढें झाली. त्याच्यावर शाबिती झाल्यावर तीं पिशवी मी थट्टेनें ठेविली असें त्यानें मॉजिस्ट्रेटांस सांगितलें मॉजिस्ट्रेटास तें खरें वाटलें नाहीं ह्मणून त्यानें सदर सार्टरांस ९ महिने सक्त मजुरीची शिक्षा दिली.

शेरास सव्वाशेर. चिनी लोकांस युनायटेड स्टेट संस्थानांत ठेऊं नये असा एक कायदा युनायटेड स्टेटच्या पार्लमेंटा पुढें आणिला होता त्या बरोबर तुह्मी असा कायदा केला तर चिनांतील एकूण एक अमेरिकन लोकांस आह्मी हकून देऊं असें चिनानें युनायटेड स्टेट सरकारास पत्र लिहिलें त्या बरोबर युनायटेड स्टेट सरकारानें तो कायदा पास न करितां पहिलाच कायदा आणखी १० वर्षें चालूं ठेविला असें समजतें.

शु० सू०

हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं पिकणारा कापूस मुंबईंत एकसारखा येत आहे व युरोपांतील निरनिराळ्या बंदरीं चढविण्या करितां कापसाची खरेदी दिवसें दिवस वाढत्या प्रमाणावर आहे. कापसाच्या व्यापारास तेजी असल्या कारणानें ह्या महिन्याच्या सुरवाती पासून हरएक जातीच्या कापसाची किंमत दर खंडीमागें बरीच वाढली आहे.

लाहोरच्या सभोंवतालची मोठी भित जबरदस्त आहे तो पाडण्यास आरंभ झाला आहे. हें कारणें तेथील लोकांस चांगलें वाटत नाहीं.

अलवारचे महाराज वारल्या बद्दलचे दुःखकारक वर्तमान समजतें.

हिंदुस्थानांतील कलाकौशल्याचें प्रदर्शन येत्या दिसंबर महिन्याच्या सुमारास लाहोर येथें भरण्याचें ठरलें आहे. पंजाब सरकारनें उत्तेजनार्थ बरींच देणगी दिली आहे'

सुबोध पत्रिका

इराण राशियाच्या ताब्यांत जाईल व रशिया इराणास घरचा कुत्रा बनवील, हो निघालेलो अफवा कितपत ठाम होतें तें पहावें.

इंग्लिशांनीं इराणवाल्यास इंपिरियल व्यांकेतून लागेल तितकें द्रव्य देण्याचें कबूल केलें आहे. इंग्लिश कंपनीनें इराणातील तंबाखुचा मक्ता घेतला असतां तो राशियानें हाणून पाडून आपल्याकडे घेतला त्या बदल्यांत इराणवाल्यांनीं राशियाकडून व्यापारासाठीं त्याच्या हद्दीतील एक रस्ता खुला करून घेतला. तथापि इंग्लंडचे प्रधान मोठ्या चतुरपणानें वरील सर्व वेड फोडून टाकणार ह्मणतात.

मुंबईंत आजकाल व्यापारी लोकांत चांदी हा विषय मुख्य होऊन बसला आहे. ह्याचें मुख्य कारण असें सांगतात कीं, युरोपांत उभी रहाणाऱ्या लढाईचें भय, टर्कीचा शिरच्छेद करण्याच्या संबंधानें उठलेली अफवा तसेंच राशियाची हिंदुस्थानावर येणारी दबड अशा अनेक कारणानें चांदीचा बाजार गोंधळून गेला आहे. चालू हिंदुस्थानच्या स्थितीवर दाखविलेलीं कारणें काळरुपोंच समजलीं पाहिजेत. म. मि.

ज्याच्या वादांत लाखो रुपये घालविले तो हिरा निझाम हे आतां उघड लिलावानें विकणार आहेत असें सांगतात! यांत किंमत काय येईल हें दिसतच आहे, पण यावरून वादाच्या अंतीं तो हिरा त्यांनीं खुषीनें घेतला कीं काय याचें अनुमान होत असून असल्या राजांवर पोलिटिकल आफिसराचें वजन किती असतें याचेंही अनुमान होतें.

निझामाच्या पदरच्या एका रोहिल्यानें आपली बायको व तिचा यार यांचे खून केले. निझाम हैदराबादेस उष्णता फार असून पारा ११० अंशावर असतो.

हंना नागा यांचा राज्यकारभार इंग्रजी रेसिडेंटाच्या मताप्रमाणें चालू होणार. ह्मणूनच पोलिटि. आफिसरांस खरे राजे ह्मणावयाचें.

आह्मी बाजोरावर स्वारी करण्याचा हुकूम केलेला नाहीं असें अमिरानें हिंदुस्थानसरकारास उत्तर पाठविलें.

हिंदुस्थान सरकारच्या सांगण्यावरून अमिराच्या हुकुमानें उमरखानावर चालून जाण्याचें अकगाण कमांडरानें तहकूब केलें आहे, पण तो तहकुबी तुर्तची दिसते.

अमिराच्या फौजेस त्रास देणाऱ्या हजारा प्रांतांतील लोकांवर अमिराच्या फौजेनें स्वारी करून त्यांची पक्की खोडकी मोडली.

काबुलच्या अमिराचा खजिनदार जान महमदखान पटकीनें मरण पावला. पटकी जारीनें सुरू आहे.

शोर खिंडीतल्या लोकांत कांहीं चळवळ दिसत असल्यामुळें मुंबईच्या २ ऱ्या पलटणीचे कांहीं लोक रवाना झाले आहेत.

ठा० अ०

नोटीस.

रा. रा. रामचंद वल्लद नवलाजी पाटील मौजे मडाखेड तालुके जळगांव जिल्हा अकोलें. यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे रुपये मौजे वडाळेगांव व मौजे पिंपळगांव काळे येथील दुकानचे जे रुपये निघतील ते सर्व हिशेब करून नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचें आत देऊन निकाल करून जावे तसें न केल्यास आह्मी कोर्टें खुली झाल्याबरोबर तुमचेवर दिवाणीत फिर्याद करून नोटिसीचे खर्चासह भरून घेऊं. कळावे. ता. ३१ माहे मे सन १८९२ इ०

(सही)

देवकरण गिरधारीलाल तर्फे

मुखत्यार अनंत रामचंद्र

दस्तुर खुद्द.

नोटीस.

रा. रा. फकीरचंद वल्लद नवलाजी पाटील मौजे मडाखेड तालुके जळगांव जिल्हा अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे दुकानचे बाकी मौजे वडाळेगांव व मौजे पिंपळगांव काळे या दोन्ही दुकानचे रुपये तुमचे कडेस असून हा काळ पावेतों तुह्मी येऊन निकाल केला नाहीं करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत तुह्मी येऊन निकाल करून जावें तसें न केल्यास कोर्ट खुले होतांच फिर्याद करून नोटिशीचे खर्चासह भरून घेऊं. त्याबद्दल तकार ऐकणार नाहीं. कळावें. ता. ३१ माहे मे सन १८९२ ईसवी मुक्काम पिंपळगांवकाळे

(सही)

देवकरण गिरधारीलाल तर्फे

मुखत्यार अनंत रामचंद्र

दस्तुर खुद्द.

अकोला बाजारभाव.

हुंडी मुंबईची दर्शनी १००-॥

" १५ दिवसाच्या मुदतीची ९९॥=

सुवर्ण २५॥। रुपे १०८। आळशी ९९।

गहूं कठे ७० बनशी ७७॥

जवारी ४८ सकीं ५॥-

कापूस ३७ रुई १४

मीठ ३॥= तूप ८॥= तेल ५॥=

सध्याचे भाव. (मोंगलाई)

जवारी	बसंत	१९४९	४५॥=।
गहूं	वैशाख शुद्ध	१९४९	६५।=
आळशी	चैत्र शुद्ध	१९४९	८६॥
सकीं	वैशाख नवे सालची	१९४९	५।-
रुई	फालगून	१९४९	५५॥

शु० व०

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ,, ३ ,, ०८
सालअखेर ,, ७ ,, १०८
किरकोळ अंकास ०२

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly.....3 ,, 8 as
Single copy.....4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ०१

वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 13 JUNE 1892 NO 23

वर्ष २६ सोमवार तारीख १३ माहे जून सन १८९२ इ० अंक २३

नोटीस

अजान मर्द यादवराव पाटील वस्ती उंबर तालुके जळगांव हल्लीं वस्ती पाथरडी तालुके अकोट इजला:—

खालीं सही करणार जानराव वल्लद रामजी पाटील वस्ती उंबर ता० जळगांव याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, यादवराव हा माझा साक्षांत बंधु असून तो मरण पावल्यास आजमासें ३–४ महिने झालें असतील. आजपर्यंत आह्मी उभयतां बंधु एके ठिकाणींच होतो. तूं एक दोन महिने निराळी झालीस. सर्व जिंदगी एकें ठिकाणींच आहे मी घरांत वडील असून त्या संबंधानीं मीच कारभारी होतो. सावकार लोकांचे कर्ज वगैरे मी माझें हातांनीं आणलें तें सामाईक जिंदगीवर माझें नांवानीं आहे.

तूं जर आतां वेगळी राहण्यास पहातेंस तरी मी हिस्से स्थावर जिंदगीचे करूं इच्छित नाहीं. कारण तुजला पुत्र संतान नाहीं. मुली दोन आहेत यांचें लग्नें करण्यास मी राजी आहे. व त्याच प्रमाणें हिंदुधर्म शास्त्रां आधारें तुजला अन्न मजला देण्याचा अधिकार आहे. व मी ही देण्यास राजी आहे. तूं जर फिर्याद केलीस तर ह्याच प्रमाणें [illegible] होणार आहे तर तू विनाकारण खर्चांत न बुडावें व खर्च तुजवर माझा न बसावा ह्मणून तुजला नोटिशीनें जाहीर केलें आहे करितां तूं जिंदगी कोणास खरेदी देऊं नये. व कोणी सावकारांनीं तुज पासून खरेदी किंवा गहाण किंवा पट्यांनीं घेऊं नये व तूं देऊं नये. कळावें तारीख ७ माहे जून सन १८९२ इ० सुरभाइजी राणोजी उमेदवार मुक्काम जळगांव.

(सही.)
जानराव वल्लद रामजी पाटील दस्तुर खुद.

नोटीस

स. रा. महादेवपुरी गुरू पुंडलिकपुरी राहणार मौजे वरखेड (माधव पाटलाचें) तालुके मलकापूर पोस्ट मोताळे यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी मला न नांदवितां दुसरी लग्नाची बायको केलीत. आज लग्न होऊन तेरा वर्षें झालीं तरी मी शहाणी झाल्या दिवसांपासून तुह्मी माझ्याशीं जन रीतीप्रमाणें संसार करीत नाहीं व मला सोडून दिलें आहे. तर तुह्मांस नवरेपणाचा हक्क राखण असल्यास आज दहा वर्षेंपर्यंत पोटगी निमित्त झालेलें कर्ज ४००रु. देऊन माझ्या वडील माणसाची खात्री करून आठ दिवसांचे आंत नांदविण्यास घेऊन जावें. तसें न केल्यास हीच फारकती समजून दुसरा घरठाव करीन व कर्जाची फेड कोर्ट मार्फत करून घेईन. कळावें. तारीख ५ जून सन १८९२ इ०

(सही)
राधिका जवजे महादेव पुरी रहाणार जामठी ता. भुसावळ इच्या हातची निशाणी बांगडी असे.

पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मु. वाशीम ता. ४।६।९२

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस:—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० दोन तीन दिवसांपासून उष्मा अतिशय होतो. आकाश ढगांनीं भरून गेलें आहे. दिशा उदास दिसतात दोनप्रहरीं किंचित ऊन फार कडक पडतें. अशा प्रकारचे हवेचें मान झालें आहे. पर्जन्याची सर्व चिन्हें झालीं आहेत. मृगाची सुरुवात होतांच पर्जन्यकाळ सुरू होईल असें दिसतें. रोहिणी लागल्यावर दोन तीनदां थोडी थोडी वृष्टि झाली. तेणेंकरून कुणबी लोकांना शेतीची जमीन तयार करण्यास सोपें जात आहे. धारण महाग होत चालली आहे. आंबे तर मनस्वी बाजारांत येतात. जिकडे तिकडे आंबेच आंबे होऊन गेले आहेत. असें आंब्याचें पीक बऱ्याच दिवसांत नव्हतें. असें लोक बोलतात. पांचचार दिवसांपूर्वीं कुजके नासके आंबे विकूं नये अशी गांवांत दवंडी झाली परंतु दवंडीचा परिणाम झाल्याचें दिसत नाहीं. कारण बाजारांत कुजके नासके आंबे विकण्या करितां बसतात. ते गरीबगोरीब घेतात. अमलवारी नाहीं तर दवंडी देण्यांतच हाशील काय? तळ्याचें पाणी धुण्याकरितां मोकळें केलें होतें. परंतु पाणी पडलें थोडें. पडलें एके ठिकाणीं जमा झालेलें. यामुळें त्याजला दुर्गंधी येऊं लागली. व कदाचित् रोग उत्पन्न होईल अशा भीतीनें धुणें बंद करण्यांत आलें असें समजतें. व तळ्यांतील नासलेलें पाणी बंबानें उपसून टाकणार असें लोक बोलतात. येथील म्युनिसिपालिटी फार गरीब आहे. कारण हिचें उत्पन्न फार थोडें आहे. वऱ्हाडांतील इतर म्युनिसिपालिट्यांचें उत्पन्न फार आहे. त्यांनीं आपापल्या हद्दींत प्राथमिक शिक्षणाचा बोजा संभाळला आहे. परंतु आमच्या गरीब म्युनसिपालिटीला उत्पन्न नसल्या कारणानें प्राथमिक शिक्षणाचा खर्च देण्यास ऐपत नाहीं. व कोणी बड्या साहेबानें ह्या बाबतींत विचारणा केल्यास खालीं पहावें लागतें व आह्मी गरीब आहोंत असें ह्मणावें लागतें. तो प्रसंग टळावा व म्युनिसिपालिटीचें उत्पन्न कांहीं तरी वाढावें या करितां घरपट्टी सुरू करण्याचा विचार आहे. ह्या बाबतींत नियम वगैरे होऊन मंजुरात वगैरे मिळाली असें लोक बोलतात हें जर सर्व खरें ठरून. त्याची अमलवारी झाली तर गरीबगुरीब लोकांस त्रास होईल खरा. परंतु उत्पन्न वाढल्यास ती रकम गांवातील एखाद्या कामाकडे लावितां येईल. ह्या गांवीं पाण्याचें मोठें दैन्य आहे देवपेठेंत काय तें पाणी विपूल असतें. बाकी सर्वत्र अडचण आहे. शुक्रवार पेठेंत तर सर्वकाळ पाण्याबद्दल हाकाहाक असतेच. शुक्रवारांत हजार अकराशें घरांची वस्ती आहे. मारवाडी, शेटसाहुकार तिकडेसच पुष्कळ राहतात. ही पेठ प्राचीन आहे. परंतु पाण्याच्या दुर्भिक्षामुळें ती मोडत चालली आहे. ती मोडल्यानें गांवचें भूषण कमी होईल. करिता म्युनिसिपालिटीनें एकादें तळें बांधून अगर दुसऱ्या कोणत्या तरी रीतीनें पाण्याची तजवीज करावी ही चांगली गोष्ट आहे. म्युनिसिपालटी ह्मणज लोकल सेल्फ् गव्हर्नमेंटचा पाया आहे हें एका गांवाचें छोटसें राज्यच आहे. ह्या राजांतील प्रजेला सुखी ठेवणें, त्यांच्या अडचणी दूर करणें, गांवांची स्थिती सुधारणें व नांव लौकिक मिळवून हें लहानसें राज्य चालविण्यास आपण अगदीं योग्य आहेत असें दाखविणें हें ह्या लहानशा राज्यातील चालकांचें कर्तव्य कर्म आहे. नुसते नांव दाखल झालें ह्मणजे त्यांतच [illegible] मानतों कामा नये. येथें ग्रेन मार्केट नाहीं, काटनमार्केट नाहीं, [illegible] ण्या विषयीं म्युनिसिपालिटीनें अवश्य विचार करावा. ह्या दोन बाबी पासून उत्पन्नाची बाब हो वाढेल. हल्लीं येथें दोन तीन जिनिंग फॉक्टरीज झाल्या आहेत. गांवाला हळूंहळूं महत्व येत चाललें आहे. गांवांत कित्यक निवडक मंडळी असतें त्यांच्या कडेसच अशा सुधारणा करण्याचें असतें. कोणत्याही ठिकाणीं सर्वच शहाणे व हितकर्ते असतात असें होत नाहीं. व पुढेंही व्हावयाचें नाहीं. अकोलें येथील म्युनिसिपालिटी इतकी महत्वास चढण्यास तेथील विद्वान, कायदे पंडित, सुखवस्तु लोक आणि वजनदार व्यापारी यांचेच अविश्रांत श्रम कारण होत

येथील सिव्हिल हास्पिटल मधील क्लार्क यांची बदली उमरावतीस सॅनिटरी कमिशनर साहेब बहादूर यांचे कचेरींत झाली. नवीन क्लार्क अजून नेमून आला नाहीं. येथील इंग्रजी मराठी शाळेंत दोन जागा पुष्कळ दिवसां पासून खालीं होत्या त्या एकदांच्या भरल्या.

मे. अंबादास संतो ए० अ० कमिशनर याची स्वारी सिव्हिल काम सुटी निमित्त बंद झाल्या पासून तालुक्यांत तालुका आफिसर या नात्यानें फिरत आहेत यांचे सारसारखा काम करणारा हुशार मेहनती असा आफिसर या जिल्ह्यांत पूर्वीं कधीं झाला नाहीं. असें लोकांचें ह्मणणें आहे. यांना सरकारी काम एकाग्र चित्तानें व निष्ठेनें करण्यास अती आनंद वाटतो. हल्लीं उन्हाच्या दिवसांतही फिरण्याचें श्रम ते फार घेतात. जरी हे वयातींत आहेत तरी कामांत तरुणाचेही यांचे पुढें कांहीं चालत नाहीं. हे येथें आल्या पासून लोकांचें कामाचा भराभर निकाल होऊन लोक आनंदांत आहेत.

येथील माजी चीफ कान्स्टेबल हे मुकदम्यांत सांपडलें होते त्यांची बदली बिटर गांवाकड झाली व तिकडून इकडे मि. खंडेराव नांवाचे चीफ आले आहेत. हे हुशार आहेत व नियमा प्रमाणें सरकारचें काम करण्यांत फार झटतात असें त्यांचे प्रकृती वरून दिसते. मि० सायना हे बुलढाण्याहून आपलें खटले नेण्या करितां रजा घेऊन येथें आले आहेत. थोडक्याच दिवसांनीं हे परत जातीलच.

येत्या वकिलीचे परीक्षे करितां ह्या जिल्ह्यांतून दोन इसम जात आहेत. पहावें कोण यशाचा विडा उचलतो.

आपला एक
" क्ष "

बरार रूरल लॉ.

(२२ वें अंकावरून पुढें चालूं.)

१७. निवडले जाणाऱ्या मेंबरांची ठरीव संख्या जर निवडली [illegible] असलेल्या जागा नेमणुकीनें भरणें.—

निवडले जाणारे मेंबरांची ठरीव संख्या जर निवडणारे निवडणार नाहींत तर रिकाम्या असलेल्या जागा नेमणुकीनें भरल्या जाव्यात. पण असें नेमलेले मेंबरांची संख्या बोर्डांतील एकंदर संख्येच्या निमे पेक्षां जास्त नसावी.

१८. निवडलेल्या व नेमलेल्या उमेदवारांचीं नांवें रेसिडेंसी आरडर्समध्यें प्रसिद्ध करणें:—

कोणत्याही निवडीचें काम पूर्ण झाल्यावर निवडले गेलेले उमेदवारांचीं नांवें रेसिडेंसी आर्डर्स मध्यें प्रसिद्ध होण्याकरितां कमिशनरचे मार्फतीनें रेसिडेंट साहेबाकडे पाठवावीं. नियम १ किंवा ९ अन्वयें कमिशनरांनीं नेमलेल्या प्रत्येक उमेदवाराचें नांव वेळोवेळीं रेसिडेन्सी आरडर्स मध्यें प्रसिद्ध करावें. कोणत्याही मेंबरानें त्याचें नांव अशा प्रकारें प्रसिद्ध होई पर्यंत कामावर रुजूं होऊं नये.

१९. जिल्हा बोर्डाची रचना.

(१) मुलुक अमानी हैदराबादेंतील कोणत्याही जिल्ह्यांत जिल्हा बोर्डाच्या निवडलेल्या व नेमलेल्या मेंबरांची एकूण संख्या व प्रमाण जरूरी प्रमाणें वेळोवेळीं रेसिडेन्ट साहेब ठरवितील.

(२) मुलुक अमानी हैदराबादेंतील प्रत्येक जिल्ह्यांतील जिल्हा बोर्डांत निवडलेल्या व नेमलेल्या मेंबरांची संख्या असण्याची ती दुसरा हुकूम होईपर्यंत या नियमास जोडलेल्या परिशिष्ट अ. यांत दाखविल्या प्रमाणें असावी. प्रत्येक तालुक बोर्ड हें एक निवडणारें मंडळ होईल व एखाद्या तालुक बोर्डाचा कोणताही मेंबर जिल्हा बोर्डांत

रहाण्याकरितां निवडला जाण्यास योग्य होईल.

परंतु जिल्हा बोर्डाच्या प्रत्येक मेंबरानें ज्या तारखेस तो मेंबर झाला त्या तारखे पासून तीन वर्षें संपल्यावर जागा खाली केली पाहिजे. परंतु पुन्हा निवडण्यास किंवा पुन्हा नेमण्यास तो लायक आहे, व त्याचे जागीं नेमलेल्या इसमाचें नांव याप्रुढें सांगितल्याप्रकारें रेसिडेंसी आरडर्स मध्यें प्रसिद्ध होईपर्यंत त्यानें आपले जागेचें काम करण्याचें चालूं ठेवावें.

पुढें चालेल.

मिती ज्येष्ट वद्य ३ शके १८१४

पुण्यास मिशनरी लोकांच्या सभेस जाऊन कांहीं कांहीं शिष्ट संभावित ब्राह्मणांनीं चहाबिस्कुटें खाल्लीं म्हणून त्यांजवर ग्राम्य प्रकरण चालून अखेरीस जगद्गुरु शंकराचार्यांच्या कडून आलेल्या शास्त्रिद्वयांनीं प्रायश्चित्तें सांगून त्या त्या गृहस्थांस पावन होण्याचे मार्ग दाखविले. वरील प्रकरणांत प्रायश्चित घेणाऱ्या मध्यें रावबहादुर महादेव गोविंद रानडे, चिंतामण नारायण भट आदिकरून सुधारणापक्षाचे शिरोमणि होते. इंग्रजी विद्येचा सुसंस्कार ज्या गृहस्थांवर आहे, सुधारणापंथ ज्यांनी स्वतंत्र काढिला आहे, ईश्वरोपासनचे मार्ग ज्यांचे प्रार्थनासमाजा सारख्या भिन्न संस्थांनीं निर्दिष्ट आहेत अशा विद्यासंपन्न, समाजाग्रणी व स्वतंत्र विचाराच्या लोकांनीं ग्राम्यांच्या प्रकरणांत प्रायश्चित्तें घ्यावीं, निरनिराळ्या जातींचा बीमोड न करितां आपल्या ज्ञाताज्ञात दोषांचें निरसन करून ज्ञातीविषयक बंडाव्यास बळकटी आणावी, आणि जुन्या धर्मशास्त्राच्या आज्ञा धर्मवेड्यानें पाळून धर्मांचें स्तोम माजवावें हें नवल आहे! सुधारणा पक्षाच्या लोकांनीं वरील पांडित्यप्रकर्ष मूळच्छेदी केला असें आम्हास वाटतें. धर्माभिमानी लोकांस सुधारणापक्ष नावडू नये, त्यांनीं इतर सुधारणागामी लोकांचा छळ करूं नये आणि सुधारणा धर्मसंमत व शास्त्रविहित आहेत असें सर्वांस वाटावें म्हणून रानडे प्रभृति सुधारक मंडळी प्रायश्चित्ताच्या पेचांत पडली असें रानडे व भट यांचें म्हणणें आहे. 'मित्र भोजनें व प्रीतिभोजनें' ज्या लोकांत चालतात त्यांनीं प्रायश्चित्तें घेतलीं अगर न घेतली सारखेंच आहे. प्रायश्चित्त म्हणजे खरोखर चवलीभराचें काम आहे आणि त्या खर्ची पलिकडे त्यांत हांशील नाहीं असा प्रायश्चित्ताचा अर्थ घेऊन चालणाऱ्या गृहस्थांस महा प्रायश्चित्त दिलें तरी तो सारखाच शुद्ध अगर अशुद्ध राहणार आहे. पश्चात्तापमूलक प्रायश्चित्त असलें पाहिजे आणि पुनरावृत्ति प्रायश्चित्ताची न झाली पाहिजे तरच त्याची सार्थकता होय. आपल्या धर्मसंस्था मोडकळीस आल्या आहेत आणि त्यांस काडीची सत्ता नाहीं तेव्हां त्या कालवरीं करून लपास जातील यांत संदेह नाहीं. तेव्हां अशा विगतवैभव व निःसत्व धर्मसंस्थेचा रानडे प्रभृति लोकांनीं प्रायश्चित्तें घेऊन मान राखला यांत त्यांचें गौडबंगाल आह्मांस अगदीं विपरीतपणाचें भासतें. धर्म. ऱ्हासास हातभार लावावा एतदर्थ हा प्रयत्न दिसतो आणि सांप्रतच्या स्थिती वरून तो ऱ्हासकाल समीप येईल तितकें बरें. वरील सुधारकपक्षाच्या सुधारणा आम्ही सन्मान्य केल्या तरी देखील ख्रिश्चियन धर्मी प्रमाणें स्वैरवर्तन, भक्ष्याभक्ष्यतेविषयीं विचारशून्यता, ज्ञातिविध्वंसक एक बंधुत्व मूर्तिपूजेचा लोप, ईश्वरोपासनेचीं प्रार्थनालयें इत्यादि गोष्टी आह्मांस प्राप्त होईपर्यंत हीं सुधारणेची इति कर्तव्यता आटोपणार नाहीं. सारांश हिंदुधर्म कुच कामाचा झाला आहे. आणि तो सांप्रतच्या स्थितीस लागूं पडत नाहीं तेव्हां सुधारणेचे ध्वजस्तंभ म्हणजे रानडे प्रभृति लोक ग्राम्य प्रकरणांत शिरले व प्रायश्चित्तें घेतात यांत तात्पर्य एवढेंच कीं आपण चार चौघा प्रमाणें ब्रह्मवृंदापैकीं इसम आहों असें लोकांस भासवावें आणि आपले विचार इतरांनीं उचलावे. परंतु अशी कृति कितपत सफल होईल याबद्दल आह्मांस मोठी शंका वाटते. मात्र अशा कृतीनें सुधारणेच्या क्रमाला अडथळा न येवो म्हणजे झालें. हिंदुधर्मांत प्रायश्चित्तानें वाटेल त्या भ्रष्ट व पतित मनुष्यास पावन करून घेतां येतें परंतु खरोखर प्रायश्चित्ताचा खरा अर्थ न समजणाऱ्या लोकांस पवित्र करितां येईल किंवा नाहीं हा प्रश्न आहे. पुन्हा वेळ जमून आली तर चहा बिस्कुटें खाऊन ही भ्रष्ट मंडळी प्रायश्चित्त घेण्यास तयार झाल्यास बहिष्कृतीची शिक्षा सांगू[illegible] होता. किंवा परधर्मी लोकांचीं चहा बिस्कुटें खाण्यांत पापपुण्य कांहीं नाहीं तेव्हां धर्माची ही खटाटोप बिलकुल नको असें म्हणून हा वाद सुधारक मंडळीनें अंगा बाहेर टाकण्यास पाहिजे होता; परंतु या ग्राम्यांतील सर्व प्रकारच विचित्र आहे.

राव बहादुर रानडे व भट प्रभृति लोकांनीं ज्या तत्वावर प्रायश्चित्त घेतलें व इतर लोकांच्या गळ्यांत सुधारणेची माळ न कळत घालण्याचा प्रयत्न केला त्या तत्वाची परिस्फुटता व प्रकाशन त्यांनीं वर्तमानपत्र द्वारां केलें ही मोठी चूक त्यांच्या हातून घडली असें म्हणण्याचें आह्मी धाडस करितों. खरोखर सुधारणाचक्राला अनुसरूनच जनसमुहाची गति आहे तिला त्वरित करण्यासाठी त्यांनीं जो उद्योग केला त्याच्या सफळते साठीं त्यांचा वर्तनक्रम गुप्ततेला धरून व्हावयला पाहिजे होता. कांहीं गोष्टी अशा असतात कीं त्या उघड करून सांगितल्यानें लोकांस रुचत नाहींत व ज्या गोष्टी लोकांनीं सहजीं आपोआप स्वीकारल्या असत्या त्यापासूनच लोक प्रतिपक्षांच्यां दांभिक वर्तनानें व अप्रिय वचनानें परावृत्त होत असतात.

चालूं महिन्याच्या अखेरीस पार्लमेंटची सभा बरखास्त होऊन नवीन पार्लमेंटांत येणाऱ्या सभासदांच्या निवडानिवडीची जंगी धांदल सर्व ग्रेटब्रिटनभर उडेल असा अंदाज दिसतो. या नव्या पार्लमेंटांत कानसरव्हेटीव आणि लिबरल या दोन पक्षा पैकीं कोणत्या पक्षाची सरशी होईल हें ठरविण्यासाठीं जो तो आपापल्या अनुभवाप्रमाणें भाकितें करीत आहे. विलायतच्या लोकांस या निवडानिवडीचें महत्व विशेष आहे कां कीं या निवडानिवडीच्या निकालावर राज्यकार्यसूत्रें एका पक्षाकडील प्रधान मंडळाच्या हातीं येणार असतात आणि जो पक्ष प्रधानकीच्या अधिकाराला बहुमतानें पात्र ठरेल तत्पक्षीय लोकांस आपल्या राष्ट्राच्या हिताहिताच्या प्रकरणा संबंधानें नेहमीं राज्याचे मंत्रि त्यांचे पुढारी लोक असतात त्यांस पाठबळ आपल्या मताधिक्यानें पुरवावें लागतें. कोणत्याही पक्षाची वरचढ झाली तरी वास्तविकरीत्या हिंदुस्थान देशाला त्याविषयीं हर्ष किंवा विषाद वाटण्याचें प्रयोजन नाहीं परंतु विलायतेस राज्यप्रकरणीं भिन्न भिन्न विचाराचे निरनिराळे पक्षप्रतिपक्ष आहेत त्यांच्या विचाराच्या दिशेबरहुकूम हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत चळवळी होत असतात तेव्हां प्रधान मंडळ ज्या मतानें वागणारें असतें त्याच मतांच्या धोरणानें आपले पक्षाचे लोक ही प्रधानमंडळी हिंदुस्थानच्या राज्यनौकेवर कर्णधार नेमितात आणि सर्व अष्टाधिकार विलायतेहून आपल्या कलाप्रमाणें त्या त्या कर्णधारा मार्फत चालवितात. असा वास्तविक प्रकार असल्यामुळें आमचें हिताहित या निवडानिवडीच्या निकालावर पुष्कळ अवलंबून असतें. उदारप्रवृत्तीचें, लोकमतानुचारी वर्तनांचे, लोककल्याणकारी स्वभावाचें, आणि नृपाधिकार वर्चस्वाला योग्य दिशा देणारें असें मंत्रिमंडळ अधिकारारूढ झालें तर त्या योगें आमच्या देशाचाही लाभकाल येतो असें अनुभवास आलें आहे. लार्ड सालिसबरी [illegible] महाराणा सरकारचे मंत्री बनले तेव्हां पासून हिंदुस्थानच्या प्रजे संबंधानें कोणी काळजी वाहिली नाहीं. उलटें आमच्या देशांत जुलूमी अंमल, इंग्लिश लोकांचा पुळपुळाट, नेटिवांच्या हक्कांची पायमल्ली, खजिन्यावर विलायतनें सपाट्यानें चालविलेली लूट, परकीयांचें वैभव व नेटीवांची विपन्नावस्था इत्यादि गोष्टी राज्यकारभाराच्या प्रकरणांत ढळढळीत दिसून आल्या आहेत. तेव्हां सारांश या नव्या पार्लमेंठाच्या मंत्रिमंडळावर आमचें सर्वस्व अवलंबून आहे, आमच्या सर्व मनोरथांची फलद्रूपता पार्लमेंटच्या नव्या निवडीवर थोपून आहे आणि आमचा आशावृक्ष वृद्धिगत पावेल किंवा खुंटला जाईल हेंही त्या धांदलीच्या परिणामावरून ठरणार आहे म्हणून पार्लमेंटच्या नव्या निवडी संबंधाच्या गोष्टी आह्मी फार मन लावून वाचतो. शिवाय हिंदुस्थानांत राष्ट्रीय सभा चिरकाल झाल्या पासून येथील अधिकाऱ्यांस नेटिवांची उन्नति सहन होत नाहीं ती इतकी कीं राष्ट्रीय सभेचा पक्ष व हिंदुस्थान सरकारचा पक्ष असे दोन परस्पर विरोधी स्वतंत्र तट बनले आहेत, विलायतेंतही राष्ट्रीय सभेच्या पोट शाखेनें हिंदुस्थान देशाची पार्लमेंटांत मोठी उचल केली आहे आणि पार्लमेंटाच्या वादग्रस्त प्रकरणांत या देशाचें कल्याण चिंतणाऱ्या थोर महात्म्या पुरुषांस हिंदुस्थानचा राज्य कारभार एक वादविषयक प्रकरण सामील करण्याची संधी अद्याप मिळाली नाहीं तरी त्याच्या सतत उद्योगानें हिंदुस्थानच्या राज्य नीतीवरील विचाराच्या निराळेपणावर पार्लमेंटांत देखील दुफळ्या होतील अशी आम्हांस उमेद आहे आणि तिसरें, कांहीं हिंदुस्थानचे खरे हितचिंतक पार्लमेंटात शिरण्या विषयीं उद्योग करीत आहेत व त्यांच्या प्रयत्नाला जितपत यश येईल तितपत हिंदुस्थानची बाजू यशस्वी झाली असें होईल तेव्हां या नव्या पार्लमेंटाच्या निकालावर आमच्या देशाच्या अनंत गोष्टी बऱ्या वाईट परिणामास लागणार आहेत म्हणून आम्ही लिबरल पक्षाची मि० ग्लाडस्टन यांच्या अध्यक्षते खाली सरशी होवो असें मना पासून इच्छितों. लिबरल पक्षानें कानसर व्हेटिव पक्षा पेक्षां हिंदुस्थानची अधिक कचकळ बाळगून पुष्कळ प्रकारें या देशांतील राज्यकारभारास सुदिशा लाविली आहे म्हणून लिबरल पक्षाला यशश्रीनें माळ घालावी अशी सहजी मनाची धांव जाते. जुलै महिन्याच्या मध्यंतरी नव्या पार्लमेंटची निवडा निवड पूर्ण होऊन सभा स्थापिली जाईल असा सुमार आहे. महाराणी सरकारच्या हयातीतलें हें नवे पार्लमेंट बारावें पार्लमेंट होय. ही पार्लमेंट नव्यानें बसली म्हणजे येत्या दिसेंबरांत अलाहाबादेस राष्ट्रीय सभा भरेल त्यावेळीं विलायतेस पुढील सार्वी सभा भरविण्या विषयीं ठरविण्याचें आहे. त्या गोष्टी बद्दल चार पांच महिने विचार करून एका निर्णयाला येण्यास सर्व राष्ट्रीय सभेच्या सभासदांस ठीक पडेल. ही विलायतची मोहिम आम्हीं करणार आहों ती देखील पार्लमेंटांतिल प्रधान मंडळाच्या नोकऱ्यांका प्रमाणें करण्यांत कांहीं लम्पांश आहे. असें. ईश्वरावर हवाला सोंपवून निश्चित बसावें हें बरें.

अकोल्यास श्री लक्ष्मीनारायणाचें एक रमणीय, भक्कम, व श्रीमंत मंदीर श्रीमती चुन्नाबाई अगरवाले यांनीं बांधलें आहे. नवें देवालय असून अकोल्यांतील देवालयामध्यें याचा पहिला नंबर लागेल. विहिरी, तलाव, धर्मशाळा, पाठशाळा व देवालयें स्थळोस्थळीं आपापल्या ऐपती प्रमाणें मनुष्यानें बांधावीं अशी आपल्या जुन्या लोकांची म्हण आहे आणि तीं बांधणें म्हणजे परलोकसाधनाचा व मोक्षप्राप्तीचा उत्तम मार्ग खुला करणें असें श्रद्धाळु व धर्मनिष्ठ लोक मानतात. ईश्वरवादी लोकांचीं तत्वें नास्तिकास न आवडोत तरी वरील प्रमाणें धर्मकृत्यें औदार्यशाली धार्मिक लोकांनीं केलीं आहेत व त्यांचा तो उद्योगक्रम चालूं आहे म्हणूनच हिंदुस्थान देशाच्या वैभवास व शिल्पकलेस सर्व लोक माना डोलवितात. साधारणपणें हीं धर्मकृत्यें आपणास पाहिजे आहेत तरी कालस्थिती प्रमाणें आपल्या कित्यांत फरक केला पाहिजे. सांप्रत दळणवळणाच्या सोयी व सार्वजनिक उपयोगाचीं नानाविध गृहें प्रचुर झालीं आहेत तेव्हां धर्मकृत्यास आरंभ करण्यापूर्वी आवश्यक व अत्यंत उपयोगाच्या गोष्टी पाहून त्या करण्याकडे लोकांचा कल बदलला पाहिजे आणि तो तसा बदलला नाहीं हें या मंदिरावरून वाटतें. अकोल्यास देवालयें आहेत त्यांचीच सुव्यवस्था नाहीं तेव्हां नव्या देवालयाची आह्मांस आवश्यकता नव्हती. परंतु ज्या अर्थी हें सत्कार्य पूर्णतेस पोंचलें आहे त्या अर्थी त्याचे संस्थापक व मालक मंदिराच्या चिरस्थायीपणा साठीं व देवाच्या पूजार्चना साठीं योग्य, सततचा, व अव्याहत अशी व्यवस्था करून खर्चासाठीं

अक्षय्य उत्पन्नचा जमीनजुमला व इतर जिन्नगी हीं देवाप्रीत्यर्थ वेळेवरच अर्पण करितील असें आम्ही इच्छितों.

सदर्हू लक्ष्मीनारायणाच्या मंदिराची माल कीण चुन्नाबाई व त्यांचे बंधु व मंत्रि शेट बनसीलाल फकीरचंद हीं उभयतां उदारशील, संपत्तिमान व लौकिकसंपन्न आहेत. त्यांनीं हें सत्कृत्य केलें या बद्दल अकोलेकरांच्या तर्फेनें आम्ही त्यांचे आभार मानतों. त्यांनीं ही जी ईश्वर सेवा केली आहे तिच्या परिपूर्णतेच्या यशप्राप्ती साठीं आम्हीं त्यांस एक सूचना करित आहों तिजकडे त्यांचें अवधान जाईल अशी आम्ही उमेद बाळगतों. बहुत खर्चाची इमारत बांधून व सुंदर व कुशल कारागिरीच्या मूर्ति स्थापून त्यांनीं तींत पाठशाळे सारख्या गोष्टीला मुबलक जागा काढली आहे तिचा तसा उपयोग होईल अशी तजवीज करावी. आणि देवालयांतून एक मोठा उत्पन्न असते ती ही कीं तेथें धर्मविषयक ग्रंथसंग्रह नसतो तर आमचें असें म्हणणें आहे कीं, त्यांनीं धर्मविषयक शास्त्रें, पुराणें, कथानकें, इतिहास, इत्यादि संस्कृत व मराठी उपलब्ध ग्रंथांचें पुस्तकालय आपल्या मंदिरास नवें जोडावें. अशा सत्कार्यानें एक जंगी पुस्तकालय स्थापलें जाऊन ग्रंथपठणाची निराणी सोय होईल, मंदिरा प्रीत्यर्थ केलेल्या खर्चाचें चीज होईल व धर्मकृत्याचें महत्व व मातबरी लोकदृष्ट्या वाढेल. ही सूचना पुण्यशील चुन्नाबाई व शेट बनशीलाल यांनीं अवश्य विचारांत घ्यावी असें आम्ही आग्रहपूर्वक सुचवितों आणि त्यांनीं त्या प्रमाणें एक पुस्तकालय काढलें तर त्यांचा व त्यांच्या घराण्याचा नांवलौकिक व कीर्ति हीं या नव्या गोष्टीच्या अश्रुतपूर्वतेनें व उपयुक्ततेनें चिरकाल बऱ्हाडांत कायम राहतील.

इंडिया कौंसिल बिल हाऊस आफ कामन्स मध्यें पसार झालें तेव्हां महाराणी सरकारचें अनुमोदन दाखल झाल्या नंतर तें हिंदुस्थानचा कायदा होईल. त्या योगें आपणांस तीन मोठ्या गोष्टी लाभल्या आहेत. कायदे कौंसिलांतील सभासदांची संख्या वाढली, बजेटावर वादविवाद करण्याची परवानगी मिळाली आणि राज्य प्रकरणांत प्रश्न करून खुलासा करून घेण्याचा हक्क कौंसिलदारास दिला या तीन नव्या गोष्टी होत. आम्हास ऊमेद आहे कीं व्हाइसराय साहेब लार्ड लान्स डाऊन हे वरील कायदा योग्य प्रकारें अंमलांत आणून आपल्या कारकिर्दीची अखेर गोड करून पंचवीस कोट प्रजेचा दुवा घेतील.

मि. ए. ओ. ह्यूम यांच्या जगप्रसिद्ध सरक्युलरानें ब्रिटिश कांग्रेस कमिटींत वादांग निघालें व त्या मुळें फाटाफूट होण्याची भिती होती ती लयास गेली. ह्यूम साहेबांच्या त्या खऱ्या परंतु अप्रिय स्पष्टोक्तीची सरकार दरबारांतून शहानिशा होऊं लागली आहे आणि तेणें करून त्या थोर कीर्तीमान, व लोककल्याणकारी पुरुषा वरील राजद्रोहाचें अरिष्ट नाहींसें होत जाऊन त्यांची लोकमान्यता उत्तरोत्तर वाढत आहे.

तिसरी आनंदाची बातमी कीं अल्हाबादच्या येत्या राष्ट्रीय सभेच्या समारंभाची तजवीज उत्तम प्रकारें व मोठ्या जलदीनें चालली आहे. पंण्डित विश्वंभरनाथ, मि. हावर्ड- आणि राजा रामपालसिंग यांनीं सभा भरवून वर्गणी गोळा करण्यास आरंभ केला आहे. सद्गृहस्थांनींच तीन हजारावर रुपये जमा होत आले. तेव्हां पंण्डित अयोध्यानाथ यांच्या पश्चात राष्ट्रीय सभा पूर्वी पेक्षां टोलेजंग थाटावर होत आहे हें तिकडील लोकांच्या राष्ट्रसेवापरायणतेस व पूर्व लौकिकास मोठें भूषणाहें असून लोकादरास पात्र आहे.

The Berar Samachar

MONDAY, JUNE 13 1892

In a province like Berar which is purely agricultural the state of the peasantry is a point of serious notice. Whatever gaudy and roseate prospects we may entertain for the general mass of agriculturists some facts are patent to our mind that the agriculturist is over head and ears in debt and the land is passing gradually to the money-lender. Our popular Commissioner is not convinced of the growing poverty of the people and he is doubtful as to the harm that may follow such a transfer of land if there be any. But we shall simply request him to leave open the problem to discussion and expect him to come to a decision in due course with the wide and varied experience which his recent and permanent elevation to the Commissionership of Berar will afford him ample chances to acquire. A thorough going and many-sided inquiry is needed to determine the state of the ryots and we hope Col. Mackenzie will propose a public commission of selected persons of vast and sound knowledge of the province. The Madras Government has effected a move in this matter and has issued recently a valuable document on the material prosperity of that presidency. Something of the kiud might be done with regard to Berar; and that is most important now when a new survey is in progress, the draft of a Land Revenue code is under consideration, and an agricultural relief act is being legislated for other provinces. The late Resident Sir Dennis Fitzpatrick has drawn attention to the alarming effects that would ensue if there were such changes at work likely to upset the primary aims of the Ryotwari system. A new department of the Director of Land Records and Agriculture is recently established in Berar and the general wish is that an investigation should be commenced by the Director about the common and general condition of the agriculturing classes in Berar. The first step in the right direction in a problem of the above nature is to collect right information from all sources available.

Mr. John Elliot the meteorological Reporter to the Government of India has drawn an elaborate, exhaustive and wellfounded forecast of the probable character of the approaching south-west monsoon. His memorandum is instructive and interesting in a number of ways. A student of logic may well learn from it how he should base his inferences upon the collection of known but indefinite and uncertain data and limit them with provisos founded upon the calculation of chances about those probable premises. There are three main circumstances that determine the monsoonish conditions in India. There is a constant and invariable connection of at least five sixths of the rainfall in India with the snowfall in the mountain districts bordering northern India, the features of the weather in India during the five months preceding the monsoon; and the local peculiarities in the Bay of Bengal and Arabian Sea. For the last twenty years the meteorological department in India has made a rapid advance in the knowledge of the first two premises while there are but few sources open to mark out the peculiarities of the last data. It is gratifying to note that the forecast of the last year, did represent, more or less fully the facts that occurred afterwards. Hence it is that we attach a great importance to the memorandum. It is highly useful to the Government as well as to the people. It is a warning that calls us to meet the probable events. There is nothing known for certain and probability is the only guide of human conduct. The higher advance of our knowledge in casting out the probabilities about the phenomena in heaven is a welcome event to the nation. It is pleasing and satisfactory to point out that in general the coming year seems to be a happy one though the antecedent conditions before the set of monsoon are unique in their nature. The large abnormal features of the present year are in almost every case the opposite of those of the premonsoon period of the preceding year. It is a probable event that the year to come will afford a relief from scarcity and famine. The following is a statement in regard to Berar &the Nizam's dominions which we quote in full:—

"Taking into consideration the probable strength of the Bombay monsoon and the position of the trough of low pressure, it is probable that the rainfall in Berar and the Central Provinces will be approximately normal in amount. It is more likely to be in excess in Berar and the north-eastern districts of the Central Provinces than in the intermediate districts.

Conditions are slightly less favourable in Hyderabad than in the Central Provinces, but it is on the whole probable that that State will receive normal rainfall, or, if deficient, that the deficiency will not be large or important."

—0—

Sir William Digby who is a candidate at the next election and an active member of the British Congress Committee is renowned for his wide interests and large minded sympathies about the millions of the people of India. His attempta are ever directed to rouse his countrymen to their duties to our people. He has lately written a stirring, satirical, and highly truthful letter which teems in with reflections that are worth a pleasant study of some leisure hours. India is not for the Indians but for the Englishmen—this is the main drift of his letter. About the late resolution passed by the Government of India on the report of the Public Service Commission he has epigrammatically remarked ic a note that runs as follows:—

"Cheated" (thanks, Lord Lytton, for the word) out of 227 opportunities of rising to the highest offices in India save the Viceroyalty and the Governorships of Madras and Bombay, the Indian people are offered 86 minor posts! When we are dealing with the people of India, even the provisions of an Act of Parliament are held of no account, and Viscount Cross treats a statue as so much wastepaper. There is neither soul nor honour remaining in the present Parliament; otherwise Lord Cross's conduct would be impeached, and his policy reversed. The Secretary of State for India may, however, be assured that in the new Parliament his policy in this and in other respects will be relentlessly impeached. If a love for fair play and justice still exists among Englishmen his lordship's treachery towards the Queen's Indian subjects will be set aside and fair conduct take its place."

बऱ्हाड

हवामान — मृग नक्षत्राचे दोन चांगले पाऊस सर्व प्रांतभर झाले. त्या मानानें हवेंत शीतळाई आली आहे. वारा बराच सुटतो. आकाश ढगांनीं व्याप्त असतें. पटकीचा उपद्रव वाढून कांहीं मनुष्यें मरण पावलीं तरी आतां तें मान कमी आहे पेरणी पूर्वीची शेतकामें जारीनें चाललीं आहेत.

हैदराबादेस मेडिकल हॉस्पिटल असिस्टंट पढविण्याचा वर्ग आहे तेथून पसार झालेले चार उमेदवार बऱ्हाडांत धाडले आहेत ते येणें प्रमाणें:— महमद इस्माएल खान, शिवराम बाळकृष्ण, कृष्णच्या सुभपा, व मीर अब्दुल रहिमान.

मि. रुस्तमजी फरदुमजी असि० कमिशनर वर्ग २ मलकापूर हे तारीख ६ मे पासून हक्काच्या रजेवर गेले आहेत ते दीड महीना पर्यंत रजेवर रहातील.

राय साहेब हरन चंद्र बानरजी असि. इंजिनिअर वर्ग एक यांस हैदराबादेस बंगाल्यांतून कायमचे आणलें आहे.

मि. एफ्. डब्ल्यू. ए. ब्रिडो असि. कमिशनर यांस चालूं महिन्या पासून एक महिना व एक दिवस पर्यंत हक्काची रजा मिळाली.

रा. रा, केशवराव जगन्नाथ एक्स्ट्रा असि० कमिशनर यांनीं सहा महिन्यांची फर्लो रजा गेल्या नोवेंबरांत घेतली होती ती संपल्या वरून आणखी तीन महिन्यासाठीं त्यांनीं रजा वाढवून घेतली आहे.

मुनशी अजुध्या प्रसाद एक्स्ट्रा असि. कमिशनर वर्ग २ हे तारीख ९ मे पासून रजेवर आहेत ती हक्काची रजा असून एक महिना व अकरा दिवस इतक्या मुदतीची आहे.

रा. रा. निळकंठ नारायण भट डेपुटी इनस्पेक्टर जिन्हा वणी हे तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जाणार आहेत असें प्रमोद सिंदु कळवितात.

बाळापूरचे शेट पोपटलाल यांस पकड वारंटानें आणून त्यांजवर एका किर्यादीच्या तक्रारी वरून येथील कोर्टांत फौजदारी खटला चालविण्यांत आला आहे.

मि. ओग्रेडी एक्स्ट्रा असि. कमिशनर यांची उमरावतीहून इलिचपुरास बदली झाल्याचें उमरावतीचें पत्र सांगतें.

वर्तमानसार

लाहोरच्या तुरुंगांतल्या कैद्याच्या आंगा वर शौचकुपांतला मैल टाकल्याच्या प्रकरणा-चा निकाल झाला. तो घाण टाकण्यास तुरुं-गाच्या दरोग्यानें जमादारास हुकूम केला असा दरोग्यावर आरोप होता, पण पुरावा न झाल्यामुळें तो सुटला. दरोग्याचा तो हु-कूम दोघां झाडुवाल्यांच्या मदतीनें जमादा-रानें अंमलांत आणल्याबद्दल जमादारास १८ महिन्यांची कैद झाली. जमादाराच्या त्या वर्तनावरून ज्या कैद्यानें जमादाराच्या तों-डावर घाणेरें पाणी टाकलें त्या कैद्यास एक वर्षाची शिक्षा झाली. ही तुरुंगांतली भाले-राई.

हिंदुस्थानच्या नाण्याच्या संबंधानें विचार करणारी सिमला येथें बड्या बड्या लोकांची एक सभा स्थापन झाली आहे.

लाहोरच्या रेलवे स्टेशनावर एकत्रा अ-सि. कमि. व असि. डरेक्टर यांची मारामारी झाली.

सोनें व चांदी यांचें नाणें सर्व ठिकाणीं सारखें चालण्याचा उपाय योजण्याकरतां इं-ग्लंड व अमेरिका या सरकारांत बोलणें चा-ललें आहे.

मशीद येथें पटकीनें मळप केल्यामुळें लोक-तें ठिकाण सोडून दुसरीकडे निघून गेले आहेत.

बसावयाच्या गाड्यांस गादवें जुपणें ही एक नवीन तऱ्हा सुरू होण्याचा रंग आहे, कारण आपली महाराणी बालमरल व अस-बोर्न येथें असतां गेल्या १९ वर्षांपासून आ-पल्या गाडीस गादवें जुंपीत असतात असें सांगतात. राजा बोले दल हाले अशी म्हणच आहे.

निझाम व गायकवाड हे आपापल्या रा-ज्या करतां नवे कायदे तयार करीत आहेत त्यांचे आलपर्यंतचे जुने कायदे आहेतच, पण त्यांचा अमल करतांना वेळोवेळीं ज्या कांहीं अडचणी व हरकती आढळल्या त्या टिपून ठेवलेल्या असून त्या व तशाच दुसऱ्या येणा-ऱ्या अडचणी यांचें दूरीकरण करण्याच्या हेतूनें त्या सर्वांचें एकीकरण करण्याचा हल्लीं-चा उद्योग चालूं आहे. हें एकीकरण करण्या-करतां त्यांनीं इंग्रज सरकाराकडे एकेक काम-दार मागितला असून त्यांचे जुने कायदे व इंग्रजी कायदे यांच्या धोरणानें हे नवे कायदे करण्याचा त्यांचा इरादा आहे.

ठा० अ०

हंगारी प्रांतांत एक अति लांब बोगदा आहे, त्याची लांबी साडे दहा मैल आहे व तो खोदून काढण्यास साडे तेरा वर्षें ला-गलीं.

चीनच्या राज्याचें क्षेत्रफळ ४९,००,००० चौरस मैल म्हणजे पृथ्वीच्या पृष्टभा-गावरील जमिनीचा बारावा हिस्सा आहे.

पार्लमेंटची सभागृहें बांधण्यास २,००,००,००० दोन कोटि रुपये खर्च लागला.

ब्रिटिश राज्यांतील रेलवेची लांबी ५०,००० मैल आहे.

साधारण हत्तीची शक्ति १५० माणसां-च्या शक्तीबरोबर असते; व वजन सुमारें ६,००० पौंड असतें.

जगांत १०,००० आगबोटी आहेत व त्या सर्वांवर मिळून १,००,००,००० एक कोटि टन वजनाचा माल जातो.

युरोपांत निरनिराळ्या ५८७ भाषा हल्लीं प्रचारांत आहेत.

ज्यांची लांबी ३,००० मैल आहे, अशा जगांत ९ नद्या आहेत.

अटलांटिक महासागराचें क्षेत्रफळ ३,००,००,००० तीन कोटी चौरस मैल आहे.

चीनच्या तटाची लांबी १२०० मैल आहे.

जगांत ३,३०० दीपगृहें आहेत.

युरोपांतील सर्व राष्ट्रांच्या राष्ट्रीय क-र्जाची रक्कम ४,५,००,००,००,००,००० रुपये आहे.

मद्रासचे गव्हरनरांनीं असें फर्माविलें आहे कीं, 'पंगू लोक, गरीदर स्त्रिया, मुलें, वगैरेच्या हातून मिठाच्या कायद्या विरुद्ध अपराध झाला तरी त्यांना शिक्षा होऊं नये. चांगलें!

मदनापल्ली येथें एका बागेंत एक बंब आहे, त्याच्या योगानें एक तासांत चार मजूर २,००० गयालन पाणी विहिरींतून काढूं शकतात.

जशास तसें—अमेरिकेतील सरकारानें अ-सा ठराव केला कीं, चिनी लोकांनीं सरकारी कामशिवाय अमेरिकेंत येऊं नये. त्याबरो-बर चीन सरकारानें असा निरोप पाठविला कीं, सदरहू ठराव अंमलांत आल्यास चीन देशांत कोणाही अमेरिकन गृहस्थास राहूं द्यावयाचें नाहीं. त्याबरोबर अमेरिकन सर-कारचा ठराव बदलला!

अलाहाबाद स्टेशन हास्पिटलमध्यें चार उपचार करणाऱ्या स्त्रिया ठेवण्याचा ठराव झाला आहे.

अमीराचा पेशावर येथील एजंट ग्यास-उद्दीन याला ५०,००० रुपयांचीं खेचरें पं-जाबांतून विकत घेण्याचा हुकूम झाला आहे.

डाक्टर धुरंधर, पुणें येथील माजी हेल्थ हापिसर यांना बडोद्याचे सानिटरी कमिशनर नेमलें आहे, योग्य नेमणूक.

मुंबईच्या सरकारी छापखान्यांतील एक क्लार्क मेला, त्याचीं पुरीं वाचण्याची ५० रुपयांची जागा त्याच्या बहिणीला दिली. फार चांगले केलें! कर०

लक्ष्मी व सरस्वतीची सारखी कृपा—का-ळाची अनुकूलता असली म्हणजे कधीं न ज-मणारे योग घडून येतात. लक्ष्मी आणि सर-स्वतीच्या दावेदारपणा बद्दल कवींनीं मोठीं मौनेचीं वर्णनें केलीं आहेत. पण प्रस्तुत इं-ग्लंड देशांत या सासूसुना गुण्यागोविंदानें वागत आहेत. लक्ष्मी जातीनें चंचल वृत्तीची, तिला आपल्या देशांतला मर्यादशीलपणा आणि पुढें यवनांच्या संगतीनें मिळालेला गोषा न आवडून ती तर बुरखा टाकून निघून गेली व बिलायतेंतील स्त्री स्वातंत्र्याचें पुर्ण सुख अनुभवीत आहे. इच्या जोडीला सर-स्वतीनें ही आपलें ठाणें तिथे किती मजबूत केलें आहे हें पुढील हकीकतीवरून कळेल:—इंग्लंडामध्यें एक मनुष्य दरसाल पुस्तकांप्री-त्यर्थ ६ रु० खर्च करतो. सुमारें पन्नास व-र्षांपूर्वी दरमाणशीं फक्त १०४ खर्च होत होता. एकट्या लंडनमधले लोक दर आठव-ड्यास ६,७०,००० रुपये पुस्तकें वगैरे प्रीत्यर्थ खर्च करितात. आमच्या देशांत दर-माणशीं कांहीं तरी पहिल्या पुढें प्रमाण जा-णार नाहीं. अशी स्थिति असताही आमच्या शिक्षणाकडे सरकारची वक्र दृष्टीच. नशीब आमचें! दुसरें काय!! सद्धर्मदीप.

ढेकणांवर उपायः—देशी दारू अच्छेर, कापूर पांच तोळे, टरपेनतेल अतपाव व रस-कापूर अडीच तोळे घेऊन सर्वांचें मिश्रण करावें व ढेकूण असलेल्या जागीं व सामान-सुमानास तें लावावें. म्हणजे असलेले ढेकूण नाहींसे होऊन पुनः बरेच दिवस त्या जागीं ढेकूण होत नाहींत. सरासरी आठवड्यांतून एकदा औषधाचा उपयोग केल्यास पुरें होतें.

कापूर पिशवींत भरून लिंबण्याचे जागीं ठिकठिकाणीं व बिछान्यावर टांगून ठेविल्यास ढेकणापासून त्रास मुळींच होत नाहीं असें एकाचें मत आहे. मिषाग्निलास.

दुष्काळ व मजुरांची संख्या—सिमल्याच्या तारेवरून समजतें कीं गेला महिना अखेर दुष्काळा साठीं काढलेल्या कामावर मद्रास इलाख्यांत ७३५३० मजूर, मुंबई इलाख्यांत १८२२०, बंगाल इलाख्यांत ९२६०१, ब्रह्म देशांत १३०११, म्हैसूर व कुर्ग प्रांतां-तें ४०७५ आणि राजपुताऱ्यांत ३८९६० मिळून एकंदर २१३३९७ मजूर कामावर होते.

मद्रास इलाख्यांतील पुष्कळ भागांत पं-ढां कळकास बी आलें आहे. कळकास बी आलें म्हणजे देशावर नाना प्रकारचीं अरिष्टें उद्भवतात असा तिकडील लोकांचा समज असल्या मुळें लोक फार भिऊन गेले आहेत. गतवर्षी कांहीं कळकांस बीं आलें होतें त्या मुळें दुष्काळ पडला असें त्या लोकांचें म्ह-णणें आहे. शु० सू०

सुएझ संयोगभूमी मधून पत्रोल्यम(राकेल) तेल जाऊ देण्याची परवानगी झाली; एका निराळ्या राज्याच्या प्रधानानें सभा उठतां उठतां म्हटलें कीं, इंग्रजाचा काय इतका हक्क सुएझच्या रस्त्यावर आहे? कंपनीनें परवानगी दिली आहे, व्यापारी ने आण करतात, त्यां-त ब्रिटिश सरकारानें मन घालणें आम्हास अगदीं नापसंत आहे. पुरलेली गोरी धुमसत रहाते ती हीच!

नवीन पार्लमेंट कधीं उघडणार यानकडे सर्वांचे लक्ष लागलें आहे, बहुधा जुलईच्या पहिल्या तारखे पासून सुरवात होईल.

हिंदुस्थानांत ७२ हजार गोरा उतरला आहे.

वायव्य सरहद्दीवर कोणकोणत्या जागीं फौजा ठेवणें आज अगत्याचें आहे त्याचा विचार चालूं आहे.

बडोद्याचे महाराजांनीं आपल्या इलाख्यां-त आमरोळी व कठोर या जागीं कर्ज देण्या साठीं पेढ्या काढल्या.

कावुलामध्यें अतिशय वाऱ्याचा उपद्रव सुरूं झाला आहे. १० दिवसांत ५५००० मनुष्यें मेलीं म्हणतात.

मुंबईत टेलीफोन चालूं केल्या पासून टांगेवाले लुचेगिरी करून पळून जातात त्यास पकडण्याच्या कामीं फार उपयोग होऊं लागला आहे.

कालीकतमधून एक तारू इमारती लांकडें भरून मुंबईस येत असतां समुद्रांत तुफान झाल्यामुळें तें उलथून बुडालें. म०मि०

सोलापूर—मंगळवार पेठेंत बाबासा खेत्री नांवाच्या एका इसमाच्या घरीं वीज पडून घरांतील भांड्यांस भोकें पडलीं. खैरच झाली.

असेसरावर हल्ला—रत्नागिरीच्या सेशनांत एका असेसरानें खुनी खटल्यांतील आरोपीवर अपराध शाबीद नाहीं म्हणून आपला अभि-प्राय दिला. तेव्हां गुन्हा पकडण्याचे कामीं जिवापाड मेहनत घेतलेल्या एका पोलीस आं फिसरानें त्या असेसरास बराच चोप दिल्या-चें कळतें.

मुनसफांना ज्या प्रमाणें स्वभाषा व इंग्रिल-श भाषा खेरीज करून इतर दुसऱ्या कोण-त्या तरी भाषेची परीक्षा द्यावी लागते, त्या-चप्रमाणें आतां मामलेदारांनाही तशी परीक्षा दिली पाहिजे, असा सरकारचा ठराव झाला असल्याचें समजतें.

ज्यांना मदिरापानाची अतिशय संवय लागली आहे त्यांनीं आपलें जेवण झाल्यावर प्रत्येक वेळीं अपलफळें खात जावीं, म्हणजे त्यांचें मंदिरापानाचें व्यसन नाहींसें होतें असें एका जर्मन डाक्टरानें ठरविलें आहे.

मिरत स्टेशनावर एक म्हातारा फकीर अं-गावर लोखंडाच्या सांखळ्या व पट्टे मिळून पांच मण वजनाचें सामान अडकवून आला. त्याला माणसाच्या गाडींतून न पाठवितां मालाच्या गाडींतून पाठविलें. बापकांच्या अंगावरील डागिने व बांगड्यांबद्दल जास्त पैसे पडत नाहींत, मग मलाच कां तो नियम लागू नसावा? असें त्यानें प्रतिपादन केलें, परंतु कांही उपयोग झाला नाहीं.

हुगली नदींत हल्लीं एक प्रकारचे चमत्का-रिक सर्प उत्पन्न झाले असून त्यांचे दंशानें नदींत स्नानास गेलेलीं पुष्कळ मनुष्यें मरण पावतात असें समजतें.

क्रॉफर्ड प्रकरणः—या प्रकरणांत बरतर्फ केलेल्या मामलेदारांनीं वगैरे नेटिव संस्थानें किंवा म्युनिसिपालिट्या यांतून नोकऱ्या धर-ल्या असतां त्यांचा पगार बंद व्हावयाचा असा जो पूर्वीचा ठराव होता तो फिरून त्यांना कोठेंही व किती ही पैशांच्या जरी नोकऱ्या लागल्या तरी यांचे नेमलेले पगार चालू रहावे असा हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे. क. त.

अकोला बाजारभाव.

हुंडी मुंबईची दर्शनी १००=

" १५ दिवसाच्या मुदतीची १००

सुवर्ण २४॥ रुपे १०८। आळशी ९१॥

गहूं कठे ७० बनशी ७८॥।

जवारी ४८ सर्की ५॥=

रुई १०

मीठ ३॥=। तूप ८॥= तेल ५॥=

सट्याचे भाव. (मोंगलाई)

जवारी वसंत १९४९ ४६=

गहूं वैशाख शुद्ध १९४९ ६५

आळशी चैत्र शुद्ध १९४९ ८६॥।

सर्की वैशाख नवे साळची १९४९ ५।

रुई फालगून १९४९ ५६॥।

शु० म०

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खं राव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमा-चार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा आगाऊ घेतां १ डाक हासील ०१२
सहामाही " २ " ०८
सालअखेर " ० " १०८
किरकोळ अंकाची ०४

Annum in advance 5 Postage 13 as
Annum in arrears 7 " 1Rs 8 as
Six monthly.....3 " 8 as
Single copy.....1as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ०१

वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 20 JUNE 1892 NO 24

वर्ष २६ सोमवार तारीख २० माहे जून सन १८९२ इ० अंक २४

जाहिरात

—0—

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुस्त्या रंगबाज व कमिशन जास्त पाडून कां फसतां? थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीने देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. म्हणजे आम्ही व्ह्यालप्युपेबलनीं पोस्टमार्गे लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमीशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ०८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांचा दुर्धर असेल त्यावर पोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें देन औषधी मिळून किं. १॥रु.

३ घातुंपिक ज्वर म्हणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १०५ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोड्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ०१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर १ दिवसांत गुण. लावणें व खाणें याच्या डबीस किं. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं न-सून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जलद गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज त्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं. १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धीशिशी यावर दर डबीस किं. १०=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारुप्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें त्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदी जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १०-

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ यावर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ॥· हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु हीं ३ मुळें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द म्हणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल वडस रातांधळें लाली खुपरी चुळ चीपडे गळतो यावर १ डबीस किं. १०६

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेश मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैद्य तुरणखेडकर अकोला गंगाधरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, अकोलें म्युनिसिपाल कमेटीचे हद्दीतील बारा फतराचे आंत गुरें चारण्याचे हक्काचा लिलाव सन १८९२।९३ इ० सालाबद्दल ता० ५ माहे जुलई सन १८९२ इ० रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्याची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू वेळीं टौनहालांत हजर व्हावें कळावें.
ता० १३।६।९२

Vyankatesh R. Mudholkar.
Secretary Akola.

पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रिसोड ता०१३।६।९२इ

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कतानेक सा० न० वि० वि० पर्जन्याची सुरवात झाली. पांच सहा इंच पाऊस पडला. हवा गार झाली. अव्याची रूची कमी झाली. जरा पाऊस लवकर पडल्यामुळें आंब्याचे व्यापारी यांना कांहीं बूड लागण्याची भीती आहे. सरकी पेरण्याचें काम ज्यारीनें सुरूं झालें. रोगराई नाहीं. हा गांव मोठा व्यापारी असून येथें सडकेचे रस्ते नाहींत. या मुळें पर्जन्यकाळीं सर्व व्यापार बंद ठेवावा लागतो. सरकारचें लक्ष्य नेहमीं लोककल्याणाकडे असतें. परंतु ह्या गोष्टीचा अनुभव या गांवच्या लोकांस कां येत नाहीं कोण जाणे! मागें एक वेळ अशी एक वार्ता निघाली होती कीं, येथून वाशीम पर्यंत तेरा कोसांचा रस्ता बांधून सरकार लोकांची रस्त्या संबंधाची अडचण दूर करणार परंतु त्याबद्दल अजून कांहीं झाल्याचें कळत नाहीं व पुढें ही होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. रस्त्या बद्दल या रिसोडच्या लोकांना किती दुःख सोसावें लागतें याची कल्पना करणें अनुभवा वांचून सर्व व्यर्थ. हल्लीं आमचे सुदैवानें जिल्ह्यांत एंजिनियर खात्यांत मि. वामनराव भोळे हे कामगार आहेत. लोकांच्या अडचणीचा विचार करण्या जोगें आहेत. त्याच प्रमाणें आमचे जिल्हाधिपती केवल धर्मराज अहेत. ह्या दोघांनीं मनावर घेतल्यास ही अडचण सहज ते दूर करतील. त्याच प्रमाणें डिस्ट्रिक्ट बोर्डाचे कामदारांनीं ह्या सार्वजनिक अडचणी बद्दल जरूर विचार करावा अशी आमची सेक्रेटरी साहेब बोर्ड मजकूर यांस विनंती आहे. ते मराठी जाणणारे आहेत. त्यांनीं हा लेख वांचून चेरमन साहेब यांस दाखवून या गोष्टीची कांहीं तरी तजवीज होईल अशी व्यवस्था करावी. येथें श्रीमान व्यापारी आहेत मला वाटतें असें सर्व जिल्ह्यांत इतर ठिकाणीं असे फारसे नाहींत. परंतु बिचारे करितात काय? पर्जन्य काळ आला कीं बिचाऱ्यांस हातावर हात व पायावर पाय ठेऊन बसून रहावें लागतें. गांवासभोंवार रस्ते नसल्या मुळें त्यांचा इलाज नाहीं.

येथें गोरक्षणाचें काम उत्तम प्रकारें चाललें आहे. सर्व परगणाभर असा नेम झाल्याचें दिसतें कीं, कोणी ही हिंदु आपली गाय कसाबास विकत नाहीं. आपणास पाळावयाचें सामर्थ्य नसल्यास तो तिला रिसोडास गोरक्षण कमेटीकडे आणून सोडतो. अशा प्रकारच्या गाई येथें बऱ्याच आल्या असून कमेटी चांगल्या प्रकारें त्यांची व्यवस्था ठेवते. ह्या करितां स्वतंत्र घर बांधिलें आहे. चाकर माणसें ठेविलीं आहेत. दोन तीन हजार भांडवल जमा झाल्याचें कळतें. ह्या गोष्टीकडे गांवांतील संभावीत लोक फार लक्ष्य देतात. ह्याचें श्रेय मि. आबा पांडे यांस आहे. हे गृहस्थ फार वजनदार असून सरकारांत ही यांचें वजन फार आहे. यांचें वांचून पान ढळावयाचें नाहीं सार्वजनिक कामाकडे यांचें फार लक्ष्य आहे हुशार आहेत. यांना सरकारानें येथें अनरारी मॅजिस्ट्रेट नेमावें हें फार चांगलें. येथें पूर्वी रा. रा. व्यंकटराव दादा वाकदकर देशमुख ॲनरारी मॅजिस्ट्रेट होते. त्यांनीं सरकारचें उत्तम काम केलें. परंतु शेवटीं बिचाऱ्यावर लांच खाण्याचा संशय येऊन त्यांना सरकारानें काढून टाकिलें. या वेळ पासून येथें मॅजिस्ट्रेट कोणी नाहीं. यामुळें लोकांना अतिशय दुःख सोसावें लागतें. लहान सहान फौजदारी मुकद्दम्या करितां वाशमास टळे खात जावें लागतें. तर सरकारानें या गोष्टीकडे अवश्य लक्ष्य पुरविलें पाहिजे. वाशमास अनरारी म्याजिस्ट्रेट अहे. पुसदास व उमरखेडास ही आहे. ह्याच गांवानें काय पाप केलें आहे कोण जाणें!

येथें एक सरकारी शाळा आहे मास्तरांचा पगार ३५ आहे. येथें कोणी बाहेरून चांगला हुशार मास्तर आला तर टिकत नाहीं. हा गांवचाच अपराध आहे किंवा जिल्ह्याचे प्रकार तसा आहे हें जाणण्याचें आमचे पाशीं साधन नाहीं. येथें रा. रा. नारायण बाळकृष्ण परांजपे हेड मास्तर आले होते. ते फार हुशार होते, गांवांत सर्वांस ते अवडत होते. परंतु बिचाऱ्यानें कंटाळून येथून पांच रुपये कमी करून घेऊन बदली करून घेतली. आतां येथें चिमणाजी पंत नांवाचे गृहस्थ हेड मास्तर आले आहेत. हे अनुभविक, हुशार, लोकप्रिय, व सर्व सुगुण यांच अंगीं आहेत. यांचा कसा काय निभाव लागतो तें पहावें. येथें सहावी ईयत्ता होती ती मोडली. आतां पांचवीच आहे तींत ही फारसी मुलें नाहींत. एकंदरीत शिक्षणाचे बाबतींत मोठी दैन्यवाणी स्थिती आहे. आतां नवीन आलेले मास्तर यांच्या अंगीं चांगली तरतरी आहे. तर यांनीं मेहनत करावी व सहावी इयत्ता पुन्हा आणावी म्हणजे आम्हा रिसोडस्थ लोकांवर फार उपकार होतील. कळावें हे विनंती.

आपला एक
"क्ष"

बरार रूरल लॉ.

(२३ वें अंकावरून पुढें चालूं.)

(३) जिल्हा बोर्डीच्या सेक्रेटरीनें जरुरी प्रमाणें वेळोवेळीं जिल्हा बोर्डांत निवडणुकीची जागा खाली असल्या बद्दलची तालुक बोर्डाचे चेअरमनास खबर देत जावी. आणि तालुके बोर्डाच्या चेअरमन अगर व्हाइस चेअरमन यानीं जिल्हा बोर्डीकरितां जितके मेंबर्स पाहिजे असतील तितक्यांची निवड करण्या करितां मुद्दाम सभा भरवावी. ज्या तारखेस सभा भरविण्याची असेल त्या तारखेची सात दिवसां पेक्षां कमी नाहीं इतके

दिवस अगोदर तालुकेबोर्डच्या मेंबरास नोटीस द्यावी.

(४) निवडणुकीचो व्यवस्था चेअरमन किंवा त्याच्या गैर हजरीत व्हाईस चेअरमन यांनकडे राहील.

(५) तालुक बोर्डाचा प्रत्येक मेंबर जो जिल्हा बोर्ड करितां निवडणुकीस उमेदवार असेल त्याजबद्दल तालुके बोर्डच्या एखाद्या मेंबरानें सुचना केली पाहिजे. एकाच मेंबरानें एका पेक्षां जास्त उमेदवाराबद्दल सुचना करूं नये.

(६) सभेकरितां नेमलेल्या तारखेस प्रत्येक मेंबरांचे नांव पुकारावें आणि हजर असेल तर कोणत्या उमेदवाराबद्दल तो मत देतो हें त्यास विचारावें किंवा त्यानें योग्य प्रकारें सही व प्रतिज्ञा केलेला मताचा कागद दाखल करावा. जो मेंबर सभेच्या वेळीं हजर नसेल त्याचें मत किंवा मताचा कागद कबूल केला जाणार नाहीं.

(७) जितक्या खाली असलेल्या जागा भरण्याच्या असतील तितक्या उमेदवाराबद्दल प्रत्येक मेंबरानें मत द्यावें परंतु एखाद्या उमेदवाराकरितां एका पेक्षां जास्त मत त्यानें देऊं नये.

(८) सर्व मतें लिहिलीं गेल्यावर चेअरमन किंवा व्हाईस चेअरमन जो असेल त्यानें प्रत्येक उमेदवारकरितां दाखल झालेल्या मताच्या संख्येची बेरीज द्यावी. व ज्या उमेदवारा करिता किंवा अनेक उमदवारांकरिता सर्वांत जास्त मतांची संख्या झाली असेल त्यांचीं नांवें कळवावीं.

(९) जेव्हां मताच्या सारखेपणामुळें एखाद्या उमेदवाराची निवड अनिश्चित राहिली असेल तेव्हां चेअरमन अगर, व्हाईस चेअरमन यांनीं निर्णायक मत द्यावें.

(१०) जर एखाद्या तालुक बोर्डाचे मेंबर निवडीच्या मेंबरांची ठरीव संख्या निवडणार नाहींत तर खालीं असलेल्या जागा कमिशनर नेमणुकीनें भरतील. परंतु कोणत्याही कारणावरून नेमलेल्या मेंबरांची संख्या जिल्हा बोर्डातील एकंदर संख्येच्या निमेपेक्षां जास्त होऊं नये.

(११) रकम (३) अन्वयें केलेली निवड पुरी झाल्यावर जिल्हा बोर्डा करितां जो इसम किंवा जे इसम मेंबर किंवा मेंबरस निवडले गेले असतील त्यांचीं नांवें रेसिडेंट साहेब यांजकडे पाठाविण्याकरितां व रेसिडेन्सी आरडर्स मध्यें प्रसिद्ध होण्या करितां कमिशनर यांस कळवावें. व असा इसम किंवा असे इसम प्रसिद्धीच्या तारखे पासून कामावर रुजू झाले असें समजलें जाईल.

(पुढें चालेल.)



मिती ज्येष्ठ वद्य १० शके १८१४

पुण्यास नाईट क्लब। उर्फ महाराष्ट्र भाषा संवर्धक मंडळी या नांवाची एक संस्था आहे. या मंडळीचा उद्देश तिच्या नांवावरून व्यक्त होत आहे. लोकांस मराठी भाषेची गोडी लागावी म्हणून दर सहा माहीस किंवा साल अखेर एकादा ग्रंथ तयार करून प्रकाशित करावा असा या मंडळीचा उद्देश आहे. ही मंडळी सन १८८८ सालीं निघाली तरी १८९१ पासून या संस्थेस उत्तम स्वरूप आलें असून ग्रंथ प्रकाशनाचा उद्योग चागला चालला आहे. आजीव आश्रयदाते, आश्रयदाते, वर्गणीदार असे तीन वर्ग केले आहेत. त्यांपैकीं आजीव आश्रयदात्यांनीं सालीना १० रुपये या प्रमाणें दहावर्षे वर्गणी अगर शंभर रुपयांची देणगी द्यावी, साध्यां आश्रयदात्यांनीं सालिना पांच रुपये याप्रमाणें पांच वर्षे वर्गणी अगर पंचवीस रुपये देणगी द्यावी आणि वर्गणीदारांनीं पुस्तकें निघतील तीं विकत द्यावी असा नियम ठरला आहे. या नियमा प्रमाणें वरील संस्थेस हिंदुस्थानचे राजेरजवाडे, संस्थानिक, व अन्य थोर गृहस्थांनीं चांगला आश्रय दिला आहे. वरील मंडळीनें आजपर्यंत तीन पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत तीं मीनयौवना, श्रीविक्रमादित्य भाग १ व भाग २ अशा दोन कादम्बऱ्या आहेत. दुसरी कादम्बरी दोन भागांत पूर्ण झाली नसून अद्याप पुरी होणें आहे. हे तिन्ही ग्रंथ चांगले साधले असून लोकप्रिय झाले आहेत. या पैकीं श्रीविक्रमादित्य ही कादम्बरी आम्हाकडे अभिप्रायासाठीं आली आहे तिचा आम्ही आभार पूर्वक स्वीकार करितों.

आम्हास या संस्थेबद्दल एक मोठी शंका आहे कीं लोकांनीं वर्गण्या दिल्या म्हणजे त्या रकमेचा उपयोग ग्रंथ प्रकाशनाकडे होत असेल तरी ग्रंथकर्ते कोणकोणते व किती गृहस्थ आहेत, नवीन ग्रंथकर त्या संस्थेंत सामील करण्याची कोणती व्यवस्था केली आहे, व नवे ग्रंथ कोणत्या तत्वावर आपल्या संस्थेच्या मालिकेंत गोवतात इत्यादि माहिती जशी मिळावी तशी रिपोर्टावरून मिळत नाहीं. या गोष्टी कळल्या म्हणजे लोकांना या संस्थेचें महत्व व उपयुक्तता समजून पुष्कळजण तिचे हितकर्ते होऊं इच्छितील तेव्हां ही उणीव दूर करण्यासाठीं सदर्हू मंडळीचे चिटणीस रा. रा. विनायक त्रिम्बक मोडक व वासुदेव रंगनाथ शिरवळकर हे वरील माहिती जाहीर करून लोकांच्या शंकेचें निवारण करितील असें आम्ही इच्छितों.

'न्यु ओरआंटल ब्यांके' नें आपलें दिवाळें काढलें आणि देवघेव सर्व बंद केली आहे. इंग्लंड, इंडिया, चीन, जपान, मारिशस, आस्ट्रेलिया इत्यादि देशांत तिच्या शाखा आहेत. व्यापारांत ठोंकर लागल्यामुळें व लोकांनीं आपापला पैसा पुष्कळ काढल्यामुळें ही इंग्रजी पेटी अजिबात बसली यामुळें हजारो लोक ठार बुडाले आहेत. पेढीची देववेघव मोठी असुन साडे नऊ कोटींवर दिवाळें निघालें आहे ठेव ठेवणाऱ्या लोकांस रुपयां तून किती आणे हिशोबा अंतीं परत मिळतात पाहावें! नादार ठरल्यावर वसूल नीट येत नसून देणें मात्र अंगावर पडतें. आमच्या राष्ट्रीय सभेची या व्यांकेतली ठेव बुडाली हें ही मोठें वाईट झालें.

सोन्याचा भाव फार वाढला त्यामुळें हिंदुस्थानाला राज्यकारभारा प्रीत्यर्थ विलायतेस पाठवावयाचे रुपयांचें खंडणी द्यावी लागते तिचा बोजा या भावानें दोडपट वाढला आहे. शिवाय सोन्याचा भाव वाढता व चलनिधलीचा असल्या कारणानें व्यापारी लोकांचें भारी नुकसान होतें व व्यापाराच्या अव्याहत चलनाला मोठा अडथळा होतो. विलायतचे तुंबळ भांडवलें या देशांत खेळतीं आहेत आणि सोन्याच्या भावामुळें व हिंदुस्थानांत रुप्याचींच नाणीं चलनी असल्यामुळें फार त्रास व तोटा सोसावा लागतो म्हणून सरकार मार्फत सोन्यारुप्याचें भाव एका नेमस्त प्रमाणावर बसविण्याचा विचार करण्यासाठीं हल्लीं सिम्ल्यास एक सभा भरली आहे. आणि याच प्रकरणांत, इंग्लंड, फ्रान्स, इटली, व युनायटेड सटस इत्यादि राष्ट्रांची एक मुख्य सभा अमेरिकेंत बसणार आहे तेव्हां सोन्यारुप्याच्या नाण्या संबंधानें ठोक विचार होणार आहे. अंतर काम निष्पन्न होईल तें खरें.

'शेतकरी' मासिक पुस्तकाचा मार्च महिन्याचा अंक चार दिवसा पूर्वी मिळाला. पुण्यास छापलें जाऊन तें उमरावतीस प्रसिद्ध होतें. हें मासिक पुस्तक वऱ्हाडांतील आहे असा आम्हास आपलेपणा वाटत होता तो कमी कमी वाटूं लागला आहे. यांतील लेख नेहमी प्रमाणें मुद्देसुत, भरपूर माहितीचे व शेतीला उपयोगाचे असे असत तसेच हल्लीं ही येत असतात परंतु या प्रांतांतील शेती संबंधाची विशेष माहिती नसते इतकेंच नाहीं तर शेतीच्या प्रकरणांतील नवे नवे फेरफार ही त्यांत नमूद नसतात म्हणून लोक नाराज आहेत तेव्हां ही उणीव दूर करून मागसलेल्या अंकांची परिपूर्ती सदर्हू मासिक पुस्तकाची व्यवस्थापक मंडळी लवकरच करितील असें आम्ही इच्छितों.

'शिल्पकला विज्ञान' मासिक पुस्तकाच्या मागें पडलेल्या अंका पैकीं फेब्रुवारी व मार्च महिन्याचे दोन अंक मिळून एक नेहमीच्या दुप्पट अंक गेल्या पंधरवाड्यांत मिळाला. या अंकांत हिंदुस्थानाच्या सांप्रतिक द्रव्य पैकीं कोहळा, फणस, बोळ इत्यादि पदार्थांची सविस्तर माहिती, उद्भिज सेंद्रिय आम्लें, सुतारकाम, व वास्तुशास्त्र इत्यादि विषयावर शास्त्रीय विचारांचे, खुलासेवार, व समजण्यास सोपे असे लेख आले आहेत. अशा पुस्तकांची मराठींत उणीव व शिल्पकलेच्या माहितीची उपयुक्तता ही लक्षांत आणली म्हणजे या मासिक पुस्तकाची योग्यता कळून येईल. त्याचे प्रकाशक राजश्री महादेव बल्लाळ नामजोशी हे उत्तरोत्तर शिल्पकलाविज्ञानाचा फैलाव व पुस्तकाचा नियमितपणा याकडे पूर्ण लक्ष्य पोचवतील अशी आम्ही उमेद बाळगतों.

मुंबईचे 'आर्यभिषक्' पुस्तक व्यवस्थशीरपणें वेळेवर मिळत असतें. गेल्या जून महिन्याचा म्हणजे तिसरे वर्षाचा बारावा अंक नुकताच मिळून चौथें साल सुरूं झालें. वैद्यकांतील वनस्पतींची माहिती यांत परिपूर्ण व विचारपूर्वक येत असते.

सोलापूरास 'भिषग्विलास' नांवाचें मासिक पुस्तक नवें सुरूं होऊन त्याचे तीन अंक आम्हांस मिळाले. निबंध वैद्यशास्त्रावरील नानाविध लेखांवर लिहिले असून त्यांत शारीर रचना व इतर आरोग्यविषयक प्रकरणें यांवर भरपूर माहिती दिली असते नवें पुस्तक आहे तरी त्यांतील समग्र लेख व योग्य व्यवस्था हीं पाहून लोक त्यास चांगला आश्रय देतील असें आम्ही मना पासून इच्छितों.

'सद्धर्मदीप' व 'ज्ञानदीप' हीं मासिक पुस्तकें धर्मविषयक आहेत. दोहोंचें ही पुनरुज्जीवन झालें असून त्यांचे पांच चार अंक निघाले आहेत. सद्धर्मदीप हा जुन्या सनातन धर्मपंथाचा व 'ज्ञानदीप' हा नव्या सुधारलेल्या प्रार्थना समाजांतील ईश्वरोपासनेचा द्योतक आहे त्या प्रमाणें उभयतांत विषयवैचित्र्य असून विचारसरणी भिन्न प्रकारची व उलट दिशेची आहे. या पुस्तकांपैकी सद्धर्मदीपाची लोकप्रियता मोठी आहे हें येथें सांगणें जरूर आहे.

The Berar Samachar

MONDAY, JUNE 20 1892

No doubt the comparison we try to institute between India of the latter half century and the India of the middle ages can have only academical interest. Of late there is a reign of empirical thinkers, a reign of reckless men who without being supplied and furnished with any data throw out boldly their influences and assertions with perfect impunity. For such this is not intended. But for a thinking few we hope to give an interesting account of facts as they occurred. Every Indian ruler was in the times of the Middle Ages a paramount ruler in his own way of his own territories and the country was never one: nor can any definite number of sub-divisions be safely pointed out from very earliest times. It was ever exposed to the invasions and rapicious incursions of neighbouring aggrandisers. What we call security of person and property was foreign to the minds of the inhabitants. We admit the prevalence of internal wars is not a sure sign of general depression. But in such a condition of life men will resemble nothing but the butter flies of summer. With no stability of any established custom the people must be a hereditary race of time-servers ready to make the best their present circumstances sometimes forced and sometimes pleasingly accepted. The taxation too was always very heavy. In a state of society as this the gulf between the higher and lower classes must have been very horrid. The lower classes like the Bhils, Khonds, and Ramosis either plunderers or like the Grecian Serfs always dependent on their lords of the manors. The assessment of a sixth nett produce must have fallen very heavily on the landlord. Beginning with this state we come to the present time to which increased communication, uniform system of Government, the sameness of laws, the unity of taxation and strenuous effort to patronising and diffusing learning have largely lent their aid. The condition of the country has been altogether changed. The rapid transition has been so far delightful and acceptable to the people that no Indian ever wishes for an exchange. From deep and profound convictions every thinking Hindu would shrink from the idea of a restored gone-by or extinct Indian dynasty. The idea of a Swaraja may be the summum bonum for India conceived by her statesmen. But what statesman would not indulge in the visionary utopian dreams! A desire to improve upon the present is a thing far different from a desire to fall

back upon old because it was healthy! Since 1750 to 1800 there was hardly any thing like society in India The terrible carnage accompanying the Afghan victory at the disastrous Paniput, the rivalry of the rising foreign adventurers, the greed of European traders and their subsequent attempts to establish monarchies all combined to spread nothing but ghastly anarchy all around. The evils of foreign rule too are now at their height. The resources of the country are being fearfully drained oft every year. This evil too began with the complete overthrow of the native powers in the latter quarter of the present century. Since tnen has begun the dawn of Indian civilization. The sun no doubt has not yet risen to the first quadrant of the horizon. The morning vapours too have not yet been quite cleared. But the thaw will melt and the mist driven. The twentieth century will no doubt begin with fresh hopes and fresh expectations. With this rapid almost electric, comparison between India past and India present we cast a retrospect of what she has gained and what she has lost so far as her economical and social condition is concerned. The people are undoubtedly advancing in material prosperity. But the balance of production & consumption is against India. She is required to produce much more than she requires for her consumption. She is required to pay for the British administration. She is required to repay the capital invested in India by foreigners on railways and other works of permanent utility. But though she pays a very dearer price for all this she is gradually being pressed with assessments for reckless and aggrandising, greedy and selfish wars. This is the only unmixed evil. Burma has been conquered for India. Have any remedies been divided by Govern- to prepare way for emigration?

Except this the economical condition is slightly affected by population. The population has been steadily on the increase. Several indigenous industries have declined. Thus the poor are forced to remove themselves to distant places where they can live on their wages. Thus the poor though not quite famine stricken are yet on the brink of starvation. But all remedies to improve permanently the condition of labouring classes have ever failed in every other country. The remedies suggested generally hold till population has not multiplied itself. Apart therefore from this question if we look whether the standard of comfort has risen the prospect is hideous. Formerly wants were few, whereas they have been fast multiplied. The standard of comfort has materially risen in other classes. But the labourers are none the better for it. The increased production goes to pay for the increased civilization. But the condition of the labourer is none the better for it. Perhas he is required to toil the more for the same remuneration. The class of vapory thinkers who think rent affects prices and who cry for perma nent settlement and thus unconsciously propose to enslave the general body of men by enriching a class rather of landed proprietors is fast lessening.

To what are we to attribute these other changes in the economical views of men? The answer is obvious. To the diffusion of education. Lord Macaulay's name and memory will ever be perpetuated among all Hindus for his Educational Bill. The diffusion of education and the facilities for increased communication have certain ly rendered the country one. These boons have greatly added to the improvement of the economical status of the country.

Their effect upon the social condition of the country we propose reviewing some other time. Social problems are inseparably associated with economical ones. So they often intermingle with each other. Yet we propose giving the influences of the present condition of the country on the ocial condition in one of our subsequents ssues.

वऱ्हाड

हवामान—या आठवड्यांत पाऊस बिलकूल पडला नाहीं व ऊन कडकडीत तापत असतें म्हणून चिंता उत्पन्न झाली आहे. तरी वारा वाहतो त्यांत गारवा असतो, उष्णतचे मान कमी आहे, व मधून मधून आकाश ढगांनीं भरून येतें त्या वरून लवकरच पर्जन्यवृष्टि चांगली होऊन पेरणीचीं कामें चालूं होतील असा सुमार आहे. ताप खोकला पडसें वैगेरे किरकोळ दुखणीं आढळांत येतात.

अलिशान रेसिडेंट मि० ब्रॅडन साहेब हे उन्हाळ्या निमित्त उटकामंड येथें गेले होते ते गेल्या मंगळवारीं पुन्हा हैदराबाद राजधानीस परत आले. नबाब खुरशेदजहा आदीं करून अमीर उमरावांनीं परत आगमनाच्या वेळीं साहेब मजकूरांचा आदरसत्कार पूर्वक योग्या परामर्ष घेतला. ब्रॅडन साहेब हैदराबादच्या दरबारीं मोठे लोकप्रिय झाले आहेत हें कळविण्यास आम्हास संतोष वाटतो.

रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ जोशी रेसिडेंट साहेबांचे अड्याची यांस मॉजिस्टेट वर्ग २ चा अधिकार देण्यांत आला असून तो अधिकार त्यांनीं रेसिडेन्सी बझार व निजाम सरकारच्या रेलवेच्या नेमस्त मर्यादा एवढ्या इलाख्यांत चालवावा असें ठरलें.

कप्तान सी. जी. एफ. फगान रेसिडेंट साहेबांचे पोलिटिकल असिस्टंट हे पोलिटकल खात्या कडील परीक्षेंत पसार झाले असल्या विषयीं कळतें

डाक्टर शार्ट यांस वऱ्हाड व मध्यप्रांत या दोन प्रांताला मिळून व्हेटरनरी सर्जन नेमलें असून त्यांचें कायमचें आफिस नागपुरास राहील.

कर्नल स्पन स्को डेपुटी कमिशनर बुलढाणा यांनीं हक्काची रजा घेतल्या कारणानें त्यांच्या कामावर कुमार श्री हरबानजी असि० कमिशनर यांस तूर्त नेमलें आहे. राजघराण्यांतील नेटिव आफिसराकडे हा कारभार सोंपविला हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. निळकंठ नारायण भट डेप्युटी इन्स्पेक्टर, यवतमळ यांच्या तीन महिन्यांच्या रजेंत रा. रा. सुंदर दामोदर दाबणकर यांस आर्किटंग डेप्युटी इनस्पेक्टर नेमलें.

उमरावती स्मालकाज कोडताचे नवे क्लार्क आफ कोर्ट रा. रा. रामचंद्र भास्कर जयवंत हे आपल्या कामावर रुजू होऊन तेथिल आक्टींग गृहस्थ रा. रा. पांडुरंग सखाराम अग्निहोत्री हे यवतमाळास रवाना झाले.

मि. डब्ल्यू. ए. शेरीफ उमरावती सिव्हील सर्जनचे आसिस्टंट यांस गेल्या नोवेंम्बरांत ब्रह्मदेशाकडे लष्करी खात्यांत रवाना केलें होतें ते थोडे दिवस पूर्वी तिकडे निवर्तल्याचें दुःखकारक वर्तमान समजतें. या गृहस्थांची गेल्या रिपोर्टांत त्यांच्या उत्तम कामा बद्दल मोठी स्तुती झाली होती.

इलिचपुरचे डेपुटी कमिशनरचे जागीं मि. रिचर्ड म्यागिल एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस आफिशिएटींग डेपुटी कमिशनर नेमल्या वरून कांहीं आफिसर मंडळींत चळवळ उडाली आहे.

मि. रहिमतुल्ला नायब तहशीलदार, मोशीं हे रजे वरून परत आल्या कारणानें रा. रा. यशवंतराव काळे हे उमरावतीस स्मालकाज कोडताचे नाझरचे जागीं परत गेले.

यंदा वऱ्हाडच्या वकिलीच्या परिक्षेस १०१ उमेदवारांनीं अर्ज पाठविल्याचें कळतें.

आज पासून अकोल्यास सेशन कोडताचे कामास आरंभ होऊन एकंदर १३ मोकद्दमेचा निकाल होईं पर्यंत कोर्टीचा तळ येथेंच राहणार आहे.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां घेण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें. ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मि. नंबर ७

१८९२

स्पेशल अ० कमिशनर साहेब जिल्हे अकोला यांचे कोर्टांत

नांव गणपत वलद वनसिंग अ० पालन करणार मातोश्री गोपीकाबाई मर्द वनसिंग राहणार आखंद तालुके अकोला जिल्हा अकोला यांस मयत.

वनसिंग बापाचे नांव विठोबा राहणार आखंद तालुके अकोला जिल्हा अकोला यांचे कर्ज वसूल करितां घेण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यांणे अर्ज केला आहे त्याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहीरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणी ता. ९ माहे जुलई सन १८९२ इ. रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आप आपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १६ माहे जुन सन १८९२ इ०

V. N. Dandekar.

शिक्का. सिव्हील जज्ज.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां घेण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

क्लास १९ नंबर ८

१८९२

स्पे अ० कमिशनर साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत

नांव महमदखा बापाचें नांव अहमदखा राहणार अकोला तालुके अकोला जिल्हा अकोला यांस मयत.

हाजी हुशेनखा बापाचें नांव अहमदखा राहणार अकोला तालुके व जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां घेण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतिवर किंवा तिचें कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांणीं तारीख ९ माहे जुलै सन १८९२ इ० रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १६ माहे जून सन १८९२ इ०

V. N. Dandekar.

(शिक्का.) सिव्हिल जडज्ज.

नोटीस

रा. रा. तुकाराम वलद उदाजी पाटील रहाणार महान तालुके अकोला जिल्हा मजकूर यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुमची मजकडे कर्जबाकी, थकत चालली व तुह्मी फिर्यादीची तरतूद लावली ह्मणून मी तुह्मास आपलें रहातें घर व माझ्या नांवाचे दोन नंबर मौजे डोचकें व महान येथील शेतें तुमच्या ३१० च्या रुपयांच्या तारणार्थ गहाण करून दिलें. त्यांस अद्दमासें दोन वर्षें होऊन गेलीं. आणि मध्यंतरीं मी कर्जाची फेड होईपर्यंत व्याज वाढूं नये ह्मणून व्याजाचें ४६ रुपये तुम्हास दिलें. त्याची पावती देऊं देऊं करीत विश्वासावर अखेर दिली नाहीं. तुमचे दोहोत्रा व्याज चालूं होतेंच आणि ज्या वेळीं तारण गहाण करून दिलें त्यावेळीं तुमचा आमचा करार ठरला होता कीं रुपयांची संपूर्ण फेड होई पावेतों तुह्मी रुपयांची निकड लावूं नये कांकीं मी सव्याज मुद्दल योग्य तजविजीनें भरपूर देण्यास जबाबदार होतो. व्याजा पैकीं ४६ रुपये दिल्या नंतर वर्षभराचा काळ लोटला नाहीं तोंच तुम्ही रुपयाबद्दल सक्त तगादा लाविला. माझ्या जवळ पैसा जमा नव्हता आणि ही माझी नादानी लक्ष्यांत आणून तुम्ही तारण गहाणांतील स्थावर इस्टेट खरेदी करून घेण्याचा डाव मांडला. मी ही कर्ज फिटून दुसऱ्याच्या त्रासांतून सुटावें ह्मणून शेतें दोन्ही विकण्यास तयार झालों व शेतावरच सर्व पैशाची फेड होणार असल्यामुळें घर माघारें परत घेण्यास सिद्ध झालों. तुह्मी मला लोभाच्या व विश्वासाच्या भूलथापा देऊन कळविलें कीं, कर्जाच्या व्याजासुद्धां रकमे पैकीं ४०० रुपये घेऊन बाकीच्या रकमेची सूट देतों आणि त्या चारशें रुपयांच्या ऐवजीं शेतेंच फक्त खरेदी घेतो. लटपटीनें तुह्मी खरेदीखत लिहवून घेतलें आणि तें झाल्या नंतर मला घर खालीं करून देण्यास ताकीद केली तेव्हां तुह्मी फसमसलतीनें शेतीं बरोबर घर ही लिहून घेतलें असावें असें समजलें. असो तुमचें बरेंवाईट काम तुमच्या बरोबर आणि देव त्याजबद्दल तुमचा झाडा घेईल. तुह्मास या नोटीशीनें कळविलें जातें कीं खरेदीखत मला कबूल नाहीं व तें या लेखान्वयें रद्द आहे. तुमचें रुपये व्याजा सुद्धां हप्तेबंदीनें मी देण्यास तयार आहे आणि रुपये फिटे पर्यंत हप्तेबंदी चुकली नाहीं तर फिर्याद वगैरे न करण्याचा तुमचा करार आहे तर पांच पंचा मार्फत किंवा सरकार मार्फत माझ्या ऐपती प्रमाणें हप्तेबंदी मुकर करून द्यावी. तसें न करून खरेदी खतावर काम चालवून फिर्याद कराल तर त्याच्या खर्चाबद्दल जबाबदार नाहीं. इतकेंच बरें तर या नोटीशीच्या खर्चासुद्धां सर्व माझा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख १८ माहे जून १८९२

(सही)

विठोबा वलद बेनाजी पाटील

वस्ती महान याच्या हातची निशाणी नांगर.

वर्तमानसार

मुंबई रेलवेनें आपल्या आगगाड्यांत ग्यासलाइट ह्मणजे धुराचें दिवे लावण्याचा सुरुवात केली आहे. कल्याणपर्यंत जाऊन येणाऱ्या एका गाडींत हे दिवे लाऊन गाडी चालवून पाहिली व तसें करणें सुसाध्य आहे असें अनुभवास आलें. ग्यासाचा साठा एका ठिकाणीं ठेवून त्याच्या तोंड्या प्रत्येक डब्यांत नेल्या आहेत.

सुप. मि. काइट यांस बडोद्यास पोलिस कमिशनर नेमलें! कोणी नेटिव मिळत नव्हता कीं काय!

अमदाबादेस अति वृष्टी होऊन फार नुकसान झालें. पाऊस ५ इंच पडला. मोवींकडे तर रेलवेचा रस्ताही वाहून गेला आणि त्यामुळें गाड्या चालण्यास हरकत झाली होती.

इंडियन आफीसरबिलाचें कामन सभेंत दुसरें वाचन झालें.

हिंदुस्थानांतले हे पुढील गृहस्थ विलायतच्या बारिस्टरच्या परिक्षेंत पास झाले:— लाल प्रकाशचंद, मथुराप्रसाद, फत्त बंद, मेथा दादाभाई मंचरजी, मीर उल्ला शाहा. मंचरजी खरशेटजी लाल काका, महमद नजमल, व रफुद्दीन मौलवी.

१८७९ सालच्या ४॥ टक्के व्याजाच्या कर्जाचे १८९३ च्या सपटंबर महिन्यांत हिंदुस्थान सरकार फेड करणार आहे व त्या कर्जाच्या नोटो ज्यांच्या जवळ असतील त्यांतील जे लोक आपल्या त्या रकमा ४ टक्के व्याजाच्या कर्जांत घालण्यास तयार असतील त्यांणीं येत्या जुलैच्या १५ व्या तारखेच्या आंत त्या ४॥ टक्यांच्या नोटी बंगालब्यांकेंत देऊन ४ टक्यांच्या नोटी घ्याव्या असें हिंदुस्थानसरकारानें इंडिया ग्याझेटांत प्रसिद्ध केलें आहे. सरकारची पत कशी वाढत आहे पहा!

हिंदुस्थानांतले लोक मजुरीकरितां आसामांत जाऊं लागले आहेत. एका गंजम प्रांतांतून १८९० सालीं चार हजार गेले व १८९१ सालीं ९,००० गेले!

जर्मन बादशहा राणीस भेटण्याकरतां ओसबर्न येथें येत्या महिन्यांत जाणार आहेत.

हलींचे जर्मन बादशहा व माजी प्रधान प्रिन्स बिस्मार्क यांचें ऐक्य होण्याचें घाटत आहे.

अमेरिकेंत अतिवृष्टी होऊन महापूर झाला व त्यानें दोन गांवें वाहून गेलीं. राकेल तेलाच्या खाणीस विजेनें आग लागून फार नुकसान झालें. या आगीनें शेकडो माणसें जीव घेऊन डोंगरांत पळालीं तरी १९० ठार झालीं.

इटालियन सरकार फार मोठीं अशीं नवीन तीन लढाऊ गलबतें तयार करीत आहेत.

हिंदुस्थान व काबूल यांच्या दरम्यानचा व्यापार अगदीं नियंत्रित करण्याचा अमिराचा विचार दिसतो. घोडे, सोनें चांदी, वगैरे महत्वाच्या जिनसा जर कोणी व्यापारी अफगाणिस्थांतून हिंदुस्थानांत नेऊं लागेल तर त्याच्यावर फार जरब जकात घेतली जाऊन शिवाय शिक्षाही केली जाईल असें अमिरानें फर्मावि‌लें आहे असें सांगतात.

हिंदुस्थानसरकारच्या दरबारीं असणारा काबूलच्या अमिराचा वकील वलीं महमद यांस अमिरानें परत बोलावलें आहे. असें सांगतात. कारण?

पाहांग येथें दरोडखोरांच्या रूपानें लोकांचा दंगा चालूच आहे.

रशियन राजधानी सेन्ट पीटर्सबर्ग येथें मुसलमानांचीं पुष्कळ वस्ती असून ते तेथें मोठाल्या मेजवान्या खात असून एक मशीद ही बांधीत आहेत. हिंदु इंग्लंडांत बांधीत आहेत. ठा० अ०

हैद्राबाद येथें दोन तरुण पार्शी व युरेशियन दोन तरुणींनीं मुसलमानी धर्म स्वीकारला आणि नंतर महंमदी धर्म पंथानें त्यांची लग्नें झालीं. यामुळें हैद्राबादस बराच गोंगाट उडाला आहे.

फिर्यादीचा खर्च— निजामसरकारचे हिऱ्याच्या प्रकरणांतले प्रतिवादी जेकब यांस दिवाणी फौजदारी फिर्यादी बद्दल एकंदर २८५००० रु० खर्च झाला यावरून कोर्टाची पायरी चढणें ह्मणजे भिकेस लागण्याचे डोहळे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

१८७० च्या पार्लमेंटच्या कायद्या प्रमाणें नेटिवांस लेफ्टनंट गव्हर्नर किंवा व्हाइसरायांचे कौन्सिलर इतक्या थोर पदवी पर्यंत वाढण्याचा हक्क होता. पार्लमेंटानें केलेल्या कायद्या प्रमाणें नेटिवांस मिळावयाचे हक्क बंद करण्याची पब्लिक सर्व्हिस कमिशनानें शिफारस केली, आणि थोड्या हलक्या दर्जाच्या जागा नेटिवांस देण्याचें अनुमोदन दिलें. पार्लमेंटानें केलेला कायदा मोडण्यास पार्लमेंटा शिवाय कोणासही अधिकार नाहीं, असें असतां तो कायदा रद्द करण्यासाठीं पार्लमेंटास विनंती न करितां स्टेट सेक्रेटरीनीं तो आपण होऊन रद्द केला आणि हिंदुस्थानांतील नेटिवांच्या तोंडचा मिष्टान्नाचा मोठा घांस हिसकाऊन घेऊन त्यांच्या तोंडांत वाळलो कोळलो भाकर घातली असें ह्मणण्यास मोठासा दोष नाहीं. तेव्हां लेफ्टनंट गव्हर्नरी आणि गव्हर्नर जनरल साहेबांची कौन्सिलदारी एवढ्या मोठ्या पदवीस चढण्या सारखी योग्यता असली तर चढण्याचा हक्क अशा २२७ जागा बंद करून पब्लिक सर्व्हिस कमिशनानें शिफारस केल्या प्रमाणें हलक्या दर्जाच्या १०८ सिव्हिल सर्व्हिस पैकीं जागा देण्याचें सोडून फक्त ८६ जागा देण्या बद्दल ठराव करणें याचे नांव ठकविणें नव्हे काय! पब्लिक सर्व्हिस मध्यें मोठ मोठ्या जागा मिळण्याचें नेटिवांचे जे योग्य हक्क आहेत त्यांचा यथन्याय आदर ह्या कृतीनें झाला काय? ह्या कृतीनें नेटिव लोकांशी सरकार विश्वासानें वागतें असें होतें काय?

पार्लमेंटाच्या कायद्याचा ह्या नव्या ठरावानें मोठाच अपमान झाला आहे असें डिग्बी ह्मणतात, तें कांहीं खोटें नाहीं. ह्या अपमाना-बद्दल पार्लमेंट मेंबरांस कांहींच वाईट वाटत नाहीं हें कसें? पार्लमेंट मेंबरांनीं झालेला अपमान निमूटपणें सोसला ह्मणजे सर्वच काम संपलें असें ह्मणण्यास खरोखर अडचण नाहीं असें आह्मास वाटतें. शु० सू०

वार्सा (पोलंडची राजधानी) येथील एका घड्याळें करणारानें चिकागो येथें भरणाऱ्या जगी प्रदर्शनांत पाठविण्या करितां एक मोठें चमत्कारिक घड्याळ तयार केलें आहे हें घड्याळ करावयास त्याला पुरीं साहा वर्षें लागलीं. हें घड्याळ ह्मणजे एक हुबेहुब आगगाडीचें 'स्टेशन' आहे. ह्या 'स्टेशनांत' प्रवासी लोकांस विश्रांती करितां खोल्या 'टिकिट' व तार आफिसें, बत्त्यांनीं उजळलेला 'प्लाटफॉर्म' व फुलझाडांचा बाग आहे. बागाच्या मध्यभागीं एक स्वच्छ पाण्याचा कारंजा आहे. इशारा देण्याकरितां निरनिराळ्या रंगाच्या 'हातांची' व कांचेच्या दिव्यांची योजना केली आहे. इंजिनास पाणी पुरविण्या करितां टांक्या बांधल्या अहेत सारांश आगगाडीच्या 'स्टेशनावर' बारीकसारीक जितक्या ह्मणून गोष्टींची अवश्यकता आहे, त्यांची ह्या ठिकाणीं योजना करण्यांत आली आहे. 'स्टेशनाच्या' मध्यभागीं असलेल्या बुरूजाच्या कळसांवर न्यूयॉर्क व पेकीन येथील वेळ दाखविणारीं घड्याळें बसविलेलीं आहेत.

प्रत्येक पाव तासास ह्या 'स्टेशनांत' चळवळ सुरू होते. प्रथमतः तार करणारा कारकून कामावर रुजू होतो. तो आगगाडीचा रस्ता बिनधोक आहे अशा अर्थाची तार करता स्टेशनावरच्या खोलीचा दरवाजा उघडून 'स्टेशनमास्तर' व त्याचा मदतनीस 'प्लाटफार्मवर' येऊन इकडून तिकडे फिरूं लागतात. 'टिकिटें' देणारा इसम टिकिट ऑफिसाच्या खिडकीशीं येऊन दाखल होतो. टिकिट ऑफिसाच्या खिडकीशीं उतारूंचा घोळका जमतो व टिकिटें घेण्याची एकच गडबड उडून राहते. हमाल (पोर्टरस्) उतारू लोकांचें सामान घेऊन प्लॉटफार्मवर धांवत सुटतात एवढ्यांत स्टेशनवरची घंटा वाजते व बोगद्यांतून आगगाडी मोठ्या सोसाट्यानें स्टेशनावर येऊन थांबते. लगेच एक मजूरदार हातोड्यानें प्रत्येक डब्याची चाकें तपाशीत जातो दुसरा मजूरदार टांकीतलें पाणी 'इंजिनांत' सोडतो. तिसरी घंटा होतांच आगगाडी वाफेच्या द्वारें शीळ वाजवून समोरच्या बोगद्यांत शिरते व कांहीं वेळानें बिलकूल दिसेनाशी होते. 'स्टेशनमास्तर' व त्याचा मदतनीस प्लाटफॉर्मवरून आपल्या खोलींत जातात व लगेच खोलीचा दरवाजा बंद होतो. टिकिट व तार आफिसें बंद होतात. हमाल आपापल्या जागेवर जाऊन बसतात.

एवढें कौशल्य दाखविण्यास घड्याळ करणारास सहा वर्षें खर्ची घालावीं लागलीं आहेत. प्रदर्शन पाहूं येणारे राजे रजवाडे, अमीरउमराव व शेटसावकार हें घड्याळ करणाऱ्याच्या कौशल्याची योग्य चीज करून त्याबद्दल त्याला योग्य मोबदला देतील अशी आशा आहे. पण हें घड्याळ करणारा आपल्या घड्याळाला किती किंमत घेऊन बसेल कोण जाणे!

ता. २७ जून रोजीं हवा भयंकर पडणार असल्या मुळें पुष्कळ जीवांचा व मालमत्तेचा नाश होईल असें जपकिस्तो कुलेंद्र सरस्वती यांनीं स्टेट्समन पत्रास कळविलें आहे.

मद्रास येथील जनरल हास्पिटला करितां एक वाफेनें चालविण्याचें मनुष्यांस उचलण्याचें यंत्र आणिलें आहे. अशक्त रोग्यांस खाल्च्या मजल्यावरून वरच्या मजल्यावर नेतां यावें हा तें आणण्याचा उद्देश आहे. सु० प०

नोटीस

हिमतराव वलद बोदराजी देशमुख राहणार कजने अडगांव तालुके अकोट जिल्हे अकोला यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मी तुह्मांस आमचे खानगी व कोर्टचें काम करण्या करितां तारीख २८ एप्रील सन १८९२ इ० रोजीं मुखत्यार पत्र करून दिलें होतें. परंतु तुह्मी माझी नोकरी बरोबर करीत नसून माझें उलटें नुकसान करीत आहात याज करितां तुमचे मुखत्यारपत्र आज तारखे पासून रद्द केलें आहे तुह्मी पुढें माझी नोकरी संबंधानें कोणचे ही प्रकारचें काम करूं नये. कळावें. तारीख १० माहे जून सन १८९२ इ०

(सही.)

सखाराम वलद बाबूजी ठाकूर

राहणार सातेगांव तालुके

दर्यापूर दस्तुर खुद्द.

नोटीस

दत्तपुरी गुरू हरीपुरी गोसावी राहणार कान्हेरी तालुके बाळापुर यांस नोटीस देणार सिताराम झिंगराजी सोनार राहणार कान्हेरी नोटीसीनें असें कळवीतों कीं तुजपासून आम्हीं रुपये कर्ज घेतले १५ पंधरा व याज बद्दल तुम्हांस आम्हीं कागद करून दिला व आज सुमारें पंधरा दिवस जाले. मजपासून तुम्हीं पुतळ्या जून्या २ दोन घेतल्या त्याचें वजन मासें साडेसात याचे रुपये जाले पंधरा १५ व व्याजाबद्दल रुपये चार ४ असें मिळून तुह्मास १९ एकुणास रुपये पावते केले व माझा कागद मागीतला त्यास तुह्मी आज देतों उद्या देतों असें सांगत सांगत आज पंधरा दिवस झाले कागद देत नाहीं व पावतीही भरपाव देत नाहीं. ह्मणून तुह्मास या नोटिशीनें कळविलें जातें कीं तुमच्या पाशीं जो रोखा रुपये १५चा आहे तो पोकळ आहे त्याजबद्दल आह्मी कांही देणें नाहीं. पुढें मागें तुह्मी फिर्याद वगैरे आह्मावर केल्यास त्याजबद्दलचे जबाबदार आह्मी कोणच्याही प्रकारानें नाहीं आह्मी तुमचे रुपये १५ व व्याज रुपये ४ चार कसे दिले याजबद्दल साक्षीदार आहेत. विनाकारण तुह्मी काम चालविल्यास कोर्टांत हजर करीन. मग मी ह्या नोटिशीच्या खर्चासह माझें जें नुकसान होईल तें सर्व भरून घेईन ह्मणून दिली नोटीस सही. तारीख १२ माहे जून सन १८९२ इ०

सही

सिताराम झिंगराजी दस्तुर खुद्द.

अकोला बाजारभाव.

हुंडी मुंबईची दर्शनी	१००॥=		
" १५ दिवसाच्या मुदतीची	१००		
सुवर्ण २५ रुपे	१०८॥	आळशी	९७
गहूं काठे	७६।	बनशी	८२॥
जवारी	५०	सकीं	१॥।
		रुई	१९
मीठ ३॥ =॥।	तूप ८॥=	तेल	६८—

☞ हें पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ... ...

करित असलेल्या सर्व कमेट्या या नियमा अन्वयें नेमल्या आहेत असें समजलें जावें. अशा प्रकार नेमल्या कमेट्या नीं जिल्हा बोर्डास वाटल तो पर्यंत काम चालतावें.

३—रकम (ई) अन्वयें नियम.—जिल्हा बोर्ड व तालुक बोर्डचे काम चालविण्या संबंधी ह्मणजे सेक्रेटरीची नेमणूक, कोरम ठरविणें, सारखे पक्ष असल्यास त्या प्रसंगी निर्णायक मत देणें, सभा भरविण्याच्या त्यांची कमीत कमी संख्या किती असावी व एका मागून एक भरणाऱ्या सभेंत किती काळ जाण्याचा, आणि सभेंत झालेल्या ठरावांच्या नकला डेपुटी कमिशनर किंवा कमिशनर यांजकडे पाठविणें या संबंधी.

२२ प्रत्येक जिल्हा बोर्डानें व जिल्हा बोर्डाची अगाऊ मंजुरात घेऊन प्रत्येक तालुक बोर्डानें वेळोवेळीं रेसिडेंट साहेबांनीं ह्या कायद्या अन्वयें नियम केलें असतील त्यांस अनुसरून असें पुढील गोष्टी संबंधी नियम करावे.

(अ) आपल्या सभेची वेळ व जागा.

(ब) सभेंत काम चालविण्याचा रीत.

(क) बोर्डाचे मेंबरांत कामाची वाटणी.

(ड) ह्या कायद्या अन्वयें दिलेल्या पैशा बद्दल बोर्डाच्या वतीनें पावत्या कोणी देण्याच्या.

२३ जिल्हा बोर्डाची सभा. ...

जिल्हा बोर्डानें वर्षांतून चार वेळां पेक्षां कमी नाहीं इतकें वेळां सभा भरावी व दोन लागोपाठ भरलेल्या सभेंच्या दरम्यान चार महिन्या पेक्षां जास्त काळ जाऊं नये.

२४ तालुका बोर्डाची सभा.

प्रत्येक तालुक बोर्डानें वर्षांतून ८ वेळां पेक्षां कमी नव्हे इतकें वेळां सभा भरावी. व दोन लागोपाठ भरलेल्या सभेच्या दरम्यान दोन महिन्या पेक्षां जास्त काळ जाऊ देऊ नये.

(पुढें चालेल.)

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध ३ शके १८१४

सन १८९१ साल अखेरचा वऱ्हाडांतील सिव्हील इस्पितळें व धर्मार्थ दवाखाने यांच्या हकीकतीचा वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध होऊन त्याची एक प्रत आह्माकडे आल्या विषयीं आह्मी मागें कळविलेंच आहे. त्या रिपोर्टांतून निवडक निवडक माहिती गोळा करून ती लोकांच्या नजरे समोर घालण्याचा आज विचार आहे. हा रिपोर्ट अगदीं नियमित वेळेवर किंवहुना थोडा अगोदरच रेसिडेंट साहेबांच्या आफिसांत दाखल झाला या बद्दल अलिशान साहेबांनीं सर्जन लेफ्टनन्ट मेजर चार्लस लिटल एम. डी. सानिटरी कमिशनर यांचे आभार मानले आहेत. डाक्टर लिटल साहेबांची दक्षता, टापटीप, व देखरेख वर्णनीय असते त्यामुळें त्यांचा हा रिपोर्ट सविस्तर हकीकतीचा व बिनचूक असा आहे प्रत्येक जिल्ह्याच्या सदर ठिकाणीं एकेक या प्रमाणें सहा आणि चिखलदरा व कलमखार या गांवचे दोन असीं मिळून एकंदर आठ सिव्हिल इस्पतळें आहेत. आणि त्यांचा सर्व खर्च सरकार मार्फत चालतो. या दवाखान्यांतून पोलीस लोक व इतर सरकारी नोकर यांस औषधोपचार होत असतो तरी जेथें जेथें सवड व सोय असेल तेथें अन्य रयत मंडळीस औषधें देण्याविषयीं मनाई नाहीं. आणि अकोला व उमरावती येथें पलटणीच्या टोळ्या आहेत त्यांतील लष्करी लोकांसही सिव्हील इस्पितळांतून औषधें देतात. इस्पितळांत जाऊन राहणारे व तेथून नुसते औषधी नेणारे असे मिळून सर्व रोग्यांची संख्या साल अखेर ४४३७८ होती आणि ही गुदस्त साला पेक्षां २१९७ आंकड्यानें मोठी आहे. इस्पितळांत राहण्याच्या सोयी आहेत त्या मुख्यत्वें करून इलिचपूर व यवतमाळ येथें फार कमी असल्यामुळें जागेच्या व बिछाने वैगरे सामानाच्या नव्या सोयी करविण्यासाठीं वरिष्ठ सरकारकडे अर्ज गेला आहे आणि त्या प्रमाणें बहुतेक व्यवस्था लवकरच करण्याबद्दल रेसिडेंट साहेबांनीं मंजुरात दिली आहे. उमरावती व अकोला या दोन स्थळीं सिव्हील इस्पितळांतून औषधें नेणाऱ्या रोग्यांची संख्या फार कमी असून येथील इस्पितळ मोडून तें धर्मार्थ दवाखान्यांत सामील करावें अशा बद्दल रेसिडेंटसाहेब सुचवितात. सिव्हिल इस्पितळा पेक्षां धर्मार्थ दवाखाने त्या त्या शहरच्या लोकांस नजिक पडतात ह्मणून बहुत करून कोणी इस्पितळांत जाऊं इछित नाहीं. शिवाय आकोल्याची पलटण येथून काढण्यांत आली ह्मणजे ही रोग्यांची संख्या फारच उतरेल तेव्हां येथील इस्पितळ धर्मार्थ दवाखान्यांत सामील करण्याची सूचना अवश्य लक्ष्यांत घ्यावी लागेल. सालमजकुरीं दोषिक ज्वरानें पिडलेल्यांची संख्या कमी आहे तरी हागवण व पटकीचा उपद्रव अधीक जोरावला असें दिसतें. सिव्हिल इस्पितळांतील आंकड्यांचा निरनिराळ्या रोगा खालील कमजास्तपणा हा धर्मार्थ दवाखान्यांतील आंकड्यांशीं ताळेबारीनें जुळतो हें लक्ष्यांत ठेवण्या सारखें आहे. एकंदर शस्त्रक्रियेचें काम १५३ रोग्यावर झालें त्यांत उमरावतीचे डाक्टर रो साहेब यांचें हस्त कौशल्य, लोक प्रियता, व मनमिळाऊपणा हीं विशेष दिसून आलीं. कांहीं डाक्टर व्यर्थ ओरड करितात कीं वऱ्हाडांत शस्त्रक्रिये साठीं रोगीच मिळत नाहीं. त्यावर सानिटर कमिशनर व रेसिडेंट यांनीं उलट त्यांसच दोष देऊन आपला आळस, शस्त्रक्रियेंत गैरवाकबगार पणा, व निष्काळजी वर्तन हीं सुधारण्या विषयीं सुचविलें आहे. सिव्हील इस्पितळा प्रीत्यर्थ रिपोर्टाच्या वर्षीं एकूण खर्च रुपये ५२४८२—९ आ० ७ पै झाला असून तो गुदस्त सालापेक्षां दोन हजार रूपयांनीं वाढला आहे. गरीब व अनाथीं पोलीस खात्यांतील रोगी इस्पितळांत येऊन बरे होईपर्यंत राहतात त्यांच्या साठीं लागणारा खर्च पोलिस खात्यांत न घालतां मेडिकल खात्यांत सामील करण्याचा परिपाठ आहे तो बरोबर नसल्या बद्दल सानिटरी कमिशनरनीं आपला अभिप्राय दिला आहे सिव्हील इस्पितळांस अवघी १६ रुपये वर्गणी युरोपियन लोका कडून मिळाली आहे हें पाहून रेसिडेंट साहेबांस मोठें नवल वाटलें. जरी युरोपियन लोक आपल्या स्वतां बद्दल फी, व औषधें यात पुष्कळ पैसा खर्चतात तरी तो सर्व इस्पितळाच्या खात्यास मिळत नसतो हें ते विसरतात, शिवाय त्यांच्या चाकर मंडळीस ही त्यांच्या नांवावर औषधें दिलीं जातात त्यांचा पुरा दाम कधींही दिला जात नाहीं.

(पुढें चालेल)

निजाम सरकारची टांकसाळ दिवसेंदिवस सुधारत आहे. टांकसाळीसाठीं एक निराळी भव्य व भक्कम इमारत बांधण्याचें काम चाललें असून नाणीं पाडण्याचीं सर्व यंत्रें विलायतेहून मागितलीं आहेत बडोदेशाही, होळकरशाही, व पवारशाही नाणीं त्या त्या मांडलिक संस्थानिकांच्या राज्यांतून चालूं आहेत त्या प्रमाणें निजामशाही चलनी नाणीं हैदराबाद संस्थानांत चालतात. पूर्वीचीं ओबडधोबड, कमजास्त वजनाचीं व वेड्यावांकड्या आकृतीचीं नाणीं मोडलीं जाऊन त्या ऐवजीं यंत्र साधनें, शास्त्रीयरित्या धातुपरिशोधन, सुरेख व सुबकदार मुखवटे व ठसे इत्यादी उपायांनीं नवीन पाडलेलीं नाणीं कित्येक संस्थानिकांनीं व्यवहारांत चालूं केलीं आहेत. निजामशाही मोहरा, रुपये, पैसे वगैरे चलनी नाणीं नव्या प्रकारच्या साधनसमुच्चयानें पाडणार असल्याविषयीं गेल्या एक दोन वर्षां पासून विचार घाटत आहे आणि त्या विचारा बरहुकूम नवा टांकसाळेचा कारखाना लवकर उपयोगांत येऊन इंग्रजी धरतीचीं नाणीं चालूं होतील हें कळविण्यास संतोष वाटतो. गुदस्त सालीं सरासरी पंचवीस लाख सुरती रुपये किंमतीच्या रुप्याचीं नाणीं पाडण्यांत आलीं.

निजामशाहीच्या नाण्या संबंधानें वऱ्हाडांत एक कायमची व कायदेशीर व्यवस्था होणें आह्मांस आवश्यक वाटते ती अशी. वऱ्हाड प्रांतांत सरकारी खजिन्यांतून, पोस्ट आफिसें, रेलवें, तारायंत्रें, सरकारचीं आफिसें व कोर्टें इत्यादिकांमधून महाराणी सरकारचीं नाणीं चालतात आणि तें हिंदुस्थानच्या बादशाहिणीच्या सार्वभौमत्वाला अनुलक्षून यथाशास्त्र, कायद्या प्रमाणें, व मामूल वहिवाटी प्रमाणें बरोबर आहे. परंतु संस्थानिक रालेरजवाडे यांना आपापल्या राज्यविस्ताराच्या मानानें पृथक् पृथक् ठशाचीं नाणीं चालूं ठेवण्या विषयीं हिंदुस्थान सरकारची परवानगी आहे आणि ह्मणूनच हीं नाणीं निरनिराळीं दृष्टीस पडतात. वऱ्हाड प्रांतांत अशीं नाणीं चालण्याचा संभव कमी दिसतो तरी वास्तविक प्रकार उलट आहे. या प्रांतांतील मूळची रुपेरी नाणीं कांहीं चालूं नसून फक्त व्यापाऱ्यांवरी पैसा व दुबंडी पैसा एवढें मात्र किरकोळ व्यवहारांत लोक कबूल करितात. अकोला व उमरावती येथील कांहीं व्यापाऱ्यांनीं इंदूर बडोद्याकडील पैसा व दुहेरी पैसा अशीं दोन तांब्यांचीं नाणीं इकडे चालूं केलीं आणि त्यांचा फैलाव सर्व प्रांतांतील खाजगी देवघेवींत झाला आहे. वऱ्हाड प्रांत निजाम सरकारचा आहे तेव्हां निजामशाहींतलीं सर्व चलनी नाणीं इकडे चालूं पाहिजेत परंतु अन्य संस्थानिकाचे पैसे या प्रांतीं चालून खुद्द निजाम सरकारचे पैसे अंकवार रुपये चालूं नाहींत हें मोठें नवल आहे. वऱ्हाडची प्रजा निजाम सरकारची रयत असून इंग्रज सरकारच्या संरक्षणा खालीं तैनातीं फौजेच्या प्रकरणांत दिली गेली आहे आणि याच कारणामुळें वऱ्हाडांतील सरकारी नोकर खेरीज करून इतर रयत लोकांवर इनकमट्याक्स बसविलेला नाहीं. आमच्या मतें निजाम दरबारचीं सर्व चलनी नाणीं वऱ्हाड प्रांतांतील खाजगी व्यवहारांत चालूं व्हावीत एवढेंच नाहीं तर सर्व प्रकारच्या सरकारी देवघेवींत ही तीं नाणीं चाललीं पाहिजेत. इंग्रजी व निजामशाहीच्या नाण्यामध्यें कांहीं वजनमापांत व किंमतींत फरक असेल तर त्याबद्दल उभय नाण्यामधील एक बटवड्याचा दर कायमचा ठरविला जावा ह्मणजे कांहीं नड पडण्या सारखी नाहीं. ही सूचना निजाम सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं लक्ष्यांत घेतली तरच तिच्या बद्दल कांहीं हालचाल होण्याचा संभव आहे.

कलकत्त्याच्या 'इंडियन डेली न्यूज' नांवाच्या वर्तमानपत्रा मध्यें हैदराबाद संबंधानें एक पत्रव्यवहार गेल्या ११ वे तारखेस प्रसिद्ध झाला होता त्यांत नबाब मुशताक हुसेन या गृहस्था संबंधानें एक बेअब्रूचा सापराध वर्तनाचा, व दरबारच्या कमीपणाचा असा लेख होता. दिवाण सर अस्मान जहा हे सरकारी कागदपत्रावर वेळेवर सह्या करीत नाहींत ह्मणून पुष्कळ कामें तुंबून राहतात परंतु त्यां पैकीं कांहीं अत्यंत निकडीचीं व महत्वाचीं असल्यामुळें त्या प्रकरणांतील कागदपत्रावर नबाब मुशताक हुसेन हे दिवाण साहेबांची संक्षिप्त सही त्यांच्या पश्चात परिशियनमध्यें करून कारभार चालूं ठेवितात. ही बातमी जाहीर होतांच सदर्हु नबाबांनीं त्या पत्रावर खोटा मजकूर छापल्याबद्दल फिर्याद करण्याविषयीं दिवाणापाशीं मंजुरात मागितली. दिवाणानीं सांगितलें कीं या बातमींत तिळप्राय तथ्य नाहीं व खुद्द नबाब हुसेन हे बीस बीस वर्षांचे जुने, इमानी, व विश्वासूक अधिकारी आहेत, आणि अशा क्षुद्र व हलकट लेखानें कोणाच्या ही अब्रूला व इभ्रतीला धक्का पोंचण्या सारखा नाहीं तेव्हां विनाकारण फौजदारी खटला करून साक्षी पुरावा करीत बसण्यांत कांहीं लभ्यांश नाहीं. हा सल्ला प्रथमदर्शनीं भित्रेपणाचा व स्वहितास बाधक दिसतो परंतु विचारान्तीं समजेल कीं दुष्ट व कुत्सित वार्ता प्रसारकांस पारिपत्य करावें ह्मणून आपण सरकारच्या योग्य सेवेंत अंतर पाडावें. अशा प्रसंगीं अमोल वेळ क्षुद्र जनांच्या परिताडणार्थ व्यर्थ दवडावा यांत शहाणपणा नाहीं. अशा सौम्य वर्तनाला कांहीं मर्यादा आहेत त्या उल्लंघाव्या लागतील अशा प्रकारची किंवदन्ती अब्रूस हानिकारक पसरली तर मात्र योग्य खबरदारी घेतली पाहिजे.

The Berar Samachyar

MONDAY, JUNE 27
1892

The Anglo-Indian Government is ever at cross-purposes with the demands of the people. Sir William Wedderburn has well hinted at it when he read in England a paper on the agricultural banks for India. He told in plain

words the history of the Governmental selfishness in refusing the trial of such a bank in the Purandhar taluk of the Bombay presidency. The Indian ryot is poverty-stricken and cannot avert the 'unnecessary and preventible' suffering from bad seasons. The peasants are deeply and hopelessly in debt and are therefore bond slaves to the money-lending Shylock. The establishment of agricultural banks is meant to afford a lending hand to the sinking land-holders. Loans upon moderate interest will be the right help. It will give them the independence and encourage the enterprise that are most needed to effect any improvements in the agriculture of the country. However caused may be the miseries and poverty of these people they have been taught the lesson of hard times and are expected to act wisely and prudently. The security of these loans is the hidden rock upon which wrecks the solution of the problem. People desire the Govt. to realize these debts through Revenue courts just like the rents of the land. The India Govt. is unwilling to do anything of the sort. It overthrew a similar proposal of agricultural banks in 1884 and it is to be seen what measures it adopts to avert the imminent collapse of the agriculturists in India. Lord Reay is most anxious to prepare the way for instituting the agricultural banks and before a beginning is made he wishes that the 'triangular correspondence' should cease and the system of "Tuccavi" advances should be developed with more liberal and comprehensive regulations. Sir Charles Bernard has expressed the views of the India Office in connection with this subject. His speech will strike the key note as to what is probable within the doings of the Government: In relief of the Indian peasantry the Government signifies a full desire to entertain a practical measure. But it is almost superhuman to divine what constitutes a measure a practical one and the Govt. has well succeeded to make a show of its sympathy and interest. Its policy is a lip-policy and its promises are cold-blooded assurances for time to run.

We look in vain for a local enterprise in the institution of agricultural banks. The loans from these banks must be as secure and guaranteed as the land-revenue of the Govt. Here is the first and principal occasion for Government to stand security to these banks on the strength and ability of its executive and legal machinery of administration. The second demand upon govt. points out those facilities and concessions which are needed to enable the banks to advance money on a moderate rate of interest. The India Govt. is unwilling to do anything even in this direction. There is no direct cheque for these loan-debts upon the public treasury but people expect Govt. to be as prudent and cautious about the realization of the loans as it would be in connection with its revenue. The Govt further wants to avoid the trouble and uncertain speculation of settling all the issues in regard to the bank debts. A right view of the matter would tell us that the affairs of these banks would not be so litigatious and complicated as they are represented to be by the adverse philosophisers of the official circle. Want of accumulated capital, indifference to co-operation and the non-adoption of steam engines and machinery have all blended together to make impossible the industrial life of the whole nation. India is like a lord that spends his estates to pay for his luxuries and enriches the producers of them. However extensive and absorbing may be the export and import trade of a nation, the nation must die away when other nations supply its wants and luxuries. There is only one thing wanting to bury the Indian nation into oblivion. The rich and fertile land of India is still in the occupation of her people. So far as food and rough clothing go India provides for herself. There is not a complete transfer and a decisive revolution in the owership of the land of the country. It is slowly passing away out of the hands of the ryots. Their helpless state is beyond mending and the agriculture will naturally suffer a heavy deterioration in the long run. If the present process, that is silently at work, of driving men to be agriculturists and of driving agriculturists to be without land and money continues for a century and a half India will more properly represent a nation of beggars and criminals.

India is rightly styled as the granary of European nations and whatever commences a spoil on the resources of the granary is a national evil. As a province in India Berar which is eminently agricultural deserves a proper and immediate consideration for a general view of its peasantry. Col. Mackenzie our popular Commissioner has already recorded in his last report on civil justice a wide and wholesale complaint about the transfer of more than one-third of the land from the peasants to their money lenders. We are greatly afraid of the dangers of such a transfer. It threatens to make people homeless labourers and irresponsible citizens. They shall have nothing at stake to ose in a general out-break. This leads us to repeat the forecast of Mr. Hume if no immediate remedy is started to redress the grievances. For Berar an agricultural bank is necessarily required on the lines of Govt. security and loans of moderate interest. The policy of Tuccavi advances is too strict and limited to admit of any new changes with respect to its usefulness. We earnestly hope that the Local Govt. will frame new rules to give the aspect of an agricultural bank to the fund of Tuccavi advances. We know that such a plan is within the sphere of a provincial Govt. But any thing beyond this must come direct from Simla Government with the sanction of the Whitehall magnates of the India office. If a new proposal be based on the suggestions of Sir C. Bernard there is a possibility of hope and success. He suggests that the Govt. should advance to the agricultural banks loans from the public exchequer at 4 p. c. and such loans shall extend to the amount of nearly 50 per cent of the paid-up capital of the banks. A second concession will be in the way of reducing the stamp-fees for the first ten years or so. In sequal to this should be the remission of the registration-fees. The Govt. should take upon itself the duty of auditing and publishing the accounts of these banks through public officers and should have within its keeping also the custody of the cash of the banks. The Madras Government has appointed a separate officer to prepare a plan for sanction of the higher Govt. and we hope that our Commissioner will not let away the chance of following in the wake of that Government.

वऱ्हाड

हवामानः-- एकदोन वेळां लहानसहान पावसाच्या सरी आल्या परंतु पावसाळ्यांतल्या प्रमाणें वर्षाव अद्याप नाहीं. आकाशांतील ढगांची गर्दी, विजांच्या चकमकी व हवेंतील गारवा इत्यादि सुलक्षणांवरून पर्जन्य अगदीं समीप असावा अशी अटकळ आहे. रोगराई म्हणण्यासारखी नाहीं.

रा. रा. एकनाथ मोरेश्वर तहशिलदार, जिल्हा वणी माजिस्ट्रेट वर्ग २ यांस क्रिमिनल प्रोसिजरचे ३२वे कलमान्वयें त्यांच्या अधिकारांतील फटके मारण्याची शिक्षा देण्याचा अधिकार देण्यांत आला आहे.

गेल्या मार्च महिन्यांत वऱ्हाड प्रांतांत ८४६० मनुष्यें जन्मलीं व ९१३३ मरण पावलीं. गेल्या मार्च महिन्यांत जितके लोक मेले तितके मागे कोणत्या ही मार्च महिन्यांत मेले नव्हते. इनफ्ल्युएन्झा व कडक उष्णता हीं दोन कारणें एवढीं अधिक मनुष्यें मरण्यास झालीं.

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए एजुक्याशनल इस्पेक्टर, प्रांत वऱ्हाड यांनीं येथील लायब्रेरीस १०० रुपये देणगी देऊन तिचे लाइफ मेंबरांत आपलें नांव घातलें आहे आणि हेच पहिले लाईफ मेंबर आहेत तेव्हां यांच्या नाममहिम्यानें अनेक नांवें त्या सदरा खालीं येतील असें आम्ही इच्छितों.

बाळापूरचे शेट पोपटलाल यांजवरील फौजदारी खटला येथें आज पुन्हां चालेल. त्यांच्या तर्फे येथील कांहीं वकील अमून शिवाय मुंबईचे बारिस्टर ब्रानसन यांसही आणलें आहे श्रीमंतावर प्रकरण आलें असल्यामुळें धन बलाच्या जोरानें उत्कृष्ट कायदे पण्डितांगरी दृष्टीस पडेल.

उमरावतीचे पोलीस इनस्पेक्टर मि आंगर यांनीं तीन महिन्याची रजा घेतल्या वरून त्यांच्या जाग्यावर मि. रघुपतराव यांची नेमणूक झाली.

येथील हेडक्लार्क मि. गाड फ्री हे उमरावतीस गेल्या गुरुवारीं रवाना झाले. हे गृहस्थ कामांत वाकबगार, सरळ मनाचे, स्वभावानें मन मिळाऊ असल्यामुळें त्यांस वरिष्ठ व हाताखालील लोक नेहमी राजी असत. त्यांच्या विशेष हुशारीवरूनच त्यांना दर्जा शिवाय निराळा २५ रु. जास्ती पगार मिळत आहे.

सानिटरी कमिशनरचे हेडक्लार्क मि. जार्ज यांस मि. मेन यांनीं सोडलेल्या उमरावती क्यांप मुनसिपालिटीचे सभासदावें जागीं नेमण्यांत आलें.

मि. आरदेसर दिनसाजी विन्चुप जज स्मालकाज कोर्ट उमरावती यांजकडे उमरावती जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रारचें काम सोंपविण्यांत आलें

खामगांव मुनसिपालिटीचे सभासद रा. रा. शामराव रामचंद्र यांनीं राजिनामा दिल्या वरून त्या रिकाम्या जागीं तेथील वकील रा. रा. बाळकृष्ण वामन यांस सभासद निवडलें.

वाशीम शिल्हा बोर्डांतील सभासदांच्या तीन जागा मंगरूळ व वाशीम येथील तालुका बोर्डांनीं ज्या गृहस्थांची निवड करून भरल्या ते गृहस्थ येणें प्रमाणें:—आमडु मिया पटेल, पोघाट; राघोपा महादपा, शेलगांव; आणि उदाराम रामबक्ष, आडोळी.

इलिचपूर शहर मुनसिपालिटीतील मि० इलाझ हुसेन व मि० बाबुसा हिरासा हे दोन सभासद निवाल्या मुळें त्या जागीं रा. रा. लक्ष्मण बाळकृष्ण व पासुसा रुखालसा या उभतांस निवडण्यांत आलें.

सेशन मोकदमे—(१) अकोटच्या महमद सखर यास मागील भोगलेल्या शिक्षा लक्षांत घेऊन कोटानें लुगड्याच्या चारीबद्दल सात वर्षे सक्तमजूरी व तीन महिने अंधार कोठडी अशी वढतीची सजा दिली. (२) अकोल्याच्या लुटाऱ्या माळ्यानें अल्पवयस्क मुलींशीं जबरी संभोग केल्या वरून वरील प्रमाणेंच शिक्षा देण्यांत आली. (३) येवतें येथील एका चांभारणीशी जबरी संभोग केल्याचा आरोप महमदु यावर होता पण तो अखेर निर्दोषी ठरला. (४) कुणखेड नागो नांवच्या जुन्या चोरानें पुन्हा १६ पेंड्या कडबा चोरल्या वरून पांच वर्षांची सजा झाली. (५) जळगांवच्या सारजी नांवाच्या ब्राह्मणी विश्वास मूल झाल्यावर तिनें त्याची गुप्त व्यवस्था पायखान्यांत फेकून केली होती म्हणून तिला दोन वर्षांची शिक्षा झाली. (६) मेहेकर कडील कांहीं कुणबी खामगांव गहूं जवस घेऊन आले होते त्या वेळीं त्यांच्या पैकीं एकानें दुसऱ्या दोघास घोतऱ्याचें बीं भाजीपाल्यांतून घातलें परंतु पुरावा नसल्यामुळें तो सुटला. (७) वाशिम शिल्ह्यांतील मुरली मुक्कामीं मोगलाईतल्या आट वंजारी डाकेखोरांनीं एका महारावर डाका घातल्या वरून त्यांची सेशन चौकशी झालीं. त्यांत तिघे सुटून पांच जणास शिक्षा झाली त्यांत चौघास सात सात वर्षांची व एकास एक वर्षाची शिक्षा देण्यांत आली. (८) उमरावती शिल्ह्यांतील शेखलाल यानें घरफोडी बद्दल तीन वर्षांच्या शिक्षेवर अपील केलें होतें त्यांत दोन वर्षांची शिक्षा कायम राहिली.

नोटीस.

नोटीस बेशमी कन्हयालाल चुनिलाल राहणार गोनहापुर ता० मलकापुर यासी खालीं सही करणार सोनाजी वल्द पुंजाजी माळी अंत्रजकर हलो वस्ती सुटाळे तालुके मलकापुर याज कडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची तारीख १६ जुन सन १८९२ ईसवीचे शुद्धवऱ्हाडी पत्राचा अंक ९ यांत दिलेले नोटीशीचा जबाब देण्यात येतो कीं तुम्ही माझे नवळून जे शेताचे हिशा बद्दल खरेदीखत करून घेतलें त्याचे भरण्या बद्दल लिहीलेला तपशील अगदी खोटा आहे. तुमचे नवळून मला पैसा येक सुद्धा मिळाला नाहीं. तुम्हास माहीतच होतें कीं सदहु शेताचा हक्क तुम्हास मी नारायण अंबादास याचे नवळ तें गहाण असल्यावरून त्याजला रुपये देऊन गहाण सोडविण्यास मी विकला होता परंतु तुम्ही मला दिलेंचनाहीं आणि मी नोटीस तुम्हास दिली असतां तुम्हीच उलट भरण्या बद्दल लिहीता ही तुमची लबाडी आहे. अशी लबाडी करून कांहीं शेत मिळणें नाहीं. आणि सदरील शेताचा मोबदला ही तुम्हांस मुळींच दिला नाहीं. मी नोटीशींत दिलेल्या मुदतीचे आंत तुम्ही रुपये देऊन गहाण सोडविलें नाहीं करितां आतां तें तुम्ही माझे नवळून करून घेतलेलें खरेदीखत अगदीं रद्द झालें आहे असें समजावें. आतां मीं कोणतें ही प्रकारचा खरेदीखताचें संबंधानें जबाबदार नाहीं. हें या नोटीशीवर जाहीर केलें आहे. कळावें ता० २१-६-९२ (सही)

सोनाजी वल्द पुंजाजी माळी
रहाणार सुटाळें निशाणी खुद.

वर्तमानसार

मि. पीन नांवाचा काबूलच्या अमिराचा गोरा एजंट इंग्लंडाहून काबुलास जाण्याकरतां पेशावरास आला. त्याणें आपल्या बरोबर वेगळाल्या विद्येंत निपुण असे दुसरे सात साहेब आणले आहेत व त्यांच्या सहाह्यानें अफगाणिस्थानांत वेगळाले कारखाने सुरू करण्याचा विचार आहे. त्यांतील दोघे वेगळाल्या पदार्थांच्या खाणीं शोधून त्यांतून ते ते पदार्थ तयार करण्याच्या कामांत प्रवीण असे आहेत. बाकीच्यांत काडतुसें करणारे, तोफा ओतणारे, असे आहेत. त्यांत एक बागवानही आहे.

कांहीं मुल्ला लोक तीरा येथील लोकांत उपदेश करून त्यांचीं मनें हिंदुस्थानसरकाराविरुद्ध करीत आहेत व ते अमिराच्या हुकुमानें तसें करीत आहेत असें सांगतात.

काबूलचा कमांडर गुलाम हैदर हा अजून अस्मार येथेंच असून तेथें तटबंदी वगैरे कायमच्या छावणीकरतां लागणारी तयारी करीत आहे.

रशिया व फ्रान्स यांतील कांहीं व्यापारी मिळून सैबेरियांतून अमूरपर्यंत रेल्वे करण्यास तयार झाले आहेत. भांडवल १५,००,००,००० रोबल करण्याचें योजलें आहे.

ब्लाक मौंटनच्या संरक्षणास गरज लागल्यास हुकुमाबरोबर रवाना होण्याचा, सिलकोट येथील २५ व्या पलटणीस, व रावळपिंडी येथील १३ व्या पलटणीस, तयार राहाण्याचा, हुकूम झाला आहे असें अलहाबादची तार सांगत्ये. बचाव कोणापासून?

हजारा लोकांची स्थिती चमत्कारीक झाली आहे. ते बायका मुला सुद्धां सुमारें दाहा हजार लोक असून डोंगरांच्या खिंडींत आहेत आणि त्यांच्यांतल्या प्रत्येक मोठ्या पुरुषास ठार मारून त्याच्या बायकोस आफगाणफौजेंत पाठवावी असा कबूलच्या अमिरानें हुकून केला आहे असें सांगतात.

अफगाणसरदार अबदुल कुडूसखान हा बंडखोरांस मिळाला असून अफगाणफौज चाल करून जाण्याच्या तयारींत आहे.

हजरतप्रांत हें दंग्याचें एक ठिकाणच आहे व तो प्रांत इंग्रजी राज्याच्या नकाशांत दाखल झालेला आहे. हा प्रांत चांगला मोठा असून खिलाती गिलझाईच्या वायव्येस आहे इंग्रजांस त्या प्रांताची अजून चांगली माहिती झालेली नाहीं, तरी त्यांत पुष्कळ लोकवस्ती असून चांगला सुपीक आहे असें सांगतात. अमिरानें आपली १०,००० फौज त्या प्रांतावर पाठविली आहे पण त्या कामास तितकी बस होईल असें वाटत नाहीं आणि त्या बंडखोरांचा निकाल लावल्यावाचून अमीर वाजोर प्रकरणाकडे वळेल असें वाटत नाहीं.

गिलजित येथील इंग्रजी फौज परत आणून त्या ठिकाणच्या संरक्षणाचें काम काश्मीरच्या फौजेकडे देण्यांत येणार.

बनारस व रायबरेली यांच्या दरम्यान रेलवे करण्याकरतां सर्वे करण्याचें ठरलें तसेंच रायबरेली व लखनौ यांच्या दरम्यानही रेलवे करण्याचा लवकरच विचार होणार आहे.

पंजाबांतले सर्व स्थानिक मिळून येत्या हिवाळ्यांत लाहोर येथे एक प्रदर्शन करणार आहेत. ठा० अ०

इंग्लंडमध्यें महमदियन धर्माचा फैलाव होऊं पहात आहे.

यापुढें कांग्रेस सभा सरकार भरून देईलसें दिसत नाहीं. मग लोक इछा.

बागलकोटास नवीन गिरणी झाली, कानपुरास विलायतच्या तोडीचें बूट होऊं लागलें.

न्यूयार्क मधील एक व्यापारी हॉटेल (खानावळ) बांधित आहे त्याची उंची २०० फूट आहे.

दुनयेमध्यें २८ निखर्व रुपये किमतीचे कागद उपयोगांत येतात त्यांत अर्धे छापण्याकडे येतात. मा० मि०

सयामसरकारचा हुकूम— आपल्या नोकरींत जे युरोपियन आहेत त्यांनीं सयामसरकाराशीं आपण राजनिष्ठपणें वागूं अशा शपथा घ्याव्या, आणि ह्या प्रीत्यर्थ पाणी पिण्याचा जो एक विधी आहे तो करावा असा सयाम सरकारानें हुकूम केला आहे.

मारिशस बेटांतील अनाथ झालेल्या लोकांकरितां कलकत्यास वर्गणी सरू झाली आहे. या बेटांत व यावस्तींत ५/६ नेटिव आहेत. तेव्हां संकटांत पडलेल्या आपल्या जातभाईची कींव येऊन इकडील उदार आणि धर्मात्म्या लोकांनीं आपला उदार हात पुढें करावा हें योग्य आहे. शु० सू०

सोलापूर जिल्ह्यांत पर्जन्यानें आबादानीं केली असून कडधान्य व बाजरीचे पेरें सुरू आहेत. व कांहीं झालें आहेत. बाजरीचे पेऱ्यांचा हंगाम तिकडे बारा तेरा वर्षांनीं साधला आहे असें ह्मणतात.

पुणें येथील पोस्ट आफिसांत २० रुपयांच्या कारकुनाच्या जाग्यावर एका युरोपियन बाईची नेमणूक झाली असल्याचें पुणें वैभवा वरून कळतें.

नगर जिल्ह्यांत इतका चांगला पाऊस पडला कीं, शेतकरी लोकांच्या आनंदास पारावारच नाहींसा झाला आहे. फारच आनंदाची गोष्ट. सु०

हरिद्वार—वारा सोसाट्याचा असून पर्जन्य वृष्टीस सुरवात होऊन झड लागली तेणें करून हवेंत गारठा आहे. हिमालयपर्वतांत ज्वालामुखीं देवीचें एक स्थान आहे. तेथें एका विद्यार्थ्यानें आपली जिव्हां छेदून देवीस अर्पण केली. पुढें १३ दिवस अन्नोदका वांचून तेथें राहिल्यावर पुन्हा आली असें कृत्य करण्याचें कारण विचारतां देवीचे प्रेरणेनें केल्याचें ह्मणतो. कामनिक इच्छा बिलकुल नव्हती असें सांगतो. शेंकडों लोकांनीं हा चमत्कार पाहिलेला आहे. असाच चमत्कार थोडे दिवसांपूर्वीं अमृतसरास झाला होता. याजवर सुधारक काय कोटीक्रम चालवितात पाहूं. न्या.

आस्टेलेशिया, केप् आफ् गुड्होप्, दक्षिण आफ्रिकेचा पश्चिम किनारा, उत्तर अट्लांटीक् व दक्षिण पासिफिक् महासागरांतील बेटें इतक्या ठिकाणीं आजपर्यंत पटकी कधी उपद्रवली नाहीं.

सर्व नद्या मिळून एका दिवसांत समुद्रांत ३६ घन मैल पाणी सोडतात.

पाकोळी एका दिवसांत ६०० मैल प्रवास करिते.

मनुष्याचें वजन चाळीसावें वर्षीं अतिशय असतें.

पृथ्वीवरील एकंदर लागवडीला असलेली जमीन ६,००,००,००,००० सहा अब्ज एकर आहे.

चांगली इमारत बांधली असल्यास ती सरासरीनें दोनशें वर्षे टिकते.

इंग्लंडांत एका आठवड्यांत सूर्यप्रकाश सरासरी २३½ तास असतो.

विमानांत बसून एक मैल उंचीवर मनुष्य गेल्यास, त्याच्या दृष्टीच्या टप्यांत सुमारे ६०० मैलांचा प्रदेश येतो.

हैदराबाद येथे दोन पारशी भाऊ व दोन युरोझियन बहिणी यांणीं महंमदी धर्म स्वीकारला व नंतर त्यांनीं एकमेकांशीं लग्न केलें. ते मोठ्या आनंदांत आहेत असें त्या मुलींच्या पत्रावरून समजतें. महंमदी धर्मानें सर्व धर्मांवर छाप बसली ह्मणावयाची तर!

सय्यद अल्लीं बेलग्रामी यांना शिकागो येथील जगद्यात्रेस जाता यावे ह्मणून सहा महिन्यांची भरपगारी हक्काची रजा देण्यांत आली आहे. हें निजामच्या पदरीं मोठे अधिकारी असून दोन चार खात्यावरीस मुख्य आहेत.

कार्बोलिक असिड पूड घरांत किंवा खोलींत टाकली असतां साप आत येत नाहीं. कोंकण्यांतल्या लोकांनीं उपयोग करून पहावा.

फिनलंड मध्यें अतिशय लहान दिवस तीन तासाचा असतो व स्पिट्जबर्गेन येथें अतिशय मोठा दिवस साडेतीन महिन्यांचा असतो.

आफगाणीस्थानचें रक्षण मनुष्यांनीं होत नाहीं तर ऋतुमानाप्रमाणें साहारा वाळवंटांतील उष्णता किंवा उत्तरध्रुवासारखी थंडी यामुळें होतें.

माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन साहेबांचें चरित्र 'हिंदुस्थानचें शास्ते' या मालेंत प्रसिद्ध झालें आहे. त्यांत सदरहू साहेब फार विद्वान, सदाचारसंपन्न, दूरदृष्टि व राजकारस्थाननिपुण होतें असें लिहिलें आहे.

न्यूयार्कमध्यें, जशा आपल्या इकडे मोठ्या शहरांत घरोघर पाण्याच्या तोंड्यांनीं पाणी घेतात तसें दूध तोंड्यांनीं पुरविणारी एक कंपनी आहे अमेरिकेचें सर्वच विलक्षण!

अटालांटिक महासागर ओलांडण्याला एका आगबोटीला ५०,००० रुपये खर्च येतो. क. णू.

लार्ड ल्यान्सडोन यांचे भागून येणाऱ्या हिंदुस्थान व्हाइसराय संबंधानें आजपर्यंत पुष्कळ मत्सुद्यांचीं नावें पुढें आलीं होतीं, पण हल्लीं ज्या मुत्सद्यांचें नांव पुढें आलें आहे, ते जर अखेर पर्यंत कायम राहिले आणि त्यांची नेमणूक याच जागेवर झाली, तर खरोखर आह्मां हिंदुस्थानवासी जनांस सुखाचें आणि सुबत्तेचे दिवस येणार असें दिसतें. हे भावी गव्हरनर जनरल लार्ड बेअरिंग होत. लार्ड रिपन गव्हरनर जनरल असतां हे त्यांचे चिटणीस (फायन्यान्स मिनिस्टर) होते त्या वेळीं यांच्या गुणाची फार प्रसिद्धी झाली. हिंदुस्थानच्या लोकांची खरी स्थिति यांना चांगली माहित असून शिवाय ते तिकडे डोळे झांक करणारे नव्हेत. मिठावरील कर याच्याच कारकीर्दींत कमी झाला होता. आणखी यांचे कारकीर्दींत हिंदुस्थानचे चांदीबद्दल विलायतच्या लोकांनीं ती घ्यावी ह्मणून तिजवरील जकात माफ करण्याची यांनीं खटपट केली होती. यांना लष्करी शिक्षणही मिळालेले आहे. आणि आज काल हिंदुस्थानांत लष्करी खात्याचें प्रस्थ फार माजत चाललें आहे, व पैशाची तर फारच ओढाताण चालली आहे, अशा प्रसंगीं यांच्या सारख्या माहितगार आणि खऱ्या कळवळ्याच्या मुत्सद्याची गव्हरनर जनरलच्या जागीं नेमणूक झाली असतां ती सर्व प्रकारें आह्मांस हितप्रद आणि कल्याणकारक होणार नाहीं असें कोण ह्मणेल? मात्र शेवट पर्यंत हीच बातमी कायम राहो ह्मणजे झालें. रा०दा०

शेतकरी पेढ्या स्थापन होण्याचीं कारणें— पांच टक्के किंवा फार झाले तर सहा टक्के व्याजानें शेतकऱ्यांना कर्ज दिलें तरच अशा पेढ्या घालण्यांत अर्थ आहे. पांचटक्के व्याज जर शेतकऱ्या पासून घ्यावयाचें तर ह्या ब्यांके पासून भागीदारांच्या हातांत अडीच, तीन टक्केच व्याज येणार. सरासरी दोन अडीच टक्के व्याज ब्यांकेच्या खर्चा वेचास पाहिजे. तेंव्हां अडीच टक्क्यांच्या व्याजास कबूल होणारे श्रीमंत लोक आह्मांत आहेत कुठे? सरकारा सारखे निर्भय कूळ चार टक्के व्याज देते शिवाय त्याच प्रॉमिसरी नोटा हव्या तेव्हां विकाव्या अशा सरकारांस सोडून ह्या ब्यांकेंत कोण पैसा ठेवील? आह्मीच ब्यांका घालव्यात हें मात्र रास्त आहे. परंतु गिरण्यादि संस्थेंत नऊ टक्के व्याज मिळतें व परदेशचा व्यापार हटवून देशांत उद्योग धंदे वाढवून सुबत्ता करता येते तो मार्ग सोडून, आमचे लोक हें भिकारडें काम कां करतील! पु. वै.

नोटिशीचें उत्तर.

रा. बापु पांडुरंग घोडचर रहाणार अकोलें यांसः—

खालीं सही करणार याजकडून कळविलें जातें कीं, तुह्मी तारीख ११-६-९२ चें वैदर्भपत्रात माझें नोटिशीचें दिलेलें उत्तर खोटें आहे. असें करण्यानें तुह्मास न्यायाचे कार्टांतून अनकुलतेचा ठराव मिळणार नाहीं. कळावें. तारीख २१-६-९२

(सही)

झाबा. वल्लद राघोजी माळी.

अकोला बाजारभाव.

हुंडी मुंबईची दर्शनी			१००८≡
,, १५ दिवसाच्या मुदतीची			१००
सुवर्ण २४॥ रुपें	१०८॥	आळशी	१०२
गहूं काठे	७५	बनशी	८२॥
जवारी	५०	सर्की	५॥
		रुई	५८
मीठ ३॥≡।	तूप ९	तेल	६८=

सट्याचे भाव. (मोंगलाई)

जवारी	बसंत	१९४९	४६।=
गहूं	वैशाख शुद्ध	१९४९	६५॥-
आळशी	चैत्र शुद्ध	१९४९	८७
सर्की	वैशाख नवे सालची	१९४९	५।
रुई	फाल्गून	१९४९	५५।-

शु० व०

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे. "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.